



# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

✦ अमरावती, गुरुवार १३ ऑगस्ट २०२६ ✦ मूल्य ४.०० ✦ पृष्ठ १०





## अमरावती तहसीलदाराची ‘दिव्य करामत’

# 200 कोटीची जमीन 70 हजारात नावे केली

**प्रदीप देशपांडे**

**अमरावती ता. १२ :** कुळ कायद्याने एखाद्या जमिनीवर मालकी हक्क सिद्ध होण्यात अनेक वर्षे लागत असतील. पण, अमरावतीच्या तहसिलदाराने हे अचाट काम अवघ्या काही दिवसातच पूर्ण करीत सुमारे २०० कोटी मूल्याची १ हेक्टर ७३ आर जमीन अवघ्या ६०-७० हजारात शेषराव गोयटेच्या नावे करून टाकली.

हे सत्कार्य करताना तहसीलदार महाशयांनी या जमिनीचे औद्योगिक व निवासी म्हणून १९६२ मध्येच रूपांतर झाले, तशा नोंदी ७/१२ वर अगदी २०२०-२२ पर्यंत आल्या आहेत, या जमिनीची रजिस्टर्ड विक्री पत्रे २०१५-१६ मध्ये होऊन त्यावर रिलायन्स प्रोग्रेसिव्ह ट्रेडर्स (१.२१ हे आर) आणि स्कॉर्पिओन इन्फ्रा अर्थ (०.५२आर)यांची नावे चढली, रिलायन्स ने या जागेचा व्यावसायिक वापर करण्याची मंजुरी जिल्हाधिकाऱ्यांकडून घेतलेली आहे, आपण ज्या कथित बोगस दानपत्राच्या आधारे हे 'दिव्य आदेश' पारित करीत आहोत ते दिवाणी कोर्टाने फार पूर्वीच फेटाळले आहे, हे काहीही पाहिले नाही. रेकॉर्डवरील या पार्टींना साध्या नोटीस देण्याचीही तसदी घेतली नाही. त्याऐवजी कै. पांडुरंग बनारसे जणू आजही बडनेरा रोड, अमरावती येथेच वास्तव्यास असल्याचे भासवून त्यांच्या नावे नोटीस काढण्यात आल्या आणि ते हजर नाहीत असे दाखवून एकतर्फी हे 'दिव्य आदेश' काढण्यात आले. तहसीलदार अमरावतीने हे सत्कार्य



निव्वळ कर्तव्य भावनेने व फुकट केले काय?

**महसूल खात्याची बदमाशी-** पांडुरंग बनारसे यांच्या वारसांनी २०१४-१५ मध्येच या संपत्तीची विक्री करून ती रीतसर रिलायन्स आणि स्कॉर्पिओन इन्फ्रा च्या नावे केली होती. त्याला एका खोट्या व ५० रुपयांच्या स्टॅम्पपेपर वरील कथित दानपत्राच्या आधारे दिवाणी कोर्टात आव्हान देऊन ८१ आर जमीन दान म्हणून व उर्वरित ९२ आर जमीन वाहितीसाठी आपल्याला दिल्याचा दावा शेषराव गोयटेने केला होता.पण पुराव्याअभावी तो खारीज झाला.

मात्र, याच कागदपत्रांचा आधार घेत आणि तेच बोगस दान पत्र दाखल करून शेषराव गोयटेने महसूल खात्यातील भ्रष्ट अधिकाऱ्यांना हाताशी धरीत हा कबाडी धंदा केला आहे. २०२१-२२ पर्यंत सर्व नोंदी व सात बारा रिलायन्स व स्कॉर्पिओन च्या नावे असताना त्या अचानक बदलण्यात आल्यात. ७/१२ मध्ये अनेक फेरफार करण्यात आले. रिलायन्स च्या नावे असणारा ५६/१/ब चे तीन सात बारा वेगवेगळे करून रिलायन्सला ५६/१/ब-२ आणि स्कॉर्पिओन ला ५६/१/ब-१ आणि ब-३ क्रमांक देऊन मूळ ५६/१/ब चा उतारा तसाच ठेवण्यात आला. त्यातील क्षेत्रफळ कमी न करता १.७३ हेआर पैकी ८१ आर जमिनीचा भोगवटदार म्हणून शेषराव गोयटे चे नाव नोंदविले.त्यासाठी पूर्वीच्याच बोगस अनोंदणीकृत दानपत्राचा आधार घेतला.

> *ए.आर. रियाल्टर्स यांनी आपली खरेदी ३१.०३.२६ ची दाखविली असली तरी ती ०२.०४.२६ ला रजिस्टर्ड झाली आणि त्यावेळी ३०.०२.२६ या तारखेचा २० लाख ९२ हजार ८२८ रुपयांचा कॅनरा बँक अमरावतीचा चेक देण्यात आला. आता फेब्रुवारी महिन्यात ३० तारीख कशी काय उगवली? वेळोवेळी रोख दिलेले ५ लाख आणि पीडिसी चेक सुद्धा असेच संशयास्पद आहेत.*

उर्वरित ९२ आर जमीन लागवड योग्य दाखवून त्यावर कुळ म्हणून शेषराव गोयटेचे नाव लावले आणि नंतर नाममात्र किमतीत ती जमीन त्यालाच विकून मालक बनविण्यात आले. महसूल खात्याने ही धडाकेबाज कारवाई अवघ्या काही दिवसातच पूर्ण केल्याने त्याबद्दल संशय आहे.

गंमत म्हणजे, हा सारा मामला रिलायन्स आणि स्कॉर्पिओन ला पूर्णतः अंधारात ठेवून आणि बनारसे अमरावतीतच राहतात असे दर्शवून तहसीलदार पातळीवरच पूर्ण करण्यात आला. याप्रकारे अवैध व बेकायदेशीरपणे ताब्यात आलेली ही मौल्यवान सुमारे २०० कोटी रुपयांची जमीन २९.०३.२५ आणि ०२.०४.२६ रोजी विकण्यात आली. आता रिलायन्स ने हे प्रकरण गांभीर्याने घेऊन अमरावती न्यायालयात ३११/२०२६ दावा दाखल केला आहे. या प्रकरणी एसडीओ कडे अपील तसेच पोलिसात फौजदारी तक्रारही दाखल दाखल होत आहे.

# एकाच दिवशी अदानी समूहाच्या दोन प्रकल्पांसाठी वनजमीन वळविण्याचे निर्णय

**अदानी समूहाशी संबंधित दोन कंपन्यांच्या प्रकल्पांसाठी रायगड आणि अमरावती जिल्ह्यातील वन जमिनी वळविण्याचा राज्य सरकारने एकाच दिवशी महत्त्वाचे शासन निर्णय जारी केले**








**मुंबई/प्रतिनिधी :** अदानी समूहाशी संबंधित दोन कंपन्यांच्या प्रकल्पांसाठी रायगड आणि अमरावती जिल्ह्यातील वन जमिनी वळविण्याचा राज्य सरकारने एकाच दिवशी महत्त्वाचे शासन निर्णय जारी केले. रायगड जिल्ह्यात अदानी सिमेंटेशन लिमिटेडच्या सिमेंट बल्क टर्मिनलसाठी ०.६४९७ हेक्टर वनजमीन, तर अमरावतीत अदानी टोटल गॅस लिमिटेडच्या नैसर्गिक वायू पाइपलाइनसाठी ०.१२८१ हेक्टर राखीव वनजमीन वळविण्यात आली. अदानी समूहाच्या प्रकल्पांसाठी राज्य सरकारकडून आवश्यक जमीन तात्काळ उपलब्ध करून दिल्या जात आहेत.

महसूल व वन विभागाने १० ऑगस्ट रोजी जारी केलेल्या शासन आदेशानुसार रायगड जिल्ह्यातील अलिबाग तालुक्यातील शाहापूर, शाहबाज गावात अदानी सिमेंटेशन लिमिटेडकडून रायगड सिमेंट बल्क टर्मिनल प्रस्तावित आहे. या प्रकल्पासाठी बर्थिंग जेट्टी, कन्व्हेयर कारिडार, बॅकअप सुविधा आणि जोडरस्ता उभारण्यासाठी ०.६४९७ हेक्टर वनजमीन वळविण्याचा प्रस्ताव मंजूर करण्यात आला आहे. हा प्रस्ताव यापूर्वी केंद्राच्या पर्यावरण, वन व हवामान बदल मंत्रालयाच्या प्रादेशिक कार्यालयाकडे मंजुरीसाठी पाठविण्यात आला होता.

अमरावती शहर आणि परिसरात गॅस वितरण नेटवर्क उभारण्यासाठी भूमिगत १२ इंच व्यासाची स्टील नैसर्गिक वायू पाइपलाइन टाकण्यास ०.१२८१ हेक्टर राखीव वनजमीन वळविण्याचा निर्णय घेण्यात आला. बोरी गाव ते अमरावती बस डेपो या मार्गासाठी प्रस्तावित असलेला हा प्रकल्प अदानी टोटल गॅस लिमिटेडकडून राबविण्यात येणार आहे. या प्रकरणात राज्य सरकारने यापूर्वी तत्त्वतः मंजुरी दिली होती आणि त्यानंतर संबंधित अटींची पूर्तता केल्याचा अहवाल वन विभागाकडून सादर करण्यात आला आहे. एकाच दिवशी अदानी समूहाशी संबंधित दोन कंपन्यांच्या प्रकल्पांसाठी वनजमिनीशी संबंधित शासन निर्णय जारी झाले. राज्य सरकारकडून समूहाच्या विविध ➪(पान २ वर)

# राज्यात 36 हजार कंपन्या बंद!

**मुंबई / प्रतिनिधी-** महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणावर नवीन गुंतवणूक आणि उद्योग आणल्याचे दावे सरकारकडून केले जात असतानाच राज्यातील बंद पडलेल्या कंपन्यांचा मुद्दा पुढे आला आहे. मुंबईत तब्बल १२ हजार ९ कंपन्या, तर पुण्यात ६ हजार ४३३ कंपन्या बंद झाल्याचा दावा शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे नेते राजाभाउ वाजे यांनी पत्रकार परिषदेत महाराष्ट्रातील औद्योगिक परिस्थितीवर भाष्य केले.सध्या राज्यात औद्योगिक कंपन्या, छोटे उद्योग बंद पडत असून तरुणांवर बेरोजगारीचे संकट ओढावले आहे. सरकारकडून विविध ठिकाणी हजारो कोटी रुपयांच्या गुंतवणुकीचे सामंजस्य करार (एमओयू) झाल्याचे दावे केले जात आहेत. नवीन गुंतवणूक राज्यात यावी यासाठी सरकारने प्रयत्न करणे चुकीचे नाही, मात्र त्याचवेळी राज्यातील विद्यमान उद्योगांची स्थिती काय आहे, याकडेही लक्ष देण्याची गरज असल्याचे वाजे म्हणाले.राजाभाउ वाजे म्हणाले की, मुंबई, पुणे आणि नाशिकसारख्या भागांमध्ये उद्योगांसाठी पाणी, वीज, रस्ते आणि इतर पायाभूत सुविधा उपलब्ध ➪(पान २ वर)

# कंपन्या बंदचा आकडा कुठून आला? तपासासाठी एक दिवस द्या-उद्योगमंत्री सामंत



**चंद्रपूर /प्रतिनिधी :** महाराष्ट्रात गेल्या पाच वर्षांत ३६ हजार कंपन्या बंद पडल्याचा आकडा नेमका कुठून आला, याचा आपण शोध घेउ. केंद्र सरकारने ही माहिती दिली असली तरी हा आकडा कोणत्या स्रोतावरून आला, याची तपासणी तसेच चौकशी करण्यासाठी मला एक दिवसाचा वेळ द्या, असे राज्याचे उद्योगमंत्री डॉ. उदय सामंत बुधवारी येथे म्हणाले. जिल्हाधिकारी कार्यालयात उद्योग प्रतिनिधींसोबत झालेल्या बैठकीनंतर आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. गोंडपिंपरी तालुक्यातील १३ गावांनी प्रस्तावित एमआयडीसीला शेतक-यांनी तीव्र विरोध केला आहे. या पार्श्वभूमीवर शेतक-यांना विश्वासात घेतल्याशिवाय पुढे जाणार नाही, असे सामंत यांनी स्पष्ट केले. येत्या चार-पाच दिवसांत जिल्हाधिकारी शेतक-यांची बैठक घेणार असून, आपण ऑनलाइन उपस्थित राहणार आहोत. गरज भासल्यास पुन्हा चंद्रपुरात येउन शेतक-यांशी संवाद साधू, असेही त्यांनी सांगितले.

**चंद्रपूरच्या उद्योगांना १०० टक्के प्रोत्साहन-** चंद्रपूर हा औद्योगिक जिल्हा असून वीज, पाणी यांसह आवश्यक पायाभूत सुविधा उपलब्ध आहेत. सध्या गडचिरोलीतील ➪(पान २ वर)

## पुणे येथे राज्यपाल तर मुंबईत मुख्यमंत्र्यांच्या हस्ते ध्वजारोहण

**मुंबई/प्रतिनिधी :** भारताचा ८० वा स्वातंत्र्यदिन शनिवार, १५ ऑगस्ट २०२६ रोजी राज्यभर उत्साहात साजरा करण्यात येणार असून जिल्हा मुख्यालयात संबंधित पालकमंत्री व मंत्र्यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात येणार आहे. याबाबत सामान्य प्रशासन विभागाने परिपत्रक जारी केले आहे. राज्याचा मुख्य शासकीय समारंभ

# दादाजी रेशमाबाई दगडू भुसे करणार अमरावतीत ध्वजारोहण

मंत्रालय, मुंबई येथे सकाळी ९.०५ वाजता होणार असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात येईल. तर पुणे येथे राज्यपाल जिष्णू देव वर्मा यांच्या हस्ते ध्वजारोहणाचा कार्यक्रम होणार आहे.राज्यातील विविध जिल्ह्यांमध्ये संबंधित पालकमंत्री व मंत्र्यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात येणार आहे. त्यानुसार उपमुख्यमंत्री एकनाथ गंगुबाई शिंदे (ठाणे), उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार (बीड), चंद्रशेखर प्रभावती कृष्णराव बावनकुळे (नागपूर), राधाकृष्ण सिंधुताई एकनाथराव विखे-पाटील (अहिल्यानगर), हसन समिना मियालाल मुश्रीफ (नंदुरबार), चंद्रकांतदादा सरस्वती बच्चू पाटील (सांगली), गिरीष गिता दत्तात्रय महाजन (नाशिक), गणेश सुभद्रा रामचंद्र नाईक (पालघर), गुलाबराव रेवाबाई रघुनाथ पाटील (जळगाव), दादाजी रेशमाबाई दगडू भुसे (अमरावती), संजय प्रमीला दुलीचंद राठोड (यवतमाळ), उदय स्वरुपा रविंद्र सामंत (रत्नागिरी), जयकुमार नयनकुवर जितेंद्रसिंह रावल (धुळे), पंकजा प्रज्ञा गोपीनाथ मुंडे (जालना), अतुल लिलावती मोरेश्वर सावे (नांदेड), अशोक जनाबाई रामाजी वुईके (चंद्रपूर), शंभुराज विजयादेवी शिवाजीराव देसाई (सातारा), ॲड. आशिष मिनल बाबाजी शेलार (मुंबई उपनगर), दत्तात्रय गिरीजाबाई विठोबा भरणे (वाशिम), शिवेंद्रसिंह अरुणाराजे अभयसिंहराजे भोसले (लातूर), ➪(पान २ वर)



**राज्यात 15 ऑगस्ट रोजी 9.05 वाजता ध्वजारोहणाचा शासकीय समारंभ**

# शक्तिपीठ महामार्ग रद्द करा, अन्यथा लढा अटळ

**सांगली/प्रतिनिधी-** राज्य सरकारच्या नियोजित शक्तिपीठ महामार्गाला होणारा विरोध आता अधिक तीव्र झाला आहे. या प्रकल्पाविरोधात महाविकास आघाडीने आक्रमक पवित्रा घेतला असून, सांगलीत आयोजित करण्यात आलेल्या संयुक्त पत्रकार परिषदेत राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरद पवार गट) नेते जयंत पाटील यांनी सरकारवर टीकास्त्र सोडले आहेत.



पत्रकार परिषदेत बोलताना जयंत पाटील यांनी मोर्चाची माहिती दिली. ते म्हणाले, शक्तिपीठ महामार्गाविरोधात जनतेच्या मनात तीव्र रोष आहे. जनतेच्या याच भावना सरकारपर्यंत पोहोचवण्यासाठी आणि या प्रकल्पाला विरोध करण्यासाठी २१ तारखेला सकाळी ११ वाजता सांगलीत भव्य मोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे. हा महामार्ग होउ नये यासाठी ज्या-ज्या भागातून हा रस्ता जाणार आहे, तिथे याआधीही अनेक मोर्चे काढण्यात आल्याची आठवण त्यांनी यावेळी करून दिली. या पत्रकार परिषदेत राजू शेट्टी यांनी अतिशय आक्रमक भाषेत राज्य सरकारवर निशाणा साधला. ते म्हणाले, आता आम्ही रस्त्यावरची लढाई लढणार आहोत. माझा न्यायव्यवस्थेवर विश्वास राहिलेला नाही. सरकारने आमच्याशी नाही, तर किमान शेतक-यांसोबत तरी चर्चा करायला हवी होती. प्रकल्पाच्या खर्चावर गंभीर आरोप करताना शेट्टी म्हणाले, जो रस्ता ४५ हजार कोटींमध्ये होणार होता, तो आता १ लाख १० हजार कोटी रुपयांत करायचा घाट घातला जात आहे. हे सर्व कशासाठी केले जात आहे, हे जनतेला कळत नाही का? मुळात हा शक्तिपीठ महामार्ग पूर्णपणे अनावश्यक आहे.➪(पान २ वर)






जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# अमरावतीत ‘हर घर तिरंगा’अंतर्गत भव्य तिरंगा रॅली





## -हजारो नागरिकांचा उत्स्फूर्त सहभाग

**अमरावती/प्रतिनिधीः-** देशभक्तीची भावना जनमानसात जागृत करण्यासह राष्ट्रध्वज तिरंग्याबद्दल आदर, अभिमान आणि आत्मीयता निर्माण करण्याच्या उद्देशाने अमरावती महानगरपालिकेच्या वतीने ‘हर घर तिरंगा’ उपक्रमांतर्गत बुधवारी (दि. १२ ऑगस्ट) भव्य तिरंगा रॅलीचे आयोजन करण्यात आले. दुपारी ४ वाजता नेहरू मैदान येथून उपस्थित मान्यवरांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवून रॅलीला सुरुवात झाली.

रॅलीने राजकमल चौक, जयस्तंभ चौक, मालवीय चौक आणि इर्विन चौक मार्गे शहरातून मार्गक्रमण करत संत ज्ञानेश्वर सांस्कृतिक भवन येथे समारोप केला. रॅलीदरम्यान जयस्तंभ चौक येथे राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. तसेच इर्विन चौक येथे विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

रॅलीमध्ये हजारो अमरावतीकरांसह महापालिकेचे अधिकारी-कर्मचारी, लोकप्रतिनिधी, व्यापारी, विविध शाळा-महाविद्यालयांतील विद्यार्थी, स्वयंसेवी संस्था तसेच सामाजिक संघटनांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.

तिरंगा हातात घेऊन देशभक्तीच्या घोषणांनी भारावलेल्या वातावरणात निघालेल्या या रॅलीने शहरात राष्ट्रप्रेमाचा उत्साह निर्माण केला. यावेळी उपस्थितांनी तिरंगा प्रतिज्ञा तसेच अवयवदानाची शपथ घेतली. विविध शाळांमधील विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर नृत्य सादर करून उपस्थितांची दाद मिळवली. रॅलीच्या समारोपावेळी रंगीबेरंगी तिरंगा फुगे आकाशात सोडण्यात आले.

‘हर घर तिरंगा’ उपक्रमांतर्गत १२ ते १५ ऑगस्ट २०२५ या कालावधीत विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून, तिरंगा रॅली हा त्यातील महत्त्वाचा उपक्रम ठरला. राष्ट्रध्वजाबद्दलचा आदर, अभिमान आणि राष्ट्रीय एकात्मतेची भावना नागरिकांपर्यंत पोहोचवण्यात रॅली यशस्वी ठरली.

महापौर श्रीचंद तेजवानी यांनी अमरावतीकरांना ‘हर घर तिरंगा’ उपक्रमात उत्स्फूर्तपणे सहभागी होण्याचे आवाहन केले. प्रत्येक नागरिकाने आपल्या घरावर तिरंगा फडकवून राष्ट्रध्वजाबद्दलचा आदर, अभिमान आणि देशप्रेमाची भावना व्यक्त करावी, असे त्यांनी सांगितले.

यावेळी महानगरपालिका आयुक्त डॉ. मंगेश गोंदावले यांनी उपस्थितांना संबोधित करताना ‘हर घर तिरंगा’ ही केवळ मोहीम नसून राष्ट्रध्वजाशी असलेले प्रेम, निष्ठा आणि अभिमान व्यक्त करण्याची संधी असल्याचे सांगितले.

रॅलीला महापौर श्रीचंद तेजवानी, आयुक्त डॉ.मंगेश गोंदावले, उपमहापौर सचिन भेंडे, स्थायी समिती सभापती अविनाश मार्डीकर, सभागृह नेता चेतन गावंडे, गटनेता नाना आमले, गटनेता डॉ.राजेंद्र तायडे, गटनेता शेख हमीद शेख वाहेद, झोन सभापती माधुरी ठाकरे, स्वाती कुलकर्णी, इस्माईल कासम लालुवाले, किशोर जाधव, खॉ आसिया अंजुम वहिद, विधी समिती सभापती स्नेहा लुल्ला व उपसभापती डॉ.मधुरा कहाळे, शहर सुधार समिती सभापती राधा कुरील व उपसभापती सुमती ढोके, माध्यमिक पुर्व माध्यमिक व तांत्रिक शाळा समिती सभापती ॲड.प्रिती हर्षल रेवणे व उपसभापती वंदना मडघे, महिला व बाल कल्याण समिती सभापती ममता आवारे व उपसभापती लता देशमुख, नगरसेवक, नगरसेविका, अतिरिक्?त आयुक्?त महेश देशमुख, अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक, उपायुक्त नरेंद्र वानखडे, उपायुक्त योगेश पिठे, महापालिका व पोलीस विभागाचे अधिकारी-कर्मचारी, विद्यार्थी तसेच विविध सामाजिक संघटनांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

# प्रदूषण नियंत्रण मंडळाची मनपाला शोकॉज नोटीस

## कोणार्क कंपनीमुळे वाढली अडचण -७ दिवसात मागितले उत्तर

**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरातील स्वच्छतेचा कंत्राट कोणार्क इन्फ्रा कंपनीला दिल्यानंतर सुरू असलेल्या वाद आणि आरोपांमुळे आता अमरावती महानगरपालिकेच्या अडचणीत आणखी भर पडली आहे. जैव वैद्यकीय कचरा विल्हेवाटीत झालेल्या अनियमिततेमुळे महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने मनपाला कारणे दाखवा नोटीस बजावली आणि सात दिवसाच्या आत उत्तर देण्याचे सांगीतले आहे.

प्रदूषण नियंत्रण मंडळाने शहरातील घनकचरा व्यवस्थापन आणि पर्यावरण नियमांच्या पालनाबाबत गंभीर आक्षेप नोंदवला आहे. जारी केलेल्या नोटीसमध्ये म्हटले आहे की, कोणार्क कंपनीच्या हलगर्जीपणामुळे पर्यावरणाचे मोठे नुकसान होत आहे.सोबतच शहरातील जैव वैद्यकीय कचरा म्हणजेच बायोमेडिकल वेस्टच्या योग्य विल्हेवाट बाबतही प्रश्न उपस्थित करण्यात आले आहेत.

### आधीच कोणार्कला ३.५० कोटींचा दंड

उल्लेखनीय बाब म्हणजे, यापूर्वीच साफसफाईच्या कामात अनियमितता आढळल्याने मनपाने कोणार्क कंपनीच्या कामाची चौकशी समितीमार्फत तपासणी केली होती. त्यावेळी कामातील त्रुटी आणि कोट्यवधींच्या आरोपांमुळे मनपाने कंपनीवर ३.५० कोटी रुपयांचा दंड ठोठावला होता.हा दंड कंपनीच्या बिलातून वसूल केला जाणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले होते. मात्र तरीही कंपनीच्या कामात विशेष सुधारणा झालेली नाही, असा आरोप आहे.

७ दिवसांच्या आत समाधानकारक उत्तर न दिल्यास पुढील कायदेशीर कारवाईचा इशारा मंडळाने दिला आहे. मनपाला आता योग्य उत्तर द्यावे लागणार आहे नाहीतर त्यांच्या अडचणी अजून वाढणार आहे. नियुक्त कंत्राटदारालाही यासाठी जबाबदार ठरवण्यात येणार आहे. सुकळी कंपोस्ट डेपो प्रकरणातील ४७ कोटीच्या दंडामुळे आधीच मनपावर दबाव आहे. अशात या नोटीस मुळे मनपाची अडचण अजून वाढली आहे.मनपावर आता जैव कचऱ्याच्या विल्हेवाटीपासून ते घनकचरा व्यवस्थापनापर्यंत अनेक प्रश्न उपस्थित झाले आहेत. स्थानिक स्वराज्य संस्था म्हणून पर्यावरण नियमांचे पालन करण्याची मुख्य जबाबदारी मनपाचीच असल्याने या नोटीस मुळे प्रशासनाची डोकेदुखी वाढली आहे. प्रदूषण मंडळाने दिलेल्या मुदतीत समाधान कारक स्पष्टीकरण न दिल्यास मनपा विरुद्ध थेट कायदेशीर कारवाई होऊ शकते. तसेच राष्ट्रीय हरित प्राधिकरण समोरही हा विषय जाण्याची शक्यता आहे. त्यामुळे आधीच आर्थिक आणि कायदेशीर अडचणीत असलेल्या मनपासाठी हा आणखी एक मोठा धक्का मानला जात आहे.

## १ व १० वरिल उर्वरित

### एकाच दिवशी अदानी

पायाभूत प्रकल्पांना प्रशासकीय पातळीवर वेगाने मार्ग मोकळा करून दिला जात आहे. सिमेंट टर्मिनलसाठी समुद्रकिनारी पायाभूत सुविधा आणि अमरावतीत नैसर्गिक गॅसचे जाळे उभारण्यासाठी आवश्यक जमीन उपलब्ध करुन दिल्या गेल्या आहेत. एकाच दिवशी दोन अदानी समूहाच्या प्रकल्पांसाठी निर्णय झाल्याने राज्य सरकारकडून अदानी समूहाच्या प्रकल्पांसाठी आवश्यक शासकीय प्रशासकीय प्रक्रिया वेगाने पूर्ण करून जमीन उपलब्ध करून देण्याची भूमिका पार पाडली जात आहे का, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

### राज्यात ३६ हजार

आहेत. असे असतानाही या भागांमध्ये कंपन्या बंद पडत आहेत. कंपन्या बंद होण्याची कारणे वेगवेगळी असू शकतात; मात्र एखादी कंपनी बंद पडल्यानंतर तिची जागा दीर्घकाळ तशीच पडून राहते, असे त्यांनी सांगितले.कंपनी बंद पडल्यानंतर तो प्लाट तसाच राहतो. नवीन उद्योग आणण्यासाठी जमीन उपलब्ध नाही, असे शासन सांगते. मात्र बंद पडलेल्या कंपन्यांच्या जागा उपलब्ध करून दिल्या तर नवीन उद्योगांना त्या ठिकाणी संधी देता येउ शकते, असा मुद्दा त्यांनी मांडला.कंपन्यांचे काही करार, कर्ज किंवा इतर कायदेशीर बाबी प्रलंबित असल्याने बंद पडलेल्या उद्योगांच्या जागा तातडीने नव्या उद्योगांना उपलब्ध होत नाहीत. त्यामुळे या प्रकरणांचे जलदगतीने निराकरण करून बंद पडलेल्या कंपन्यांच्या जागा नव्या उद्योगांसाठी उपलब्ध करून देण्याची आवश्यकता असल्याचे वाजे यांनी सांगितले.याच विषयावर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते आदित्य ठाकरे यांनीही सोशल मीडियावरून सरकारवर निशाणा साधला होता. महाराष्ट्रात ३६ हजार २११ खासगी कंपन्यांनी कामकाज बंद केले किंवा राज्यातून आपले कामकाज हलवले, असा दावा त्यांनी केला.

### कंपन्या बंदचा आकडा कुठून

उद्योगांना १०० टक्के, तर चंद्रपूरमधील उद्योगांना ८० टक्के प्रोत्साहन मिळते. आता गडचिरोली प्रमाणेच चंद्रपूर जिल्ह्यातील उद्योगांनाही १०० टक्के प्रोत्साहन देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. औद्योगिक क्षेत्रातील पायाभूत सुविधांसाठी ६५ कोटी रुपये, तर भद्रावती येथील एमआयडीसी येथे क्रिटिकल इन्फ्रास्ट्रक्चरसाठी ३६० कोटी रुपये मंजूर करण्यात आले आहेत. यामध्ये राज्य शासन १८० कोटी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ ९० कोटी आणि स्थानिक खनिज विकास निधीतून ९० कोटी रुपये देणार आहे.

**एमएसएमईसाठी २० टक्के जागा-**औद्योगिक क्षेत्रात सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांसाठी (एमएसएमई) २० टक्के जागा राखीव ठेवण्याचे धोरण निश्चित करण्यात आले आहे. चंद्रपूर जिल्ह्यातून काढून घेतलेले १८ भूखंड तातडीने एमएसएमईसाठी उपलब्ध करून देण्यात येतील, असे सामंत यांनी सांगितले. जिल्ह्यात उद्योग वाढले तरच बेरोजगारीचा प्रश्न सुटण्यास मदत होईल. त्यामुळे पायाभूत सुविधा वाढविण्यावर भर राहील. उद्योगांचे नुकसान होउ दिले जाणार नाही. कृषीआधारित उद्योगांनाही प्रोत्साहन देण्यात येईल. उद्योगांच्या परिसंस्थेत स्थानिकांना रोजगार मिळावा, यासाठी प्रयत्न केले जातील, असे त्यांनी स्पष्ट केले..मोठ्या उद्योगांना लघुउद्योगांकडून असलेल्या अपेक्षा जाणून घेण्यासाठी उद्योग प्रतिनिधींची स्वतंत्र बैठक घेण्यात येणार आहे. दावोस येथील जागतिक गुंतवणूक परिषदेत सामंजस्य करार झालेले न्यू एरा क्लीनटेक एनर्जी आणि ग्रेटा एनर्जी हे दोन उद्योग भद्रावती परिसरात आले असल्याची माहितीही त्यांनी दिली.

### दादाजी रेश्माबाई दगडू भुसे

जयकुमार कमल भगवानराव गोरे (सोलापूर), नरहरी सावित्रीबाई सिताराम झिरवाळ (हिंगोली), संजय शकुंतला पांडुरंग शिरसाट (छत्रपती संभाजीनगर), प्रताप इंदिराबाई बाबुराव सरनाईक (धाराशिव), भरत शिवाजी विठाबाई मारुती गोगावले (रायगड), मकरंद सुमन लक्ष्मणराव जाधव (पाटील) (बुलढाणा), नितेश निलम नारायण राणे (सिंधुदुर्ग), आकाश सुनिता पांडुरंग फुंडकर (अकोला), प्रकाश सुशिला आनंदराव आबिटकर (कोल्हापूर), आशिष उमादेवी नंदकिशोर जयस्वाल (गडचिरोली), माधुरी मिरा सतिश मिसाळ (भंडारा) ड?. पंकज कांचन राजेश भोयर (वर्धा), मेघना दिपक साकोरे-बोर्डीकर (परभणी) तसेच इंद्रनील अनिता मनोहर नाईक (गोंदिया) यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात येणार आहे.

### शक्तिपीठ महामार्ग रद्द

सरकार जाणीवपूर्वक आपली जबाबदारी टाळत आहे.

**मूलभूत सुविधांचा अभाव अन् टोलचा सुळसुळाट-** राज्यातील इतर प्रश्नांकडे लक्ष वेधताना शेट्टींनी सरकारला खडे बोल सुनावले. राज्यातील सरकारी दवाखान्यांची वाईट अवस्था जाउन बघा. सरकारकडून जनतेला साध्या मूलभूत सुविधाही मिळत नाहीत. दुसरीकडे, राज्यात हळूहळू टोल नाक्यांची संख्या एवढी वाढली आहे की, आता सरकारने नेमकं करायचं काय? असा संतप्त सवाल त्यांनी उपस्थित केला.

**मोर्चात झेन-झीचा सहभाग-** या आंदोलनात सर्वसामान्य शेतकरी आणि जनतेसोबतच तरुण पिढीही उतरणार असल्याचे शेट्टींनी स्पष्ट केले. आमच्या या मोर्चात झेन-झी म्हणजेच आजची तरुण पिढीही मोठ्या संख्येने सहभागी होणार आहे. समाजाप्रती आमचीही काही जबाबदारी आहे, त्यामुळे आम्ही मागे हटणार नाही. जोपर्यंत हा शक्तिपीठ महामार्ग रद्द होत नाही, तोपर्यंत आमचा लढा अटळ आहे, असा स्पष्ट इशारा राजू शेट्टी यांनी दिला.

### पाणीपुरवठ्याचा खड्डा ठरला

आली नसल्याचे तपासात निष्पन्न झाल्याचे पोलिसांनी सांगितले. कामाच्या ठिकाणी योग्य देखरेख आणि सुरक्षिततेची उपाययोजना करण्यात आली असती तर दुर्घटना टाळता आली असती, असा निष्कर्ष तपासातून समोर आल्यानंतर संबंधितांविरुद्ध कारवाई करण्यात आली. पोलिसांनी गुन्हा दाखल करून पुढील तपास सुरू केला आहे.

### अंजनगाव नगरपरिषदेच्या

कामांना गती देण्याच्या सूचना केल्या.

विशेष म्हणजे,नगरपरिषदेच्या प्रशासकीय काळात आमदार निधीतून अंजनगाव सुर्जी शहरासाठी मंजूर झालेल्या विविध विकासकामांना मंजुरी मिळूनही कामांमध्ये निर्माण झालेल्या अडथळ्यांचा मुद्दा बैठकीत ऐरणीवर आला. नगरपरिषदेच्या मंजुरीनंतर जवळपास एक वर्ष उलटूनही काही कामे रखडल्याने त्याबाबत आमदारांनी प्रशासनाकडून स्पष्टीकरण घेतले. या बैठकीनंतर संबंधित कामांना आता गती मिळण्याची शक्यता निर्माण झाली आहे. आढावा बैठकीस मुख्याधिकारी विजय लोहकरे, उपमुख्याधिकारी गोविंद त्रिपुरारी,आरोग्य सभापती प्रवीण नेमाडे, बांधकाम सभापती नईम बेग, शिक्षण सभापती रेहान बेग, नगरसेवक तथा गटनेते सुयोग खाडे, कपिल देशमुख, राजू अकोटकर, महेंद्र दिपटे, अविनाश ढेंगे, श्रीकांत जुनघरे, गजानन विजेकर, आशिक अन्सारी, पंकज मोदी, मो. राजाभाई, रुपाली देवगिरे, पूनम सुरज येऊल, सीमा गजानन विजेकर, सुनीता भास्कर बाळे, विकास पाटील येवले, सचिन पाटील गावंडे, यांच्यासह नगरपरिषदेचे अधिकारी, कर्मचारी व पत्रकार उपस्थित होते.बैठकीत शहरातील मूलभूत सुविधांशी संबंधित प्रश्न तातडीने मार्गी लावण्यावर भर देण्यात आला. त्यामुळे या आढावा बैठकीनंतर रखडलेल्या विकासकामांना प्रत्यक्षात किती गती मिळते, याकडे अंजनगाव सुर्जीकरांचे लक्ष लागले आहे.

**नगराध्यक्ष, उपनगराध्यक्ष अनुपस्थित-**

आमदारांनी नगरपरिषद मध्ये घेतलेल्या आढावा बैठकीत नगराध्यक्ष अविनाश गायगोले, उपनगराध्यक्षा प्रियंका मालठाणे,कॉंग्रेसच्या गटनेत्या सह जवळपास १५ नगरसेवक या बैठकीस अनुपस्थित राहिल्याने हा चर्चेचा विषय ठरला. शहरातील महत्वाच्या प्रश्नांवर चर्चा करण्यासाठी आयोजित बैठकीला अनेक लोकप्रतिनिधी उपस्थित नसल्याने त्यांच्या अनुपस्थितीबाबत उपस्थितांमध्ये चर्चा रंगली

### चांदूर बाजारात दुचाकीच्या

रोकड असलेली पिशवी दुचाकीच्या डिक्कीत ठेवून ते दुकानाकडे रवाना झाले. दुकानात पोहोचल्यानंतर दुचाकीची डिक्की उघडी असल्याचे त्यांच्या लक्षात आले. डिक्कीत ठेवलेली पिशवी दिसत नसल्याने त्यांनी शोधाशोध केली. मात्र, रोकड मिळून आली नाही.घटनेची माहिती त्यांनी दुकानमालकाला दिली. त्यानंतर पोलिसांत तक्रार करण्यात आली. बँकेतून रोकड काढल्यापासून दुकानापर्यंतच्या मार्गावर चोरट्याने पाळत ठेवली होती का, तसेच डिक्की नेमकी कुठे उघडण्यात आली, या दिशेने चांदूर बाजार पोलिस तपास करीत आहेत. अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून, परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासले जात आहेत.

### हेड कॉन्स्टेबल अमित खंडारेंची

शाळेसाठी घराबाहेर पडल्या. त्यानंतर वरच्या मजल्यावर अमित खंडारे एकटेच होते. सकाळी साडेसात ते आठच्या दरम्यान त्यांनी पत्नीच्या स्कार्फच्या सहाय्याने गळफास घेतल्याचे प्राथमिक तपासात समोर आले आहे. काही वेळाने कुटुंबीयांच्या हा प्रकार लक्षात आल्यानंतर त्यांनी पोलिसांना माहिती दिली. खंडारे यांची १९ जून रोजी वाहतूक शाखेतून शहर कोतवालीत बदली झाली होती. त्यानंतर २२ जून रोजी त्यांना पोलिस मुख्यालयात रिफ्रेशर कोर्ससाठी पाठविण्यात आले होते. सेवेत असतानाच त्यांनी घेतलेल्या या टोकाच्या निर्णयाने सहकाऱ्यांनाही धक्का बसला आहे.

### इर्विन चौकात पोलीस आयुक्त

ओला यांनी वाहतूक विभागाचे एसीपी खबाले, पोलिस निरीक्षक गावंडे आणि पोलिस निरीक्षक सिरसाट यांना घटनास्थळी बोलावून घेतले. वाहतुकीचा खोळंबा होत असताना यंत्रणा नेमकी काय करत आहे, असा सवाल करीत त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना जाब विचारला.

वाहतूक कोंडीचा प्रत्यक्ष अनुभव घेतल्यानंतर पोलिस आयुक्तांनी काही काळ स्वतः रस्त्यावर उभे राहून वाहनांची ये-जा नियंत्रित केली. चौकातील वाहतुकीचे नियोजन, वाहनांची शिस्त आणि कर्मचाऱ्यांची कार्यपद्धती याची त्यांनी प्रत्यक्ष पाहणी केली. त्यामुळे कर्तव्यावर असलेल्या कर्मचाऱ्यांमध्येही एकच खळबळ उडाली.

वाहतूक व्यवस्थेबाबत कोणतीही हयगय सहन केली जाणार नाही, असा स्पष्ट संदेश पोलिस आयुक्तांनी दिला. शहरातील प्रमुख चौकांवर तैनात असलेल्या कर्मचाऱ्यांनी सतर्क राहावे, वाहतूक कोंडी होण्यापूर्वीच परिस्थितीचा अंदाज घेऊन उपाययोजना कराव्यात आणि नागरिकांना विनाकारण त्रास होणार नाही, याची दक्षता घ्यावी, असे निर्देश त्यांनी दिले. वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कारवाई करताना नागरिकांशी संयमाने वागण्याच्या सूचनाही देण्यात आल्या. काही दिवसांपासून सिग्नलवर थांबलेल्या वाहनचालकांवर कथित मनमानी पद्धतीने चालान कारवाई होत असल्याच्या तक्रारींच्या पार्श्वभूमीवर पोलिस आयुक्तांनी कर्मचाऱ्यांना विशेष सूचना दिल्या. नियमांचे पालन करण्यासाठी आधी जनजागृती आणि योग्य मार्गदर्शनावर भर देण्याचेही त्यांनी स्पष्ट केले. शहरातील वाहतूक शिस्तीसाठी पोलिस प्रशासनाकडून जनजागृती मोहीम राबविली जात आहे. दुचाकीस्वारांनी हेल्मेट आणि चारचाकी वाहनचालकांनी सीट बेल्टचा वापर करावा, असे आवाहन करण्यात येत आहे. पोलिस आयुक्तांच्या अचानक पाहणीमुळे शहरातील वाहतूक व्यवस्थेकडे आता वरिष्ठ अधिकाऱ्यांचे थेट लक्ष असल्याचे स्पष्ट झाले आहे. आगामी काळातही प्रमुख चौकांवर अशाच प्रकारच्या अचानक पाहण्या होण्याची शक्यता आहे.

### मशिदीत मध्यरात्री तरुणाचा

तो नमाजस्थळी झोपून राहिला. त्यानंतर अचानक त्याने मशिदीतील खिडक्या आणि दरवाज्यांच्या काचा फोडण्यास सुरुवात केली. मध्यरात्रीच्या शांततेत काचा फुटण्याचा आवाज घुमल्याने नागरिकांनी घटनास्थळी धाव घेतली. नागरिकांनी रविला ताब्यात घेत पोलिसांना माहिती दिली. फ्रेजरपुरा पोलिसांनी तत्काळ घटनास्थळी पोहोचून तरुणाला पोलिस ठाण्यात आणले. त्याने मशिदीत प्रवेश करून तोडफोड करण्यामागे नेमके काय कारण होते, याचा तपास पोलिस करीत आहेत.घटनेनंतर परिसरात काही काळ खळबळ उडाली होती. मात्र पोलिसांनी वेळीच हस्तक्षेप केल्याने परिस्थिती नियंत्रणात आली. या प्रकारामागील कारण तसेच तरुणाची मानसिक अवस्था यासह विविध शक्यतांचा तपास फ्रेजरपुरा पोलिसांकडून सुरू आहे.

### अचलपूर मतदारसंघातील

मागणीही यावेळी आमदार प्रवीण तायडे यांनी मंत्री गोरे यांच्याकडे केली. अचलपूर मतदारसंघातील प्रत्येक गावाचा सर्वांगीण विकास व्हावा, ग्रामीण भागातील नागरिकांना आणि प्रलंबित दर्जेदार मूलभूत सुविधा उपलब्ध व्हाव्यात आणि प्रलंबित विकासकामांना गती मिळावी, या उद्देशाने शासनस्तरावर सातत्याने पाठपुरावा सुरू असल्याचे यावेळी आ.प्रवीण तायडे यांनी सांगितले. ग्रामीण भागातील रस्ते व पूल हे नागरिकांच्या दैनंदिन जीवनासोबतच शेती, शिक्षण, आरोग्य आणि स्थानिक अर्थव्यवस्थेच्या दृष्टीने महत्त्वाचे असल्याने या कामांना प्राधान्य देण्याची मागणी आमदार प्रवीण तायडे यांनी राज्याचे ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांच्याकडे करण्यात आली. या चर्चेदरम्यान ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांनी अचलपूर मतदारसंघातील विकासकामांबाबत सकारात्मक प्रतिसाद देत आवश्यक ते सहकार्य करण्याचे आश्वासनही दिले. त्यामुळे आ.प्रवीण तायडे यांच्या पाठपुराव्यामुळे आगामी काळात मतदारसंघातील विविध ग्रामीण विकासकामांना निधी व प्रशासकीय प्रक्रियेतून गती मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

### ट्रक अपघातात दोन महिलांचा

आले होते, मात्र आतापर्यंत करण्यात आलेल्या चौकशीची माहिती संबंधित कुटुंबियांना अद्याप मिळालेली नाही. यामुळे संतप्त नागरिक आणि मृतकांच्या नातेवाईकांनी आज बुधवार १२ ऑगस्ट रोजी जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक देऊन निवेदन दिले. निवेदनात म्हटले आहे की, अपघातास कारणीभूत असलेल्या ट्रकचे परमीट तात्काळ रद्द करावे. चालकाकडे वैध परवाना आणि वाहनासंबंधी कागदपत्रे होती का याचीही चौकशी व्हावी. मृतकांच्या परिवाराला प्रत्येकी ५० लाख रुपयांची मदत द्यावी. शहरात हेल्मेटसह इतर वाहतूक नियमांची कडक अंमलबजावणी व्हावी.

निवेदनकर्त्यांनी आरोप केला की, शहरात २०० रुपयात निकृष्ट दर्जाचे हेल्मेट सर्रास विकले जात आहेत. केवळ पोलिसांच्या दंडाच्या भीतीने नागरिक हेल्मेट खरेदी करतात, मात्र अपघाताच्या वेळी ते सुरक्षितता देत नाहीत.

विशेष म्हणजे अपघातातील दोन्ही महिलांनी हेल्मेट घातले होते, तरीही त्यांचा जीव वाचू शकला नाही.नियम पाळून ही जर जीव जाणार असेल तर नागरिकांनी नियम पाळायचे कशासाठी?’ असा संतप्त सवाल यावेळी उपस्थित करण्यात आला.शहरातील वेलकम पॉईंट परिसरातील मुख्य रस्त्यावर उड्डाणपूल झाल्याने होणारी वाहतूक कोंडी, विनापार्किंग आणि अनधिकृत उभे राहणारे वाहनांवर कारवाई, तसेच टू-व्हीलर थेट कारवाईची मागणीही करण्यात आली आहे.नो-एंट्रीत अवजड वाहने, खाजगी बस, पीएमपी आणि निकृष्ट हेल्मेट विक्रीवर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी कुटुंबीयांनी केलेली आहे.

### मुथूट फिनकॉर्पच्या कार्यालयाचा

पंचम शिरसाट हे तिघे चौकशी दरम्यान फिनकॉर्प कंपनीच्या कार्यालयात हजर होते. पोलिस संरक्षणात कार्यालय सुरू करून पाहणी केली. मुथूट फिनकॉर्प व्यवस्थापक शुभम रवींद्र वासेवाय, सूरज अनिल खैरकार आणि धीरज पंचम शिरसाट या तिघांवर कोट्यवधींचा अपहार केल्याचा आरोप आहे. प्राथमिक तक्रारीत ७०० ग्रॅम सोने आणि ४७ लाख रुपये रोख रक्कमेचा घोटाळा झाल्याचा उल्लेख आहे. ग्राहकांच्या तक्रारीनंतर हा आकडा आणखी वाढण्याची शक्यता पोलिसांनी व्यक्त केली आहे.तक्रारीनुसार, शुभम व त्याच्या टीमने ग्राहकांकडून सोने तारण ठेवून कंपनी कडून कर्ज मिळवून दिले. मात्र त्यापैकी काही ग्राहकांचे तारण असलेले दागिने व हफ्त्याची रक्कम कंपनीच्या रेकॉर्डवरच उपलब्ध नसल्याचे समोर आले. शिवाय कर्जाचे हप्ते भरणाऱ्या ग्राहकांना शुभमने संगणक सिस्टिम मध्ये बिघाड असल्याचे सांगून बनावट पावत्या दिल्याची बाबही तपासात उघड झाली आहे. पोलिस उपायुक्त श्याम घुगे यांच्या माहितीनुसार, मुथूट फिनकॉर्पच्या संगणकातील डेटा आता पोलिसांकडून तपासला जात आहे.अपहार प्रकरणातील मुख्य आरोपी शुभम वासेवायसह त्याचे दोन साथीदार सध्या १३ ऑगस्टपर्यंत कोतवाली पोलिसांच्या कोठडीत आहेत. शुभमने तारण ठेवलेल्या सोन्यापैकी आतापर्यंत ९० ग्रॅम सोने दोन सुवर्णकारां कडून पोलिसांनी जप्त केले आहे.या प्रकरणी सोने तारण ठेवलेल्या एका सुवर्णकाराला कोतवाली ठाण्यात चौकशी साठी बोलविण्यात आले होते.

**महिला कर्मचाऱ्याला अटकपूर्व जामीन-** या प्रकरणात एका महिला कर्मचाऱ्याने अटकेच्या भीतीने अंतरिम अटकपूर्व जामीन मिळविला आहे.सध्या पोलीस या प्रकरणातील सर्व बाजूंनी तपास करत असून अपहाराची नेमकी रक्कम आणि इतर सहभागींचा शोध घेत आहेत.

# ‘भारतरत्न’साठी तिवस्यात उपोषणाची धग चौथ्या दिवशीही कायम

## अमरावती, वर्धा जिल्ह्यातील गुरुदेव सेवा मंडळे आंदोलनस्थळी दाखल



**तिवसा/प्रतिनिधीः-** राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांना देशाचा सर्वोच्च नागरी सन्मान ‘भारतरत्न’ प्रदान करण्यात यावा, या प्रमुख मागणीसाठी तिवसा तहसील कार्यालय परिसरात सुरू असलेल्या बेमुदत अन्नत्याग आंदोलनाची धग चौथ्या दिवशीही कायम आहे. सातही उपोषणकर्त्यांची तब्बेत खालावली असून प्रत्येक ४ किलो वजन घटले आहे. तर अन्नत्याग करणारे रमेश बोके यांची तब्बेतीमुळे उपोषण मंडपात चिंता व्यक्त केली जात आहे.

चौथ्या दिवशी तिवसा तहसीलदार मयूर कळसे, नायब तहसीलदार नरेंद्र कुरळकर यांनी उपोषणकर्त्यांची सकाळी भेट घेतली. दरम्यान जिल्हाधिकारी यांच्या मार्फत केंद्र शासनाकडे पत्र व्यवहार केल्याची माहिती त्यांनी दिली. तर उपोषणकर्त्यांच्या तब्बेतीची विचारपूस केली आणि अन्नत्याग आंदोलनातून माघार घेण्याची विनंती केली. मात्र, केंद्र शासनाकडून जोपर्यंत लेखी आश्वासन दिले जात नाही. तोपर्यंत आंदोलनातून माघार घेणार नसल्याची भूमिका उपोषणकर्त्यांनी घेतली आहे.

या मागणीसाठी रमेशराव बोके, मुकुंद पुनसे, जयकुमार बोके, मनोहरराव साबळे, हैबतराव गाडगे, जगनराव साबळे, शफीक शहा हे बेमुदत अन्नत्याग आंदोलन करत असून, सामाजिक कार्यकर्ते प्रशांत कांबळे, निर्मला लांजेवार, दिनेश भोंबे, केशव पांडे, अशोकराव ढगे, शैलेश रामटेके, सुदर्शन विघ्ने, मनोज दिगांबरे, अमर वानखडे, नरेश भोयर हे साखळी उपोषणाला बसले आहे.श्री.गुरुदेव सेवामंडळ शिरजगाव मोझरी, युवा स्वाभिमान पार्टी, प्रहार जनशक्ती पक्ष, गुरुदेव सेवा मंडळ भारसवाडा , कलावंत व साहित्यिक आधार संघ अमरावती, डॉक्टर्स असोसिएशन तिवसा, श्री.महात्मा फुले पाणी वापर संस्था दापोरी खुर्द, शिवसेना (उबाठा), राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी, शेतकरी न्याय हक्क विचार मंच, मराठी पत्रकार संघ तिवसा, भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस कमिटी तिवसा यांनी जाहीर पाठिंबा दर्शवला आहे.

**अब्बू घर चलो....**

मंगळवारी ८ वर्षाची मरियम शहा आज अचानक आपल्या मोठ्या वडिलांसोबत उपोषण मंडपात पोहचली. गेले तीन दिवस वडिल शफीक शहांच्या आठवणीत घरी रडत होती. मरियम जशी उपोषण मंडपात पोहचली तसाच तिने हंबरडा फोडला अब्बू घर चलो म्हणत ढसाढसा रडली. तिचे वडील शफीक शहा हे गेल्या तीन दिवसांपासून वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांना भारतरत्न पुरस्कार मिळावा या मागणीसाठी बेमुदत अन्नत्याग आंदोलन करत आहे. या आंदोलनात वडील आणि मुलीच्या नात्यातील प्रेमाची प्रचिती सुद्धा दिसून आली.

# जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

अकोला । वाशिम । बुलडाणा

■ गुरुवार, १३ ऑगस्ट २०२६ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४

paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com


# डॉक्टरचे सार्वजनिक रस्त्यावर अतिक्रमण



■ प्रतिनिधी | वाशिम ■

शहरातील बाकलीवाल कॉलनी या गृहनिर्माण संस्थेमध्ये दोन डॉक्टरांनी बेकायदेशीरपणे व्यावसायिक संकुले उभारल्याचा प्रकार समोर आला आहे. एकाने दवाखाना तर दुसऱ्याने इलेक्ट्रिक बाईकचे शोरूम सुरू करण्याचा घाट घातला आहे. यातील एका डॉक्टरने तर रहदारीच्या रस्त्यावरच पत्र्याचे शेड उभारून सार्वजनिक जागा अडवली आहे. मात्र, तीन वर्षांपासून सुरू असलेल्या या अतिक्रमणाकडे नगरपालिका प्रशासन डोळेझाक करत असल्याचा आरोप नागरिक करत आहेत.

## नगरपालिकेकडून झोपेचे सोंग

बाकलीवाल कॉलनीला गृहनिर्माण संस्थेची परवानगी केवळ निवासी घरांसाठी देण्यात आली होती. नियमांनुसार येथे कोणत्याही प्रकारचा व्यावसायिक वापर करता येत नाही. तरीही या दोन डॉक्टर महाशयांनी संस्थेच्या जागेत राजरोसपणे व्यापारी संकुल उभारले आहे.

यातील एका डॉक्टरने बांधकाम साहित्य आणि इतर सामान ठेवण्यासाठी थेट सार्वजनिक रस्त्यावर पत्र्याचे मोठे शेड टाकले आहे. त्यामुळे त्या मार्गावरील वाहतुकीला अडथळा निर्माण होत आहे. पादचारी आणि शालेय मुलांना ये-जा करण्यासाठी त्रास सहन करावा लागत आहे. स्थानिक नागरिकांचे म्हणणे आहे की, नगरपालिका प्रशासन शहरातील इतर ठिकाणी गरीब फेरीवाल्यांच्या आणि छोट्या व्यावसायिकांच्या टपऱ्या अतिक्रमण म्हणून तत्काळ हटवते. मात्र, प्रभावशाली व्यक्तीने गेल्या तीन वर्षांपासून रस्ता अडवून केलेले अतिक्रमण मात्र प्रशासनाला दिसत नाही. येथे नगरपालिका धृतराष्ट्राची भूमिका घेत असल्याची टीका नागरिकांकडून होत आहे. या प्रकरणी कोणतीही कारवाई न झाल्याने नागरिकांमध्ये संताप आहे. नियम सर्वांसाठी समान असायला हवा. जर सामान्य नागरिकांचे अतिक्रमण हटवले जाते, तर या डॉक्टरांवर कारवाई का होत नाही, असा सवाल नागरिक विचारत आहेत. प्रशासनाने तातडीने या बेकायदेशीर बांधकाम आणि रस्त्यावरील अतिक्रमणावर कारवाई करावी, अशी मागणी बाकलीवाल कॉलनीतील रहिवाशांनी केली आहे.



बाकलीवाल कॉलनीत नियम धाब्यावर

रहिवाशांचा संताप, नगरपालिकेच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह

बाकलीवाल कॉलनीत बेकायदेशीर व्यापारी संकुल?

डॉक्टरांचा दवाखाना आणि ई-व्हेईकल शोरूम सुरु

गृहनिर्माण संस्थेत व्यावसायिक संकुलाचे बांधकाम

नगरपालिकेची डोळेझाक की अर्थपूर्ण दुर्लक्ष?

# सिटी हॉस्पिटल प्रकरणी डॉ. निलेश बढे यांना तीन दिवसांत खुलासा सादर करण्याचे आदेश

**– रुग्णालयाचा परवाना रद्द असतानाही फलक, वैद्यकीय सेवा सुरू असल्याची तक्रार**
**– जिल्हा शल्यचिकित्सकांकडून मुद्देनिहाय खुलासा मागविला**

■ प्रतिनिधी | वाशिम ■

शहरातील पुसद नाका ते हिंगोली नाक्यादरम्यानच्या रस्त्यावरील एका रुग्णालयात उपचार सेवा सुरू असल्याचा आभास निर्माण होऊन अशा स्वरुपातील फलक व जाहिरातील लावल्याच्या आरोपावरून जिल्हा शल्यचिकित्सकांनी ११ ऑगस्ट रोजी संबंधित डॉक्टरला नोटीस बजावली असून, तीन दिवसांत खुलासा सादर करण्याचे निर्देश दिले आहेत.

भागवत ज्ञानबा हिरवे (ब्राह्मणवाडा, ता. जि. वाशिम) यांनी 'आपले सरकार'च्या माध्यमातून केलेल्या तक्रारीनुसार, पुसद नाका, हिंगोली रोड येथील सिटी हॉस्पिटल अँड पॉलीक्लिनिक संदर्भात प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने जिल्हा शल्यचिकित्सक कार्यालयाने डॉ. निलेश एस. बढे यांना तीन दिवसांच्या आत मुद्देनिहाय स्वयंस्पष्ट खुलासा सादर करण्याचे आदेश दिले आहेत.

सदर रुग्णालयाचा परवाना रद्द करण्यात आलेला असतानाही रुग्णालय सुरू असल्याचा आभास निर्माण होईल अशा पद्धतीने फलक व जाहिराती लावण्यात येत असल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. तसेच 'सिटी हॉस्पिटल डॉक्टर बढे' व 'डॉक्टर बढे सर्जन' अशा स्वरूपाचे फलक असल्याचेही तक्रारीत नमूद आहे.

याशिवाय, सदर ठिकाणी रुग्णांना वैद्यकीय सेवा, बाह्यरुग्ण तपासणी, उपचार अथवा शस्त्रक्रिया केली जात असल्याचा तसेच डॉ. बढे हे शासकीय सेवेत कार्यरत असताना खासगी वैद्यकीय व्यवसाय करीत असल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. त्यामुळे सर्वसामान्य नागरिकांची दिशाभूल होत असल्याचेही तक्रारदाराने नमूद केले आहे.

या पार्श्वभूमीवर जिल्हा शल्यचिकित्सकांनी डॉ. बढे यांच्याकडून सहा प्रमुख मुद्द्यांवर खुलासा मागविला आहे. सिटी हॉस्पिटलशी त्यांचा नेमका संबंध काय आहे, रुग्णालयाचा परवाना रद्द झाल्यानंतर तेथे कोणत्याही प्रकारची वैद्यकीय सेवा किंवा उपचार सुरू आहेत का, तसेच संबंधित फलक व जाहिराती लावण्यात आल्या आहेत का, याबाबत स्पष्टीकरण मागविण्यात आले आहे.





तसेच शासकीय सेवेत कार्यरत असताना खासगी वैद्यकीय व्यवसाय किंवा क्लिनिक चालविले जात आहे का, तक्रारीत नमूद केल्याप्रमाणे मुख्यालय सोडून खासगी वैद्यकीय व्यवसाय केला जातो का, याबाबतही स्पष्ट खुलासा सादर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

आपल्या म्हणण्याच्या समर्थनार्थ रुग्णालयाचा परवाना, नोंदणी, परवाना रद्द आदेश, फलक अथवा जाहिराती तसेच वैद्यकीय सेवा बंद किंवा सुरू असल्यासंदर्भातील कागदपत्रांच्या सत्यप्रती सादर करण्यासही सांगण्यात आले आहे.

सदर पत्र प्राप्त झाल्यापासून तीन दिवसांच्या आत खुलासा व संबंधित कागदपत्रे सादर करावीत, असे जिल्हा शल्यचिकित्सकांनी स्पष्ट केले आहे. विहित मुदतीत खुलासा प्राप्त न झाल्यास पुढील आवश्यक कार्यवाही करण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला आहे

# वन कर्मचाऱ्यांच्या भयान निवासस्थानांची पुनर्बांधणी करून कर्मचाऱ्यांना मुख्यालयी राहणे बंधनकारक करा



■ प्रतिनिधी | मंगरुळपीर ■

तालुक्यातील सावरगांव कान्होबा हे वन बीट कारंजा आणि मानोरा वनपरिक्षेत्र अधिकारी यांच्या कार्यकक्षेत विभागले गेले आहे. या वनबीटात ८०० हेक्टरपेक्षा अधिक समृद्ध वनसंपदा असून त्याच्या संरक्षणासाठी नेमण्यात आलेल्या वन कर्मचाऱ्यांची निवासस्थाने मागील २५ ते ३० वर्षांपासून उजाड व अतिक्रमित झाली आहेत. त्यामुळे वन कर्मचारी मुख्यालयी राहत नसल्याने वनसंपदा आणि वन्यप्राणी चोरांच्या रडारवर आले आहेत. सोबतच्या छायाचित्रात दिसत आहे की, सन १९६० च्या सुमारास बांधण्यात आलेले हे निवासस्थान सध्या पूर्णतः मोडकळीस आले आहे. छतावर वडाचे झाड रुजले आहे, भिंती कोसळल्या आहेत, दरवाजे-खिडक्या गायब आहेत आणि आत कचरा व झाडी वाढली आहे.

**निवेदनातून केली मागणी :** या गंभीर बाबीकडे लक्ष वेधण्यासाठी पर्यावरण स्नेही जगदीश कमलाबाई धांदू जाधव, यांच्या वतीने उपवनसंरक्षक, वाशिम वनविभाग यांना निवेदन देण्यात आले आहे.

निवेदनात म्हटले आहे की, '८०० हेक्टरवरील मौल्यवान साग, बांबू व इतर वनसंपदेचे रक्षण करण्यासाठी २४ तास कर्मचारी उपस्थित असणे गरजेचे आहे. मात्र निवासस्थान नसल्याने कर्मचारी दूरवरून ये-जा करतात. याचा फायदा घेऊन अवैध वृक्षतोड, वन्यप्राण्यांची शिकार आणि लाकडांची तस्करी मोठ्या प्रमाणात वाढली आहे.'

**तातडीने पुनर्बांधणीची गरज :** वनसंपदा आणि वन्यप्राण्यांच्या प्रभावी संरक्षणासाठी सावरगांव कान्होबा येथील जर्जर निवासस्थान पाडून तेथे अद्यावत व सुसज्ज नवीन निवास इमारत बांधण्यात यावी. तसेच वनकर्मचाऱ्यांना मुख्यालयी निवास करणे बंधनकारक करण्यात यावे, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे. वन कर्मचाऱ्यांना राहण्याची सोय झाल्यास गस्त वाढेल, अवैध कृत्यांना आळा बसेल आणि शेकडो हेक्टर वनक्षेत्राचे खऱ्या अर्थाने संरक्षण होईल.

# जिल्ह्यात प्रतिबंधात्मक आदेश

■ प्रतिनिधी | वाशिम ■

श्रावण मासाची सुरुवात, स्वातंत्र्य दिन, नागपंचमी तसेच ईद-ए-मिलाद या सणांच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी जिल्हादंडाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी मुंबई पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३७ (१) (३) अन्वये संपूर्ण वाशिम जिल्ह्यात प्रतिबंधात्मक आदेश लागू केले आहेत. हे आदेश १३ ऑगस्ट २०२६ रोजी रात्री १२.०१ वाजेपासून ते २७ ऑगस्ट २०२६ रोजी रात्री १२ वाजेपर्यंत लागू राहतील. १३ ऑगस्टपासून श्रावण मास सुरू होत असून, १५ ऑगस्ट रोजी स्वातंत्र्य दिन साजरा करण्यात येणार आहे. तसेच १७ ऑगस्ट रोजी नागपंचमी आणि २६ ऑगस्ट रोजी ईद-ए-मिलाद साजरा करण्यात येणार आहे. श्रावण महिन्यातील प्रत्येक सोमवारी विविध भागांत कावड मिरवणुका काढण्यात येतात. या पार्श्वभूमीवर जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था राखणे सुलभ व्हावे, यासाठी पोलीस अधीक्षक, यांच्या पत्रानुसार हा प्रतिबंधात्मक आदेश जारी करण्यात आला आहे.

# अमानी ते रिठद या रस्त्याची तात्काळ दुरुस्ती करा; निवेदन सादर



■ प्रतिनिधी | मालेगाव ■

अमानी ते रिठद हा रस्ता अनेक गावांसाठी दळणवळणाचा अत्यंत महत्त्वाचा मार्ग आहे. या रस्त्यावरून शेलगाव, ओंकार गीर तसेच परिसरातील अनेक गावांतील नागरिक, शेतकरी, विद्यार्थी, रुग्ण आणि व्यापारी दररोज प्रवास करतात. मात्र, सदर रस्त्याची अवस्था अत्यंत दयनीय झाली असून ठिकठिकाणी मोठमोठे खड्डे पडले आहेत. त्यामुळे वाहनचालकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. खराब रस्त्यामुळे अनेक किरकोळ तसेच गंभीर अपघात घडले असून अनेक नागरिक जखमी झाले आहेत. एखादी मोठी जीवितहानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. या गंभीर समस्येबाबत परिसरातील नागरिकांनी यापूर्वी अनेक वेळा संबंधित विभागाकडे निवेदने देऊन रस्ता दुरुस्तीची मागणी केली. मात्र आजपर्यंत कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नाही. त्यामुळे नागरिकांमध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली आहे. पार्श्वभूमीवर शेलगाव बोन्दाडे येथील समस्त ग्रामस्थांनी व परिसरातील नागरिकांनी दिनांक १५ ऑगस्ट २०२६ रोजी जलसमाधी आंदोलन करण्याचा निर्णय घेतला आहे. हा निर्णय प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे घ्यावा लागत असून याची जबाबदारी संबंधित प्रशासनाची राहील त्यांच्या मागण्या पुढीलप्रमाणे आहेत.

# रेखाचित्रकार श्रीधर अंभोरे यांच्या अभिवादन कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन

■ प्रतिनिधी | वाशिम ■

जगप्रसिद्ध ज्येष्ठ, रेखाचित्रकार श्रीधर अंभोरे यांचे नुकतेच अल्पशा आजाराने जालना येथे वयाच्या ऐंशीव्या वर्षी दुःखद निधन झाले. वाशीम जिल्ह्याशी त्यांचे विशेष अनुबंध प्रस्थापित झाले होते. फुले, शाहू, आंबेडकर साहित्य संमेलन २००१, अस्मितादर्श साहित्य संमेलन २०१६ तसेच अनेक पुस्तकांच्या प्रकाशन सोहळ्याला त्यांची उपस्थिती होती. वाशीमला त्याची सातत्याने ये- जा होत असे, त्यामुळे वाशीमच्या साहित्य विश्वाशी त्यांचे संबंध जिव्हाळ्याचे आणि प्रेमाचे होते. वाशीमच्या अनेक



कवितासंग्रहासाठी मुखपृष्ठे आणि रेखाचित्रे त्यांनी दिली होती. जिल्हा शासकीय ग्रंथालय आणि प्रज्ञा साहित्य संघ जिल्हा वाशीमच्या संयुक्त विद्यमाने दि. १३ ऑगस्ट २०२६, गुरूवारी दुपारी तीन वाजता स्थानिक शासकीय ग्रंथालय वाशीम येथे, ज्येष्ठ कवी, शेषराव पिराजी धांडे यांच्या अध्यक्षतेखाली अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन केले आहे.

कलेच्या विविध प्रांतात परिक्रमा केली होती. महाराष्ट्रासह विदेशातही त्यांच्या रेखाचित्रांचा गौरव झाला होता. चेहरा नसलेल्या व्यवस्थेतील तळातल्या वंचित, पीडित माणसांचे दुःख, त्यांचे प्रश्न, त्यांचे विविध स्वभाव, माणूस आणि निसर्गाशी असलेले अनुबंध कसे जुळले गेले आहेत, याचे सर्जनशील भेदक रेखाचित्रे, रेखाटने त्यांच्या रेखाचित्रांचा विषय होता. ज्येष्ठ नाटककार, विजय तेंडुलकर यांनी त्यांच्या जीवनावर आधारित 'दिंडी' हा माहितीपट तयार केला होता.

# महापालिका सभागृहात 'बहुमतशाही'चा खेळ?

## सत्ताधाऱ्यांचा गोंधळ दुर्लक्षित, विरोधकांचा आवाज मात्र बंद! माईक हिसकावण्यापासून निलंबनापर्यंत 'दुहेरी न्याय'चा आरोप

■ विशेष प्रतिनिधी ■

**अकोला :** महानगरपालिकेच्या सभागृहातील मागील काही सभांच्या कामकाजावरून सत्ताधारी आणि विरोधी सदस्यांना वेगवेगळे निकष लावले जात असल्याचा आरोप होत आहे. विरोधी पक्षाचे सदस्य आपले मत मांडत असताना त्यांचा माईक हिसकावून घेणे, त्यांना बोलण्यापासून रोखणे तसेच त्यानंतर निर्माण झालेल्या गोंधळासाठी विरोधी सदस्यांवरच कारवाई केली जात असल्याची चर्चा आहे. या सर्व प्रकारामुळे महापौरांच्या सभागृह संचालनाच्या भूमिकेवरही प्रश्न उपस्थित होत आहेत.

विरोधी पक्षाचा सदस्य एखादा महत्त्वाचा मुद्दा मांडत असताना तो मुद्दा सत्ताधाऱ्यांसाठी अडचणीचा ठरणार असल्याचे लक्षात आल्यानंतर त्याला बोलू न देण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोप आहे. काही प्रसंगी बोलत असलेल्या सदस्याचा पोडियमवरील माईक हिसकावून घेण्यात आल्याचेही सांगितले जात आहे. हा प्रकार घडत असताना महापौरांनी सभागृहातील परिस्थितीवर नियंत्रण ठेवून संबंधित सदस्यांना शांत करण्याची अपेक्षा असताना त्यांनी हस्तक्षेप केला नसल्याची टीका होत आहे.

सभागृहाचे कामकाज शिस्तबद्ध आणि सुरळीतपणे चालविण्याची जबाबदारी महापौरांची असते. त्याचबरोबर सत्ताधारी पक्षानेही सभागृहात शिस्त राखण्याची जबाबदारी पार पाडणे अपेक्षित आहे. सत्ताधारी सदस्यांकडून गोंधळ होत असताना त्यांना आपल्या जागेवर शांत बसविण्याची भूमिका घेतली जात नाही, मात्र विरोधी सदस्यांनी प्रश्न उपस्थित केल्यानंतर त्यांना विविध कारणे सांगून गप्प बसविले जाते, असा आरोप विरोधकांकडून करण्यात येत आहे. विरोधी सदस्यांकडून सभागृहात जनतेच्या समस्या, विकासकामे आणि प्रशासनाच्या कारभारासंदर्भात प्रश्न उपस्थित केले जातात. त्यावर चर्चा होणे आणि योग्य सूचना असल्यास त्यांचे संज्ञान घेणे ही लोकशाही प्रक्रियेतील अपेक्षित बाब आहे. मात्र विरोधकांनी मांडलेल्या प्रत्येक मुद्द्याकडे राजकीय विरोध म्हणून पाहिले जात असल्यास त्याचा परिणाम सभागृहाच्या कामकाजावर होतो.



'आजवर झालेल्या तीन वेगवेगळ्या बैठकींमध्ये अपशब्दांचा वापर झाल्याच्या घटना घडल्या. मात्र, दुर्दैवाने केवळ विरोधी पक्षाच्या सदस्यांवरच कारवाई करण्यात आली. सत्ताधारी पक्षाच्या सदस्यांकडून अपशब्दांचा वापर झाल्यानंतरही त्यांच्यावर कारवाई होताना दिसत नाही. त्यामुळे महापौरांची भूमिका पक्षपाती असल्याची भावना निर्माण झाली आहे.

महापौरांकडून केवळ विरोधी सदस्यांवरच कारवाई केली जात आहे. निधी वितरणाच्या बाबतीत ज्या प्रकारे पक्षपात केला जात असल्याचा आरोप होत आहे, त्याचप्रमाणे सभागृहातील अपशब्दांच्या वापराबाबत कारवाई करतानाही पक्षपात केला जात असल्याचे दिसून येते. सभागृहातील नियम हे सत्ताधारी आणि विरोधकांसाठी समान असायला हवेत. कारवाई करायची असेल तर ती सर्वांवर समान निकषाने झाली पाहिजे. महापौरांनी पक्षपाती भूमिका न घेता निष्पक्षपणे निर्णय घ्यावा.'

**- निलोफर सोहेल खान**, नगरसेविका, काँग्रेस



मनपा सत्ताधारी भाजपाला भ्रष्टाचाराची सवय लागली आहे, यांच्या मलाई च्या विषयाबाबत विरोधी पक्षातील नगरसेवकांनी आवाज उठविला की हे त्यावर उत्तर देणे सोडून उलट नगरसेवकांवर निलंबनाची कारवाई करतात. महापौर ही खुर्ची संविधानिक रित्या कोण्या एका पक्षाची नाही, त्यांनी तरी त्या खुर्चीची तमा बाळगत असा पक्षपाती पणा न करता न्यायाची भूमिका ठेवावी. सत्ताधारी असो की विरोधी पक्षाचे नगरसेवक कारवाईचे नियम व निकष सर्वांसाठी एकच ठेवावे. सोबतच शहरात राहणारे नागरिक हे सर्वच जण मनपाचे विविध कर भरतात, त्यामुळे तिथे सत्ता किंवा विरोधी पक्षाचा नगरसेवक असा भेदभाव न करता नागरिक यांना केंद्रबिंदू ठेवत आवश्यकतेनुसार निधीचे वितरण करावे, भेदभाव करू नये.

**- सागर भारुका,** नगरसेवक शिवसेना ( शिंदे गट )



महापालिका सभागृहात सत्ताधारी आणि विरोधकांसाठी वेगवेगळे निकष असणे योग्य नाही. विरोधक बोलत असताना माईक हिसकावणे, त्यांचा आवाज दाबणे आणि त्यानंतर झालेल्या गोंधळासाठी केवळ विरोधकांवरच कारवाई करणे हा दुहेरी न्याय असल्याची भावना निर्माण करणारा प्रकार आहे. सभागृहात नियमभंग झाला तर कारवाई झालीच पाहिजे; मात्र ती सत्ताधारी असो वा विरोधक, सर्वांसाठी समान असावी. महापौरांनी कोणत्याही पक्षाचा विचार न करता निष्पक्षपणे सभागृह चालवणे अपेक्षित आहे. बहुमताच्या जोरावर विरोधकांचा आवाज दाबण्याऐवजी त्यांच्या प्रश्नांना उत्तर देणे, हीच खरी लोकशाही आहे.

**- सुनील ईन्नानी,** नगरसेवक, मनपा



अकोला मनपातील सर्वात भ्रष्ट नेता कोण, याची सर्वश्रुत माहिती अकोलेकरांना आहे. गेल्या तीन आयुक्तांनी संशयास्पद म्हणून प्रलंबित ठेवलेली जुनी देयके आता त्याच भ्रष्ट प्रवृत्तीच्या नेत्याच्या इशाऱ्यावर काढण्याचा प्रकार सुरू असल्याचा आरोप नगरसेवक विजय इंगळे यांनी केला. महापालिकेकडून दलित बांधवांवर अन्याय होत असून, दलित वस्ती निधीच्या वितरणातही मोठ्या प्रमाणात अनियमितता केली जात आहे. घनकचरा संकलनाच्या कंत्राटात मनपाचीच सर्व यंत्रसामग्री वापरली जाणार असून कंत्राटदार केवळ मनुष्यबळ पुरविणार आहे. त्यामुळे कंत्राटदार हा केवळ नावापुरता असून, प्रत्यक्षात कंत्राट सत्ताधारीच चालविणार असल्याची माहिती असल्याचा दावा इंगळे यांनी केला. सत्ताधारी भाजपच्या नगरसेवकांच्या प्रभागात निधी व विकासकामांना प्राधान्य, तर विरोधी पक्षाच्या प्रभागांकडे मात्र जाणीवपूर्वक दुर्लक्ष करण्याची कूटनीती सुरू आहे. अनेक भ्रष्टाचाराच्या विषयांना बहुमताच्या जोरावर मतदान करून मंजुरी दिली जात असल्याचा आरोपही त्यांनी केला. महापौर केवळ खुर्चीवर असून, सत्तेच्या चाव्या मात्र स्थायी समिती सभापती फिरवीत असल्याची टीका इंगळे यांनी केली. अकोलेकर जनता सुज्ञ असून महापालिकेतील सर्व प्रकार पाहत आहे. ४८ वरून ३८ वर आलेली सत्ताधारी नगरसेवकांची संख्या आगामी काळात आणखी घटेल आणि अकोलेकर जनता सत्ताधाऱ्यांना त्यांची जागा दाखवेल, असा इशाराही त्यांनी दिला.

**विजय इंगळे,** नगरसेवक, शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे गट)



महापालिका सभागृहात बहुमताचा वापर विरोधकांचा आवाज दाबण्यासाठी होऊ नये. सत्ताधारी असो किंवा विरोधक—सभागृहाचे नियम सर्वांसाठी समान असले पाहिजेत. माईक हिसकावणे, बोलण्यापासून रोखणे किंवा निलंबनाची कारवाई करताना दुहेरी निकष नकोत. महापौरांनी पक्षीय भूमिका न घेता निष्पक्षपणे सभागृह चालवावे; कारण लोकशाहीत बहुमत महत्त्वाचे असले तरी विरोधकांचा आवाजही तितकाच महत्त्वाचा आहे.'

**- निलेश देव,** गटनेते वंचित बहुजन आघाडी

### निलंबनाच्या कारवाईवरही प्रश्न

मागील सभेत नगरसेवक सागर भारुका यांनी अयोग्य भाषेचा वापर केल्याच्या कारणावरून त्याला १५ दिवसांसाठी निलंबित करण्यात आले होते. सभागृहातील शिस्त राखण्यासाठी कारवाई आवश्यक असल्यास ती करण्यास हरकत नाही. मात्र त्याच सभेत सत्ताधारी पक्षाच्या सभागृह नेत्याकडून शिवीगाळ झाल्याची चर्चा असतानाही त्यांच्यावर निलंबनाची कारवाई का करण्यात आली नाही, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. सभागृहातील नियम सर्व सदस्यांसाठी समान असणे अपेक्षित आहे. सत्ताधारी असो अथवा विरोधक, नियमभंग झाल्यास समान निकषांवर कारवाई झाली पाहिजे, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

महानगरपालिकेच्या मागील काही सभांचा आढावा घेतल्यास सत्ताधारी पक्षाच्या सदस्यांकडून गोंधळ झाल्यानंतरही त्याकडे दुर्लक्ष केले जाते, तर विरोधी सदस्यांनी कामाशी संबंधित मुद्दा मांडल्यानंतर त्यांना रोखण्याचा प्रयत्न होतो, असा आरोप केला जात आहे. त्यानंतर निर्माण झालेल्या वादासाठी विरोधी सदस्यांवरच निलंबनाची कारवाई होत असल्याचेही विरोधकांचे म्हणणे आहे. महापौर कोणत्याही पक्षाचे असले तरी सभागृहाच्या अध्यक्षस्थानी असताना त्यांची भूमिका निष्पक्ष असणे अपेक्षित आहे. सत्ताधारी आणि विरोधी पक्षातील सदस्यांना समान संधी आणि समान नियम लागू झाले पाहिजेत. त्यामुळे सभागृहातील कामकाजात पक्षीय राजकारणापेक्षा लोकशाही पद्धतीने चर्चा आणि सर्व सदस्यांना आपले मत मांडण्याची समान संधी मिळावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. बहुमताच्या जोरावर विरोधी सदस्यांचा आवाज दाबला जात असल्याची भावना निर्माण होणे हे महानगरपालिका सभागृहाच्या दृष्टीने योग्य नसून, या संदर्भात महापौरांनी स्पष्ट भूमिका घेण्याची गरज व्यक्त होत आहे.

# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक २५७ ■ गुरुवार, १३ ऑगस्ट २०२६ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.०० रु.


## पुलाचा प्रश्न ऐरणीवर
# सुलतानपूरकरांनी हिंगणघाट-नंदोरी मार्ग केला ठप्प

### लेखी आश्वासनानंतर आंदोलन मागे-१५ दिवसांत रस्त्याची दुरुस्ती, पुलाच्या कामाला गती देण्याचे अधिकाऱ्यांचे आश्वासन



**हिंगणघाट जनमाध्यम :** सुलतानपूर गावालगतच्या धोकादायक पुलाची उंची वाढवून नवीन पूल बांधावा आणि रस्त्याची तातडीने दुरुस्ती करावी, या मागणीसाठी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष अतुल वांदिले यांच्या नेतृत्वात नागरिकांनी बुधवारी हिंगणघाट–नंदोरी मार्गावर रास्ता रोको आंदोलन केले. आंदोलनामुळे या मार्गावरील वाहतूक सुमारे एक तास ठप्प झाली.

सुलतानपूर येथील पुलाची अवस्था अत्यंत खराब झाली असून, पुलावर मोठमोठे खड्डे पडले आहेत. पुलाची उंची कमी असल्याने पावसाळ्यात पाणी पुलावरून वाहते. त्यामुळे वाहनचालक व नागरिकांना जीव धोक्यात घालून प्रवास करावा लागत असल्याचा आरोप आंदोलनकर्त्यांनी केला.

आंदोलनाची माहिती मिळताच बांधकाम विभागाचे अधिकारी घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी आंदोलनकर्त्यांशी चर्चा करून मागण्या जाणून घेतल्या. येत्या १५ दिवसांत रस्त्याची आवश्यक दुरुस्ती तसेच पुलाची तातडीची कामे करण्यात येतील, असे लेखी आश्वासन अधिकाऱ्यांनी दिले. त्यानंतर आंदोलनकर्त्यांनी रास्ता रोको मागे घेतला.

आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर पोलिसांचा मोठा बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. मधुसूदन हरणे, महेश झोटिंग पाटील, दशरथ ठाकरे, अमोल बोरकर, प्रवीण श्रीवास्तव, सुनील भुते यांच्यासह सुलतानपूरमधील नागरिक मोठ्या संख्येने आंदोलनात सहभागी झाले.

# केळझरच्या विद्यार्थ्यांचे भविष्य 'बस'च्या प्रतीक्षेत
## दोन तास एसटीची वाट; बायपासवरून गाड्या पळविण्याचा आरोप

### महामंडळाच्या मनमानीला चाप कधी ? पालक-विद्यार्थ्यांचा संताप

**सेलू जनमाध्यम :** ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा गाडा रुळावर आणण्याची जबाबदारी शासनाची असताना, एसटीच्या अनियमित कारभारानेच या गाड्याला ब्रेक लागल्याचे चित्र केळझर येथे पाहायला मिळत आहे. बुधवारी सकाळी तब्बल दोन तास एसटीची वाट पाहत विद्यार्थ्यांना बसस्थानकावर ताटकळत उभे राहावे लागले. सकाळी ८ वाजता अपेक्षित असलेली बस तब्बल १० वाजता दाखल झाल्यानंतर विद्यार्थ्यांनी कसेबसे शाळा-कॉलेज गाठले. या प्रकाराने पालक आणि नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळली आहे.

केळझर व परिसरातील विद्यार्थ्यांसाठी एसटी वाहतूक ही जीवनवाहिनी आहे. मात्र बस गावात आली तर वेळेवर येत नाही आणि वेळ झाली तर बसचा पत्ताच नसतो, अशी संतप्त प्रतिक्रिया आता नागरिकांमधून उमटत आहे. विशेष म्हणजे, बसस्थानकावर कार्यरत असलेला महामंडळाचा कर्मचारी दररोज विद्यार्थ्यांची गर्दी पाहून बायपासवर जाऊन बस गावात आणण्याचा प्रयत्न करतो. वरिष्ठांकडे तोंडी तसेच लेखी तक्रारी करूनही परिस्थितीत बदल झालेला नसल्याचा आरोप आहे.

**बायपासवरून बस दामटून नेण्याचा आरोप**

नागरिकांच्या म्हणण्यानुसार, महामंडळाचा कर्मचारी बायपासवर उपस्थित नसेल तर काही चालक बस गावात न आणताच बायपासवरून पुढे निघून जातात. वरिष्ठांचे आदेश, परिपत्रके आणि नियम असतानाही त्यांची अंमलबजावणी होते की नाही, असा प्रश्न आता उपस्थित होत आहे.

एका बाजूला ग्रामीण विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी शासनाकडून विविध योजना जाहीर केल्या जातात; तर दुसरीकडे शाळेत पोहोचण्यासाठीच विद्यार्थ्यांना एसटीची दोन-दोन तास प्रतीक्षा करावी लागत असेल तर या योजनांचा उपयोग काय असा प्रश्न पालकांनी केला आहे.



**लोकप्रतिनिधींच्या डोळ्यांवरही एसटीचा पडदा**

केळझरच्या या प्रश्नाकडे स्थानिक लोकप्रतिनिधी आणि प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. निवडणुकीच्या काळात मतांसाठी दारोदारी फिरणारे नेते विद्यार्थ्यांच्या या मूलभूत प्रश्नावर मात्र मौन का बाळगतात असा प्रश्न आता गावकऱ्यांनी उपस्थित केला आहे. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असताना प्रशासनाने केवळ कागदी आदेश न काढता बससेवा वेळापत्रकानुसार सुरू आहे की नाही, चालक-वाहक गावात बस थांबवतात की नाही, याची प्रत्यक्ष तपासणी करावी, अशी मागणी पालकांनी केली आहे.

ग्रामीण मुलांना शिक्षणापासून वंचित ठेवायचे असेल तर तसे स्पष्ट सांगावे अन्यथा एसटीची सेवा सुरळीत करून विद्यार्थ्यांना न्याय द्यावा, असा इशारा केळझरवासीयांनी दिला आहे.

विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी सुरू असलेला हा खेळ आता थांबणार की पुन्हा आदेशांच्या कागदाखालीच दडणार, याकडे केळझरवासीयांचे लक्ष लागले आहे.

# उद्या महसूल मंत्र्यांचा वर्ध्यात जनसंवाद; नागरिकांच्या प्रश्नांवर थेट चर्चा

**वर्धा जनमाध्यम :** महाराष्ट्राचे महसूल मंत्री ना. चंद्रशेखर बावनकुळे यांचा जनसंवाद कार्यक्रम शुक्रवार, १४ ऑगस्ट रोजी वर्धा येथील जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित करण्यात आला आहे. दुपारी ३ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत होणाऱ्या या कार्यक्रमात जिल्ह्यातील नागरिकांच्या विविध समस्या, तक्रारी आणि मागण्यांवर थेट संवाद साधला जाणार आहे.

महसूल विभागाशी संबंधित तसेच इतर शासकीय कामकाजातील अडचणी नागरिकांना यावेळी मंत्र्यांसमोर मांडता येणार आहेत. आपल्या समस्या अथवा मागण्यांचे निवेदन सादर करू इच्छिणाऱ्या नागरिकांनी विषयाची स्पष्ट माहिती असलेले लेखी निवेदन आणि आवश्यक कागदपत्रे सोबत आणावीत, असे आवाहन करण्यात आले आहे.

जनसंवादाच्या माध्यमातून नागरिकांच्या प्रश्नांची प्रत्यक्ष माहिती घेऊन संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना आवश्यक त्या सूचना देण्यात येणार आहेत. त्यामुळे नागरिकांनी आपला प्रश्न स्पष्टपणे मांडून त्यासंबंधीची कागदपत्रे सादर करावीत, असे प्रशासनाकडून सांगण्यात आले आहे.

दरम्यान, कार्यक्रमात नागरिकांनी केवळ समस्या आणि निवेदने घेऊन उपस्थित राहावे. महसूल मंत्र्यांच्या स्वागतासाठी हार, पुष्पगुच्छ अथवा अन्य सत्काराचे साहित्य आणू नये, अशी विनंती स्वीय सहायक विपीन पिसे यांनी केली आहे. जिल्ह्यातील नागरिकांनी या जनसंवाद कार्यक्रमाचा लाभ घेत आपल्या प्रलंबित प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

# सरकारच्या दिरंगाईविरोधात बँक कर्मचारी रस्त्यावर; पाच दिवसांच्या कार्यसप्ताहासाठी निदर्शने

**वर्धा जनमाध्यम :** बँक कर्मचाऱ्यांसाठी पाच दिवसांचा कार्यसप्ताह लागू करण्याच्या मागणीसाठी बुधवारी वर्ध्यात बँक कर्मचारी रस्त्यावर उतरले. युनायटेड फोरम ऑफ बँक युनियन्सच्या नेतृत्वात रामनगर भागातील महावीर गार्डनसमोरील बँकेजवळ सुमारे २०० अधिकारी व कर्मचाऱ्यांनी निदर्शने करीत केंद्र सरकारच्या धोरणाचा निषेध केला.



देशभरातील सार्वजनिक क्षेत्रातील बँकांनी २७ जानेवारी २०२६ रोजी पाच दिवसांचा कार्यसप्ताह लागू करण्याच्या मागणीसाठी संप केला होता. मात्र, त्यानंतरही केंद्र सरकारने मागणीकडे दुर्लक्ष केल्याचा आरोप आंदोलनकर्त्यांनी केला.

दरम्यान, ८ मार्च २०२४ रोजी इंडियन बँक्स असोसिएशनसोबत झालेल्या बाराव्या द्विपक्षीय करारात पाच दिवसांचा कार्यसप्ताह लागू करण्याबाबत सहमती झाली होती. मात्र, २७ महिने उलटूनही यासंदर्भात अधिसूचना जारी झालेली नाही, असा आरोप कर्मचाऱ्यांनी केला. त्यामुळे बँक कर्मचाऱ्यांचा संयम आता संपला असून, सरकारने तातडीने निर्णय घ्यावा, अशी मागणी करण्यात आली.

इंडियन बँक्स असोसिएशन आणि वित्तीय सेवा विभागाकडून होत असलेल्या विलंबाचाही यावेळी निषेध करण्यात आला. आंदोलनाचे नेतृत्व वैभव लहाने, निलेश वहाने, वैभव लोखंडे, कपिल झामरे, अनिल रत्ताडे, प्रणय भारती, सुमंत गिरडकर, मयुर भेलकर व यशवंत पांडे यांनी केले.

# हिंगणघाटमध्ये तिरंग्याची गर्जना १४ ऑगस्टला निघणार भव्य बाईक रॅली
### युवकांसह कार्यकर्त्यांना सहभागी होण्याचे आवाहन

**हिंगणघाट जनमाध्यम :** स्वातंत्र्यदिनाच्या पार्श्वभूमीवर हिंगणघाट विधानसभा क्षेत्रातील भाजप कार्यकर्त्यांच्या वतीने १४ ऑगस्ट रोजी भव्य तिरंगा बाईक रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे. रॅलीच्या नियोजनासाठी आमदार समीर कुणावार यांच्या प्रमुख उपस्थितीत बैठक घेण्यात आली. रॅली यशस्वी करण्यासाठी कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले.

रॅलीला सकाळी १० वाजता नांदगाव चौरस्ता येथून सुरुवात होईल. तुकडोजी पुतळा, कारंजा चौक, विठोबा चौक, आंबेडकर चौक, नंदोरी चौक, सरकारी दवाखाना चौक आणि तहसील कार्यालय मार्गे रॅली कृषी उत्पन्न बाजार समिती परिसरात पोहोचेल. तेथे रॅलीचा समारोप होणार आहे.



बैठकीला भाजपा जिल्हा महामंत्री आकाश पोहाणे, विधानसभा प्रमुख संजय डेहणे, हिंगणघाट तालुका ग्रामीण अध्यक्ष विनोद विटाळे, शहर अध्यक्ष भूषण पिसे, समुद्रपूर मंडळ अध्यक्ष हेमंत राऊत यांच्यासह नगरसेवक, सरपंच आणि भाजपचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. तिरंगा बाईक रॅलीच्या माध्यमातून देशभक्तीचा संदेश जनतेपर्यंत पोहोचविण्याचा संकल्प करण्यात आला. नागरिक, युवक आणि कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन रॅलीची शोभा वाढवावी, असे आवाहन करण्यात आले.

### जन्मदाखला ठरला निर्णायक
# अल्पवयीन मुलीशी विवाह करणाऱ्या युवकावर गुन्हा

**वर्धा जनमाध्यम :** अल्पवयीन मुलीसोबत प्रेमसंबंध प्रस्थापित करून तिच्याशी विवाह केल्याप्रकरणी देवळी पोलिसांनी एका युवकाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. पीडित मुलीच्या वडिलांनी दिलेल्या तक्रारीवरून १० ऑगस्ट रोजी ही कारवाई करण्यात आली. प्रकरणाचा पुढील तपास देवळी पोलिसांकडून करण्यात येत आहे.

देवळी पोलिस ठाण्याच्या हद्दीतील १७ वर्षीय मुलगी काही दिवसांपूर्वी घरातून बेपत्ता झाली होती. तिच्या नातेवाइकांनी पोलिसांत तक्रार दाखल केल्यानंतर पोलिसांकडून तिचा शोध सुरू होता. दरम्यान, आर्वी पोलिसांनी नातेवाइकांशी संपर्क साधून सदर मुलगी आर्वी तालुक्यातील सर्कसपूर येथील वैभव प्रकाश नागापुरे याच्यासोबत राहत असल्याची माहिती दिली. मुलीच्या नातेवाइकांनी सर्कसपूर येथे जाऊन तिची भेट घेतली. तेथे तिचा जन्मदाखला तपासला असता तिचे वय १७ वर्षे ११ महिने असल्याचे समोर आले. मात्र, शाळा सोडल्याच्या दाखल्यावर तिचे वय १८ वर्षे पूर्ण असल्याचे नमूद असल्याने वयाबाबत विसंगती आढळून आली. जन्मदाखल्याच्या आधारे मुलगी अल्पवयीन असल्याचे स्पष्ट झाल्यानंतर तिला देवळी येथे आणण्यात आले. वडिलांच्या तक्रारीवरून पोलिसांनी युवकाविरुद्ध विविध कलमांनुसार गुन्हा दाखल केला. दरम्यान, पीडितेला बाल कल्याण समितीसमोर हजर करण्यात आले असून, समितीच्या देखरेखीखाली तिला ठेवण्यात आले आहे.

### जिल्हा वकील संघावर साळवेंचा 'कायदा
# ॲड. अनंत साळवे अध्यक्षपदी विजयी; ॲड.संगीता राठींची उपाध्यक्षपदावर दणदणीत बाजी

**ॲड. भावना जगताप सचिव, वर्षा मोकदम सहसचिव तर वैभव नागपुरे ग्रंथपालपदी**

**वर्धा जनमाध्यम :** वर्धा जिल्हा वकील संघाच्या निवडणुकीत अध्यक्षपदाची चुरशीची लढत जिंकत ॲड. अनंत साळवे यांनी बाजी मारली. ११ ऑगस्ट रोजी झालेल्या निवडणुकीत साळवे यांनी १९३ मते मिळवत अध्यक्षपद पटकावले. त्यांच्या प्रतिस्पर्धी ॲड. अर्चना वानखेडे यांना १५०, ॲड. संध्या लिंपणे यांना ३५, तर ॲड. विशाल तिबडीवाल यांना १५ मते मिळाली.

उपाध्यक्षपदासाठी ॲड. संगीता राठी यांनी २४३ मते मिळवत दणदणीत विजय नोंदविला. ॲड. उज्ज्वल हाडके यांना १००, तर ॲड. नंदकुमार वानखेडे यांना ४४ मते मिळाली.

सचिवपदी ॲड. भावना जगताप यांची बिनविरोध निवड झाली. सहसचिवपदासाठी ॲड. वर्षा मोकदम यांनी १८७ मते मिळवून विजय मिळविला. ॲड. योजना ढोक यांना १३८, तर ॲड. यास्मिन शेख यांना ६६ मते मिळाली. ग्रंथपालपदासाठी ॲड. वैभव नागपुरे यांनी १८६ मते मिळवत विजय मिळविला.



ॲड. प्रवीण चन्ने यांना १०४, तर ॲड. दीक्षा शेंद्रे यांना ९१ मते मिळाली.

निकाल जाहीर होताच विजयी उमेदवारांच्या समर्थकांनी जल्लोष केला. ज्येष्ठ व कनिष्ठ अधिवक्त्यांनी नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन केले. अधिवक्त्यांच्या समस्या, संघाचा विकास आणि न्यायालयीन सुविधांसाठी प्रभावीपणे काम करण्याचे आव्हान आता नवीन कार्यकारिणीसमोर आहे.


## जाहिर नोटिस

सर्व आम जनतेस सुचित करण्यात येते कि माझे पक्षकार राहुल दिलीपराव अतकरे यांच्या मालकी व कब्जातील खालिल नमुद मालमत्ता आहे.

मालमत्तेचे वर्णन येणे प्रमाणे: मौजा बोरगांव मेघे, मौजा नं. १००, ता. जि. वर्धा ग्राम पंचायत बोरगांव मेघे च्या हद्दितील शेत सर्वे कं. ९० मधील प्लॉट कं. १४ ज्याची एकूण आराजी १०१.५८ चौ. मी. म्हणजेच १०९३.०० चौ. फुट इतकी असुन त्याची

चतुःर्सिमा :-
पुर्वेसः कोल्हे यांचे घर
पश्चिमेसः रोड,
उत्तरेसः सायंकार यांचे घर
दक्षिणेसः मांगले यांचे घर

वर नमुद मालमत्ता माझे पक्षकार ईक्वीटास स्माल फायनान्स बँक यांचेकडे गहाण ठेवून त्यावर रक्कम रू. २१,००,०००/- चे कर्ज घेत आहे. वर नमुद मालमत्ता कोणत्याही बँकेकडे, कंपनीकडे अथवा संस्थेकडे गहाण असल्यास अथवा इतर कोणत्याही स्वरूपाचा बोझा असल्यास तसेच कोणाचाही हक्क वा अधिकार असल्यास वा इतर काही भानगड असल्यास खालिल नमुद पत्यावर लेखी दस्तऐवजासह सदर नोटिस प्रकाशित झाल्यापासून ३ दिवसाच्या आत लेखी उजर नोंदवावा. त्यानंतर कोणाचाही आक्षेप ग्राहय धरल्या जाणार नाही.

**ॲड. सचिन एस. कुरझडकर**
**साई नगर वर्धा**
**मो. नं. ९८६००४१३६१**



राशी अर्बन क्रेडिट को-ऑपरेटिव्ह सोसायटी लिमीटेड, जिल्हा वर्धा मुख्यालय हिंगणघाट
रजि. नं. WDA (WDA)/RSR(CR)/283/2024-25
संस्थेचा द्वितीय वार्षिक अहवाल
सन २०२५-२६

## वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस

राशी अर्बन क्रेडिट को-ऑपरेटिव्ह सोसायटी लिमीटेड, जिल्हा वर्धा मुख्यालय हिंगणघाट रजि. नं. WDA(WDA)/RSR(CR)/२८३/२०२४-२५ या संस्थेच्या सभासदांना कळविण्यांत येते की, संस्थेची सन २०२५-२६ या आर्थिक वर्षाची द्वितीय वार्षिक सर्वसाधारण सभा दिनांक २६/०८/२०२६ रोज बुधवारला दुपारी १.०० वाजता लक्ष्मी मंगल कार्यालय, नागपुर रोड, हिंगणघाट येथे विषय पत्रिकेतील विषयावर विचार-विनिमय व ठराव संमत करण्यासाठी आयोजीत करण्यांत आली आहे.

तरी आपण सभेला उपस्थित राहावे हि नम्र विनंती.

विषय :-
१. मागील दिनांक २०.०९.२०२५ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इंतिवृत्त वावुन कायम करणे
२. संस्थेच्या दिनांक ३१.०३.२०२६ अखेर संपलेल्या आर्थिक वर्षाच्या संचालक मंडळाच्या वतीने सादर केलेल्या नफा-तोटा पत्रक, जमाखर्च पत्रक व ताळेबंद पत्रकाचे अवलोकन करणे व मंजुरी देणे.
३. सन २०२५-२६ च्या अंदाजापेक्षा जास्त झालेल्या खर्चास मंजुरी देणे.
४, सन २०२६-२७ या आर्थिक वर्षाकरीता तयार केलेल्या अंदाजपत्रकास मंजुरी देणे.
५, अहवाल वर्षात नविन झालेल्या सभासदांना मंजुरी देणे.
६. सन २०२५-२६ वर्षात संस्थेने केलेल्या कामाचा आढावा घेणे व मंजुरी देणे तसेच संस्थेचे धोरणात्मक कामकाजाबाबत चर्चा करणे व निर्णय घेणे.
७ संस्थेच्या सन २०२५-२६ च्या अंकेक्षण अहवालाचे वाचन करणे व संचालक मंडळाने केलेल्या दोष दुरुस्तीला मंजुरी देणे.
८. कर्ज मर्यादा ठरविण्यांबाबत विचार-विनिमय करणे.
९. सन २०२६-२७ या कालावधीचे वैधानिक अंकेक्षणाकरीता अंकेक्षकाची नियुक्ती करणेबाबत.
१०. संस्थेला सुधारीत आदर्श उपविधी लागू करण्याबाबत विचार विनिमय करणे.
११ मा. अध्यक्षांच्या परवानगीने वेळेवर येणारे विषय.

हिंगणघाट, दिनांक ११.०८.२०२६

**श्री. शंकर कु. चंदनखेडे** — मुख्य कार्यपालन अधिकारी
**श्री. रिषभ म. वरधने** — उपाध्यक्ष
**सौ. सिंधुताई प्र. कडु** — अध्यक्षा

टिप: गणसंख्येच्या अभावी तहकुब झालेली सभा त्याच दिवशी त्याच ठिकाणी १ तासानंतर घेण्यांत येईल. त्यावेळी गणसंख्येची आवश्यकता राहणार नाही.



**कोर्ट विद्यमान श्री. योगेश शिंदे, तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, हिंगणघाट यांचे न्यायालय**

आपणास याव्दारे सुचीत करण्यांत येते की, अर्जदार सुनिल सिताराम कातडे, रा. संत तुकडोजी वार्ड हिंगणघाट ता. हिंगणघाट. जि. वर्धा यांनी कलम १३ (३) अन्वये जन्म-मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ अंतर्गत अर्जदार यांचे वडील नामे सिताराम धॉडबाजी कातडे यांची मृत्यु मौजा हिंगणघाट ता. हिंगणघाट. येथे झाल्याने त्यांच्या दि. १४/०५/२०२४ रोजी मृत्युची नोंद नगरपरिषद कार्यालय हिंगणघाट जि. वर्धा यांचे कार्यालयातील अधिकृत नोंदणी पुस्तीकेमध्ये घेण्याचा आदेश होण्याबाबत अर्ज / प्रकरण सादर केले आहे.

वर नमुद मृत्यु नोंदणीबाबत हितसंबंधीत व्यक्तीचे आक्षेप / हरकती असल्यास ते त्यांनी स्वतः किंवा त्यांचे अधिकृत प्रतिनिधी मार्फत पुराव्यासह कार्यालयीन वेळेत जाहीरनामा प्रसिध्दी दिनांकाचे ८ दिवसाचे आत या कार्यालयास सादर करावे. उशिरा प्राप्त होणारे किंवा पुरावे नसणारे आक्षेप / हरकती ग्राहय धरल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

ठिकाण :- हिंगणघाट
दिनांक :- ०१/०४/२०२६

**योगेश शिंदे तहसिलदार**
**तथा कार्यकारी दंडाधिकारी, हिंगणघाट**





### भरती परीक्षा पद्धती सुधारणांसाठी राज्यात उच्चस्तरीय समिती

# परीक्षा गैरप्रकारसंदर्भात केंद्राचा कायदा राज्यात लागू करणार

**मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्रात विविध सेवाभरतींसाठी होणा-या परीक्षा पद्धतीत सर्वसमावेशक, अधिक सुरक्षित व सर्वसंमतीने सुधारणांसाठी एक उच्चस्तरीय समिती गठीत करण्याचा निर्णय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बुधवारी घेतला. या समितीने राज्यात प्रत्येक विभागात जाउन विद्यार्थ्यांशी संवाद साधत सर्वंकष सुधारणांबाबत अहवाल सादर करायचा आहे. या बैठकीला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हेसुद्धा उपस्थित होते, त्यांनीही अनेक उपयुक्त सूचना या बैठकीत केल्या.

'वर्षा' निवासस्थानी आयोजित बैठकीत मुख्यमंत्र्यांनी हे निर्देश दिले. ही उच्चस्तरीय समिती सामान्य प्रशासन विभागाच्या अतिरिक्त मुख्य सचिव श्रीमती व्ही. राधा यांच्या अध्यक्षतेखाली राहील. राज्याचे पोलिस महासंचालक सदानंद दाते, माहिती-तंत्रज्ञान विभागाचे सचिव वीरेंद्र सिंग, पशुसंवर्धन विभागाचे सचिव डॉ. एन. रामास्वामी व नाशिक



विभागीय आयुक्त प्रवीण गेडाम यांचा त्यात समावेश असेल.

या समितीने प्रत्येक महसुली विभागात जाउन विद्यार्थी, शिक्षण संस्थाचालक व संबंधित घटकांशी चर्चा करून त्यांची मते जाणून घ्यायची आहेत. त्याआधारावर राज्यासाठीचे समग्र धोरण ठरेल.

अलिकडेच केंद्र सरकारने पेपरफुटी व परीक्षा गैरव्यवहारासंदर्भात संसदेत एक कायदा केला आहे. महाराष्ट्राचाही स्वतंत्र कायदा आहेच. तथापि संसदेने केलेला कायदा अधिक कठोर असल्याने



तो महाराष्ट्रातही लागू करण्यासंदर्भात येणा-या पंधरवड्यात प्रक्रिया पूर्ण करण्यात यावी, असेही आदेश मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिले.

**२५ हजार सुरक्षित क्लासरूम**

राज्यात किमान २५ हजार सुरक्षित क्लासरूम उभारण्यात याव्यात, असेही आदेश फडणवीस यांनी या बैठकीत दिले. या विविध परीक्षांमध्ये जिल्हाधिकारी, पोलिस आयुक्त, पोलिस अधीक्षक, शिक्षण विभागाचे वरिष्ठ अधिकारी यांचीही समन्वय भूमिका, इतर विविध देशांमधील परीक्षा पद्धती, विद्यमान प्रक्रिया व त्यातील विविध संभाव्य सुधारणा अशा अनेक विषयांवर यावेळी सांगोपांग चर्चा झाली. राज्याचे मुख्य सचिव राजेश अग्रवाल व इतर वरिष्ठ अधिकारी या बैठकीला उपस्थित होते.

# घाटकोपरमध्ये घरांवर दरड कोसळली

## 6 ठार; बचाव कार्य सूरु

**मुंबई/प्रतिनिधी :** मुसळधार पावसामुळे मुंबईतील घाटकोपर पूर्व येथील अशोक नगर, चिराग नगर भागातील गौसिया चाळीवर मध्यरात्री ३ ते ४ घरांवर अचानक दरड कोसळल्याची भीषण दुर्घटना घडली. आज (दि. १२) पहाटे घडलेल्या दुर्घटनेत आतापर्यंत सहा जणांचा मृत्यू झाला आहे. आणखी दोन जण ढिगा-याखाली अडकलेले आहेत. अशोक नगर हा डोंगराळ झोपडपट्टीचा भाग आहे. आज पहाटे या ठिकाणी असलेल्या गौसिया चाळीवर एक मोठे पिंपळाचे झाड आणि मोठी दरड खाली चाळीवर कोसळली. पहाटे साडेतीन वाजताच्या दरम्यान गाढ झोपेत ही कुटुंबे असताना त्यांच्यावर हा प्रसंग ओढवला. एकीकडे प्रचंड पाउस, काळोख आणि अरुंद गल्लीबोळांचा रस्ता यांमुळे अग्निशमन दल आणि एनडीआरएफ यांना बचावकार्य कठीण झाले होते. मात्र पहाट होताना पावसाने उसंत घेतली. यानंतर बचावकार्य जोमाने सुरू झाले. सुरुवातीला दोन मृतदेह बाहेर काढण्यात आले. आतापर्यंत सहा जणांचा मृत्यू झाल्याचे स्पष्ट झाले आहे. दोन तरुण अजूनही ढिगा-याखाली अडकले असल्याने बचावकार्य सुरूच आहे.



**अग्निशमन दलाचे दोन जवान जखमी-** या बचावकार्यादरम्यान दुर्घटनाग्रस्त भागात काम करताना अग्निशमन दलाचे जवान मनोज सोनवणे (वय ३०) आणि शिवम द्विवेदी (वय २९) हे जखमी झाले. त्यांना तातडीने कूपर रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले होते. ड?क्टरांनी प्राथमिक उपचार केल्यानंतर दोघांनाही रुग्णालयातून सुखरूप घरी सोडले आहे.सध्या परिसरात सुरक्षेचा उपाय म्हणून पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला असून, बचावकार्य सुरु आहे.

**बाधित भागातील लोकांना सुरक्षित ठिकाणी हलविणार-** महापालिका अधिकारी गजानन जैतापकर यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले की, रहिवाशांना नोटिसा बजावण्यात आल्या आहेत. यापूर्वीही, पावसाळ्याआधी अनेक घरांना नोटिसा देण्यात आल्या होत्या. बचावकार्य सुरू आहे. आम्ही पुढील कार्यवाहीबाबत निर्णय घेत आहोत. बाधित भागातील लोकांना सुरक्षित ठिकाणी हलवले जाण्याची शक्यता आहे.

# जस्टिस वर्मांवर आरोप सिद्ध

### चौकशी समिती म्हणाली– पुराव्यांशी छेडछाड झाली, नोटांची पोती कुठून आली, सांगू शकले नाही

**नवी दिल्ली-** न्यायमूर्ती यशवंत वर्मा यांच्या २०२५ च्या रोख रकमेच्या प्रकरणाची चौकशी करणा-या संसदीय समितीने बुधवारी लोकसभेत अहवाल सादर केला. अहवालात न्यायमूर्ती वर्मा यांच्यावरील सर्व आरोप खरे ठरले आहेत.समितीच्या अहवालानुसार, १४



ऑगस्ट २०२५ रोजी न्यायाधीशांच्या शासकीय निवासस्थानाच्या स्टोअररूममध्ये ५०० च्या नोटांनी भरलेली पोती सापडली होती, यातील बहुतेक नोटा जळलेल्या अवस्थेत होत्या.न्यायाधीश रोख रकमेच्या उपस्थितीबद्दल, त्याच्या स्रोताबद्दल आणि मालकी हक्कांबद्दल समाधानकारक स्पष्टीकरण देउ शकले नाहीत. यासोबतच पुराव्यांची हाताळणी आणि सुरक्षितता राखण्यात गंभीर निष्काळजीपणा आढळला.न्यायमूर्ती वर्मा यांच्या घरी १४ ऑगस्ट २०२५ रोजी आग लागली होती, अग्निशमन दलाच्या कर्मचा-यांना येथे पोत्यांमध्ये भरलेल्या जळालेल्या नोटा मिळाल्या होत्या. चौकशी समितीला असे आढळले की न्यायमूर्ती वर्मा यांच्या सरकारी निवासस्थानाच्या स्टोअर रूममध्ये ५०० च्या नोटांचे बंडल आणि अर्धवट जळालेल्या नोटा मिळाल्या होत्या.अग्निशमन दल आणि पोलिसांच्या कर्मचा-यांनी चौकशीदरम्यान सांगितले की नोटा फक्त एकाच ठिकाणी नव्हत्या, तर स्टोअर रूमच्या मोठ्या भागात पसरलेल्या होत्या. दिल्ली अग्निशमन दलाचे कर्मचारी अंकित सहगल यांनी सांगितले की त्यांनी ५०० च्या नोटांचे बंडल पाहिले होते, जे स्टोअर रूममध्ये ७-८ फुटांपर्यंत पसरलेले होते. पोलिस अधिकारी रूपचंद यांना जेव्हा विचारण्यात आले की, रोख रकमेची रक्कम ५ लाखांपेक्षा जास्त होती का, तेव्हा त्यांनी सांगितले की, हा आकडा खूपच लहान आहे. मात्र, नोट जप्त करण्यात आल्या नाहीत, त्यांची मोजणी झाली नाही आणि नोटांचे नमुनेही सुरक्षित ठेवले नाहीत. याच कारणामुळे समिती हे निश्चित करू शकली नाही की, तिथे प्रत्यक्षात किती रोख रक्कम होती.आग विझल्यानंतर स्टोअर रूमला तात्काळ सील करण्यात आले नाही. सुरक्षा अधिका-याने न्यायमूर्ती वर्मा यांच्या कर्मचा-यांना रात्री सुमारे ३ वाजता तिथे साफसफाई करताना पाहिले. सकाळपर्यंत जळालेले सामान बाहेर काढण्यात आले आणि खोली स्वच्छ करण्यात आली. तिथे सापडलेले नोटही सुरक्षित ठेवले नाहीत आणि नंतर ते सापडलेही नाहीत. समितीने असे मानले की, अशा प्रकारे महत्त्वाचे पुरावे सुरक्षित ठेवले नाहीत आणि त्यांच्याशी छेडछाड झाली.

# जंतर-मंतर सीझन 2 लवकरच-दीपके

### *आम्हाला दिल्लीत बैठकीसाठी हॉल मिळाला नाही*




**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** काकरोच जनता पार्टी चे संस्थापक अभिजीत दीपके यांनी बुधवारी विद्यार्थी आंदोलनाच्या धर्तीवर आणखी एक आंदोलन लवकरच सुरू करण्याची घोषणा केली. त्यांनी याला जंतर-मंतर सीझन २ असे संबोधले. एका सार्वजनिक सभेत दीपके म्हणाले, इन्स्टाग्रामवर अनेक लोक विचारत होते की जंतर-मंतर सीझन २ कधी सुरू होईल. मी त्यांना सांगू इच्छितो की जंतर-मंतर सीझन २ खूप लवकर सुरू होणार आहे.क्व्छ ने जंतर-मंतरवर ३७ दिवस धरणे आंदोलन केले होते. धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्यानंतर आणि पक्षाच्या इतर प्रमुख मागण्या मान्य झाल्यानंतर २५ जुलै रोजी हे आंदोलन संपले होते. दिल्लीत समर्थकांशी बोलताना अभिजीत दीपके म्हणाले की ते लवकरच एक मोहीम सुरू करतील. याचा उद्देश देशभरातील गावांच्या शाळांची दुरुस्ती करणे आहे, ज्या इतकी वर्षे दुर्लक्षित केल्या गेल्या आहेत. दीपके यांनी आरोप केला की, आम्ही आज दिल्लीत आमच्या स्वयंसेवकांची बैठक ठेवली होती. आम्ही एका हालच्या शोधात होतो, पण कोणीही आम्हाला हाल भाड्याने द्यायला तयार नव्हते. सर्वजण म्हणत होते की, वरून दबाव आहे.

त्यांनी दावा केला की, पक्षाने शेवटी एका हालची व्यवस्था केली होती. तथापि, त्यांचा आरोप आहे की, बैठकीच्या सकाळी हाल मालकांना धमक्या देण्यात आल्या. दीपके यांनी आरोप केला, त्यांना सांगण्यात आले की, जर त्यांनी येथे क्व्छ ची बैठक होउ दिली, तर त्यांना उलटे लटकवले जाईल.

**दीपकेंनी भाजपवर धमकी दिल्याचा आरोप केला-** दीपकेंनी धमक्यांमागे भाजपचा हात असल्याचा आरोप केला. ते म्हणाले की, अशा कारवाईमुळे पक्ष मागे हटणार नाही.ते म्हणाले, 'हे सर्व भाजप करत आहे. त्यांची कामे आणि विधाने स्पष्टपणे दाखवतात की ते देशातील तरुणांना घाबरतात. जर त्यांना वाटत असेल की अशा छोट्या कृतींमुळे आम्ही घाबरू, तर ते खूप चुकीचा विचार करत आहेत.'नवी दिल्लीतील जंतर-मंतरवर आंदोलनादरम्यान २५ जुलै रोजी शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची बातमी ऐकताच दीपके व्यासपीठावर बुक्के मारू लागले होते. सीजेपी प्रवक्तेम्हणाले- देशभरात सुरू आहेत आंदोलने मुख्य प्रवक्ते सौरव दास यांनी दीपकेच्या जंतर-मंतर सीझन २ या विधानावर म्हटले की, हा स्वतःच सीझन २ आहे. अशा अकार्यक्षम सरकारांविरुद्ध आणि अधिका-यांविरुद्ध देशभरात निदर्शने होत आहेत. दास म्हणाले की, क्व्छ आता देशभरात लिसनिंग टूर सुरू करणार आहे, जेणेकरून लोकांचे म्हणणे ऐकले जाईल.

# तीन विद्यार्थिनींच्या मृत्यूप्रकरणी आश्रमशाळेच्या मुख्याध्यापकासह दोन अधीक्षकांवर गुन्हे दाखल

**गडचिरोली /प्रतिनिधी-** धानोरा तालुक्यातील जपतलाई येथील अनुदानित आश्रमशाळेतील तीन विद्यार्थिनींचा सर्पदंशाने मृत्यू झाल्याप्रकरणी मुख्याध्यापकासह दोन अधीक्षकांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.



आश्रमशाळेचे मुख्याध्यापक प्रशांत ताटपल्लीवार, अधीक्षिका भाग्यश्री चिलमवार व अधीक्षक भास्कर भोयर अशी गुन्हे दाखल झालेल्या कर्मचा-यांची नावे आहेत. सोमवारी मध्यरात्री जपतलाई येथील अनुदानित आश्रमशाळेत सर्पदंशामुळे दीपिका लकडा(१२), सुष्मिता मंडल(१४) आणि अनू कोरेटी(८) या तीन मुलींचा मृत्यू झाला, तर दीपिका मडावी(११), कविता किरंगे(१२) आणि समृद्धी नैताम(१४) या तीन विद्यार्थिनी आजारी पडल्या. यापैकी दीपिका मडावी हिच्यावर नागपुरात उपचार सुरु आहेत. या घटनेनंतर सहपालकमंत्री आशिष जयस्वाल, आदिवासी विकास विभागाच्या आयुक्त आयुषी सिंह, जिल्हाधिकारी अविशांत पंडा यांनी आश्रमशाळेला भेट देउन घटनेची माहिती जाणून घेतली. शिवाय तत्काळ चौकशी समिती नेमण्यात आली. समितीच्या चौकशीत मुख्याध्यापक, मुलींच्या अधीक्षिका व मुलांचे अधीक्षक दोषी आढळल्याने सहायक प्रकल्प अधिकारी प्रभू सादमवार यांनी धानोरा पोलिस ठाण्यात तक्रार केली. त्यानुसार, पोलिसांनी प्रशांत ताटपल्लीवार, भाग्यश्री चिलमवार व भास्कर भोयर यांच्यावर भारतीय न्याय संहिता २०२३ च्या कलम १०६(१), १२५(अ), १२५(ब),३(५) तसेच बाल न्याय(दुरुस्ती)अधिनियम २०१५ च्या कलम ७५ अन्वये गुन्हे दाखल केले आहेत. अधीक्षिका भाग्यश्री चिलमवार यांना संस्थेने घटनेच्या दिवशीच निलंबित केले आहे.

**शाळा मान्यता रद्द करण्याची प्रक्रिया सुरु** - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अनुदानित आश्रमशाळेची मान्यता रद्द करण्याची घोषणा केली आहे. यासंदर्भात प्रक्रिया सुरु असल्याची माहिती आदिवासी विकास विभागाच्या आयुक्त आयुषी सिंह यांनी दिली. तेथील शिक्षक आणि विद्यार्थ्यांचे समायोजन जवळच्या सोडे आणि मुरुमगाव येथील आश्रमशाळांमध्ये करता येईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

# 'जेन अल्फा' आता प्रश्न विचारतेय, सत्तेला उत्तर द्यावेच लागेल !

## मुलांचे व्हिडिओ शेअर करत वडेट्टीवार कडाडले

**मुंबई/प्रतिनिधी :** आजची नवी पिढी आता थेट व्यवस्थेला प्रश्न विचारू लागली आहे. त्यांना हिंदू-मुस्लिम द्वेष किंवा भावनिक राजकारण नकोय, तर त्यांना चांगले रस्ते आणि शाळेत शिक्षक हवे आहेत, अशा शब्दांत राज्याचे काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी राज्य सरकारवर जोरदार निशाणा साधत सोशल मिडीयावर विद्यार्थ्यांचे व्हिडिओ शेअर करत सद्यपरिस्थिती मांडली आहे.

विजय वडेट्टीवार यांनी आपल्या सोशल मीडिया खात्यावर पोस्ट करत राज्यातील शालेय विद्यार्थ्यांच्या वाढत्या जागरूकतेकडे लक्ष वेधले आहे. त्यांनी पोस्टमध्ये राज्यातील चार प्रमुख उदाहरणे दिली आहेत. त्यामध्ये नाशिक (त्र्यंबकेश्वर-पेगलवाडी, गोहिरेवाडी): येथील विद्यार्थ्यांनी पाण्याच्या बाटलीचा माईक बनवून रस्त्यांच्या दुरवस्थेचे अनोख्या पद्धतीने रिपोर्टिंग केली आहे. तर दुस-या उदाहरणामध्ये रायगड (कोंडिवडे) येथील दोन विद्यार्थिनींनीही नाशिकच्या विद्यार्थ्यांप्रमाणेच प्रयोग करून गावातील रस्त्यांचे प्रश्न मांडले. तिस-या घटनेत नागपूर (ग्रामीण) येथे शाळेत जाण्यासाठी एसटी बस सुरू करा, अशी आक्रमक मागणी करत विद्यार्थिनी थेट पुढे आल्या आहेत. हिंगोली (वसमत) येथे विद्यार्थ्यांनी आमचा सत्कार करण्यापेक्षा आम्हाला शाळेत शिक्षक द्या, असे हिंगोलीच्या शिक्षणाधिका-यांना ठणकावून सांगणा-या मुलींनी व्यवस्थेचे वाभाडे काढले आहेत.

**ही केवळ आंदोलने नाहीत, नवी जनजागृती-** या घटनांचा संदर्भ देत वडेट्टीवार म्हणाले की, ही केवळ मुलांची



छोटी-मोठी आंदोलने नाहीत, तर ही नव्या पिढीची जनजागृती आहे. या जेन अल्फा पिढीला ट्रोलिंग नको, हिंदू-मुस्लिम द्वेष नको, धमक्या आणि दंडेलशाही नकोय. त्यांना चांगले रस्ते, शाळेत शिक्षक, सुरक्षित प्रवास, दर्जेदार शिक्षण आणि मूलभूत सुविधा हव्या आहेत.

**द्वेषाच्या राजकारणापेक्षा विकासाचे राजकारण करा-** सरकारला थेट इशारा देताना वडेट्टीवार म्हणाले की, सरकारने आता ठरवावे की त्यांना ख-या मुद्द्यांवर बोलायचे आहे की मुद्दे टाळण्यासाठी समाजाला केवळ भावनिक वादात अडकवून ठेवायचे आहे? कारण ही पिढी आता प्रश्न विचारायला शिकतेय आणि ती सत्तेकडे उत्तर मागतेय. जर या मुलांच्या प्रश्नांकडे आता दुर्लक्ष केले, तर उद्या हीच पिढी मतपेटीतून सरसकट उत्तर देईल, असा इशाराही त्यांनी दिला. द्वेषाच्या राजकारणापेक्षा विकासाचे राजकारण करा. या मुलांना गृहीत धरू नका, त्यांच्या शिक्षणाकडे आणि नागरी सुविधांकडे लक्ष द्या, असा सल्ला विजय वडेट्टीवार यांनी राज्य सरकारला दिला आहे.

# राज ठाकरे 'वर्षा' बंगल्यावर!;

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची घेतली भेट

**मुंबई :** मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी भल्या सकाळी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची अचानक भेट घेतली. राज ठाकरे यांनी मुख्यमंत्र्यांची अधिकृत निवासस्थान असलेल्या वर्षा बंगल्यावर जाउन फडणवीस यांची भेट घेतली व त्यांना पुष्पगुच्छ दिला. मागील काही दिवसांपासून राज ठाकरे राज्य सरकारवर अत्यंत आक्रमकपणे टीका करत असतानाच ही सरप्राइज भेट झाल्यामुळे राजकीय वर्तुळात विविध चर्चांना उधाण आले आहे.दोन्ही नेत्यांमध्ये काय चर्चा झाली किंवा



ही भेट नेमकी कोणत्या कारणासाठी होती, याबाबतची कोणतीही अधिकृत माहिती अद्याप समोर आलेली नाही. मात्र, मागील काही दिवसांत राज ठाकरे यांनी सरकारवर अनेक गंभीर मुद्दे उपस्थित केले होते. मुंबई-गोवा महामार्गाची दुरवस्था, रस्त्यांवरील खड्डे, जेन-जी आंदोलन आणि नाशिक दौ-यादरम्यान कुंभमेळ्याच्या नियोजनावरून ठाकरेंनी सरकारवर थेट निशाणा साधला होता. या पार्श्वभूमीवर, महामार्ग आणि खड्ड्यांच्या प्रश्नावर मख्यमंत्र्यांशी थेट चर्चा करून लवकरात लवकर तोडगा काढावा, यासाठी राज ठाकरे भेटायला गेल्याचा एक तर्क लावला जात आहे. या भेटीदरम्यान मुंबई क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष अजिंक्य नाईक हेदेखील राज ठाकरे यांच्यासोबत उपस्थित होते. राज ठाकरे यांनी काही दिवसांपूर्वीच शिवाजी पार्क मैदानाच्या दुरवस्थेवर प्रश्न उपस्थित केले होते. त्यामुळे नवीन स्टेडियम उभारणीबाबत किंवा शिवाजी पार्क मैदानाच्या विकासाबाबत कोणताही विशेष प्लॅन घेउन ठाकरे मुख्यमंत्र्यांकडे गेले होते का? अशीही चर्चा रंगू लागली आहे.

# बस स्थानके होणार 'आयकॉनिक'



**मुंबई / प्रतिनिधी-** महाराष्ट्राची जीवनवाहिनी असलेल्या एसटी महामंडळाच्या जागांचा सार्वजनिक-खासगी भागीदारीच्या माध्यमातून विकास करताना त्या ठिकाणी उभारण्यात येणारी नवीन बसस्थानके आणि इतर वास्तू केवळ आधुनिक सुविधांनी युक्त न राहता आयकानिक आणि शहराच्या सौंदर्यात भर घालणा-या असाव्यात तसेच नागरिकांना सुविधा मिळाव्यात हे पाहण्याचे निर्देश उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले.

सह्याद्री अतिथीगृह येथे एसटीच्या जागा पीपीपी तत्त्वावर विकसित करण्यासंदर्भात विशेष आढावा बैठक संपन्न झाली. याप्रसंगी परिवहन विभागाचे अपर मुख्य सचिव संजय सेठी, उपमुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव असीम गुप्ता, मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव नवीन सोना व इतर वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. प्रवाशांना अत्याधुनिक, सुरक्षित आणि दर्जेदार सुविधा देतानाच एसटी महामंडळाला आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी या मालमत्तांचा योग्य आणि नियोजनबद्ध वापर करावा, असे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले.

**१४७ बसस्थानके, एसटीच्या जागांचा पीपीपी तत्त्वावर विकास**

पहिल्या टप्प्यात १४७ बसस्थानके व एसटीच्या जागांचा पीपीपी तत्त्वावर विकास करण्यात येईल. या माध्यमातून आधुनिक बस पोर्ट, प्रवासी सुविधा, कार्यालये, हास्पिटल, चित्रपटगृहे, नागरिक सेवा केंद्रे आदी सुविधा विकसित करण्याचे नियोजन आहे. तसेच सौर उर्जा, इलेक्ट्रिक वाहनांसाठी चार्जिंग सुविधा आणि एसटीच्या इलेक्ट्रिक बसेससाठी स्वतंत्र चार्जिंग व्यवस्था उभारण्यात येणार आहे. यामुळे प्रवाशांना सुविधा मिळण्याबरोबरच उर्जा खर्च आणि कार्बन उत्सर्जन कमी करण्यास मदत होणार आहे.

**प्रवासी-केंद्रित बसस्थानकांच्या विकासावर भर**

दरम्यान, राज्यातील अनेक एसटी बसस्थानकांच्या इमारती ४० वर्षांहून अधिक जुन्या असून कालबा पायाभूत सुविधांमुळे प्रवाशांना आधुनिक सुविधा उपलब्ध करून देण्यात अडचणी येत आहेत. त्यामुळे महाराष्ट्र एसटी महामंडळ २.० अंतर्गत आधुनिक, सुरक्षित आणि प्रवासी-केंद्रित बसस्थानकांच्या विकासावर भर देण्यात येत आहे.

# येवला पैठणीचा राष्ट्रीय सन्मान;


## राष्ट्रपती द्रौपदी मुर्मूंच्या हस्ते येवला पैठणीचे टपाल तिकीट प्रकाशित

**नवी मुंबई / प्रतिनिधी-** महाराष्ट्राच्या समृद्ध कला, संस्कृती आणि परंपरेची जगभर ओळख निर्माण करणा-या नासिक जिल्ह्यातील येवला पैठणीच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे. नवी दिल्लीतील राष्ट्रपती भवन सांस्कृतिक केंद्रात आयोजित १२ व्या राष्ट्रीय हातमाग दिनाच्या कार्यक्रमात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते येवला पैठणीच्या स्मरणार्थ विशेष टपाल तिकीट प्रकाशित करण्यात आले.येवला पैठणी ही केवळ साडी ( पैठणी ) नसून महाराष्ट्राच्या सांस्कृतिक वैभवाचे प्रतीक मानली जाते. हातमागावर अत्यंत कौशल्याने आणि बारकाईने विणली जाणारी पैठणी आपल्या पारंपरिक नक्षीकामासाठी देशभर प्रसिद्ध आहे. मोर, कमळ, आसावली, नारळी आणि मुनीया यांसारख्या पारंपरिक नक्षींमुळे येवला पैठणीला ेगळी ओळख मिळाली आहे. पिढ्यांपिढ्या विणकर आणि कारागिरांनी ही कला जपल्यामुळे आज येवला पैठणी राष्ट्रीय पातळीवर पोहोचली आहे.

**हजारो कुटुंबांच्या आर्थिक स्थैर्याला बळ-** येवल्याची ओळख देशाच्या वस्त्रोद्योगाच्या नकाशावर अधिक ठळक व्हावी आणि पैठणी उद्योगाला आधुनिक काळानुसार नवी दिशा मिळावी, यासाठी मंत्री छगन भुजबळ सातत्याने प्रयत्नशील आहेत. पैठणी हा येवल्याच्या अर्थव्यवस्थेचा महत्त्वाचा आधार असून या उद्योगाशी हजारो विणकर, कारागीर, व्यापारी आणि विविध घटक जोडलेले आहेत. त्यामुळे पैठणी उद्योगाचा विकास म्हणजे केवळ एका पारंपरिक कलेचा विकास नसून हजारो कुटुंबांच्या रोजगाराला आणि आर्थिक स्थैर्याला बळ देणे आहे. त्यामुळे या पारंपरिक उद्योगाला आधुनिक बाजारपेठ, पर्यटन आणि तंत्रज्ञानाशी जोडण्यासाठी विविध पातळ्यांवर प्रयत्न सुरू आहेत.

# मुले ही आई वडिलांची मालमत्ता नाहीत

**मुंबई :** मुले ही तुमची मालमत्ता नाहीत, तुम्ही त्यांचे आई वडील आहात मालक नाही असा निर्णय मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने दिला आहे. जी मुले १८ वर्षे वयाच्या वरची आहेत, म्हणजेच जी मुले प्रौढ आहेत ते त्यांचा निर्णय घेण्यासाठी स्वतंत्र आहेत. ते त्यांच्या आई वडिलांची प्रॉपर्टी नाहीत असेही नागपूर खंडपीठाने म्हटले आहे.



एका आईने मुलीच्या विरोधात केलेली याचिका ही न्यायालयाने फेटाळून लावली आहे. यामध्ये आईने हे म्हटले होते की माझी मुलगी माझ्या मर्जीशिवाय एका वेगळ्या पुरुषाबरोबर राहते आहे तिचा ताबा मला मिळावा. मात्र ही मुलगी सज्ञान असल्याने तिला तिचे निर्णय स्वातंत्र्य आहे म्हणत नागपूर खंडपीठाने ही याचिका फेटाळून लावली आहे. सज्ञान मुलीचा ताबा मिळावा म्हणून एका आईने कोर्टात याचिका दाखल केली होती. ही मुलगी नागपूरची आहे. तिने वयाच्या १७ व्या वर्षी ट्यूशनला जाते म्हणून घर सोडले. त्यानंतर सीसीटीव्ही फुटेजनुसार हे दिसून आले की ती एका तरुणासह गेली आहे. पोलिसांनी या मुलीला शोधून आणले आणि तिच्या आईकडे सोपवले. त्यानंतर काही दिवसांनी ही मुलगी परत घर सोडून गेली. ज्यानंतर या मुलीच्या आईने कोर्टात दाद मागितली. मात्र मुलगी सज्ञान असल्याने तिला तिचा निर्णय घेण्याचा अधिकार आहे हे सांगत कोर्टाने याचिका फेटाळली आहे. या प्रकरणाच्या सुनावणी दरम्यान मुलीला हजर करण्यात आले. तिने हे सांगितले की तिने तिच्या मर्जीने तिचं घर सोडले आहे. ती ज्या तरुणासह राहते आहे तो सर्वस्वी तिचा निर्णय आहे. कोर्टाने या मुलीचे वय पाहिले ती सज्ञान आहे त्यामुळे तिला तिचा जीवनसाथी निवडण्याचा अधिकार आहे. हाच निकष लावत न्यायालयाने तिच्या आईची याचिका फेटाळून लावली. मुलगी बेकायदेशीर रित्या तरुणासह राहते आहे हा याचिकेतला दावाही कोर्टाने खोडून काढला. कारण मुलगी तिच्या मर्जीने राहते आहे हे तिने मान्य केले आहे.

# संपादकीय

**प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे**

## ‘क्रॉस पॅथी’चा वाद

महाराष्ट्रात ‘ॲलोपॅथी विरुद्ध होमिओपॅथी’ डॉक्टरांमधील संघर्ष सध्या ‘टॉक ऑफ द टाऊन’ झाला आहे. महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेने (एमएमसी) ३० जून २०२६ रोजी एक परिपत्रक काढून औषधी निर्माण शास्त्राचा सहा महिन्यांचा पदविका अभ्यासक्रम पूर्ण करणाऱ्या होमिओपॅथिक डॉक्टरांना आधुनिक औषधे रुग्णांना देण्याची परवानगी दिली. हा निर्णय वादग्रस्त तर आहेच, पण रुग्णांवर थेट परिणाम करणारा आहे; कारण अंतिमतः या निर्णयाचे बरे-वाईट परिणाम रुग्णांनाच भोगावे लागणार आहेत. होमिओपॅथी डॉक्टरांना सहा महिन्यांचा अभ्यासक्रम पूर्ण करून ॲलोपॅथी औषधे लिहून देण्याची परवानगी देणारा हा निर्णय चुकीचाही आहे आणि दोन्ही प्रकारच्या डॉक्टरांवर अन्यायकारक आहे. सरकारची बाजू एका दृष्टीने पाहिली तर योग्य आहे, कारण ग्रामीण भागात डॉक्टरांची कमालीची टंचाई आहे. डॉक्टर्स सहज उपलब्ध होत नाहीत आणि ग्रामीण भागात रुग्ण कमालीच्या संख्येने असतात. त्यांना योग्य डॉक्टर अथवा उपचारपद्धती मिळत नाही. ही रुग्णांची तक्रार रास्तच आहे, पण याचा अर्थ एका चुकीची शिक्षा सामान्य रुग्णांना देण्याची ही कोणती पद्धती आहे, याचे उत्तर सरकारला द्यावे लागणार आहे.मिश्र उपचार पद्धती, म्हणजेच ‘क्रॉस पॅथी’पासून रुग्णांना हानी पोहोचू नये असा हेतू आहे, असे मार्डच्या डॉक्टरांच्या संघटनेने म्हटले आहे. वैद्यकीय शिक्षणपद्धतीची एकात्मिकता आणि लोकांना क्रॉस पॅथीचे दुष्परिणाम भोगावे लागू नयेत म्हणून मार्डने काही उपाय सुचवले आहेत. त्यानुसार हा अभ्यासक्रम त्वरित परत घ्यावा असे त्यांनी सुचवले आहे; यात कुणाचेही अहित नाही. होमिओपथी विरुद्ध ॲलोपॅथी हा संघर्ष फार पूर्वीपासून आहे. ॲलोपॅथी डॉक्टरांना पाच वर्षे कठोर संघर्ष आणि प्रचंड अभ्यास करून पदवी मिळवावी लागते आणि तरीही ते परिपूर्ण होऊ शकत नाहीत, कारण त्यांच्या क्षेत्रात सातत्याने नवी भर पडत असते आणि त्यामुळे कोणताही डॉक्टर पदवी मिळवली की आपण परिपूर्ण झालो असे म्हणू शकत नाही. होमिओपॅथचेही तसेच असते; त्यांनाही साडेचार वर्षांचा अभ्यासक्रम पूर्ण करावा लागतो आणि सातत्याने त्यांना रोजच्या प्रॅक्टिसमध्ये आव्हानांना सामोरे जावे लागते. पण याचा अर्थ असा नव्हे की, सहा महिन्यांचा अभ्यासक्रम पूर्ण करून कोणीही ॲलोपॅथीची औषधे लिहून देऊ शकतो. कठोर अभ्यास आणि रात्रंरात्र जागरण करून मिळवलेले ज्ञान, यांची तुलना सहा महिन्यांच्या पदविका अभ्यासक्रमाशी केली जाऊ शकत नाही. एमबीबीएसचा अभ्यासक्रम असा आहे की, वैद्यकीय ज्ञान मिळवण्यासाठी पराकाष्ठेचे प्रयत्न करावे लागतात. पण मिश्र उपचार पद्धतीमुळे वैद्यकीय सीमेमधील रेषा संपते आणि सार्वजनिक आरोग्य व रुग्णांच्या सुरक्षेला थेट धोका पोहोचतो. त्यामुळे सरकारने आपल्याकडे डॉक्टरांची कमतरता आहे, याचे कारण देऊन असे तुघलकी निर्णय घेऊ नयेत; कारण त्यांचा परिणाम अखेरीस रुग्णांच्या जीवावर होणार आहे. याचा आणखी एक गंभीर परिणाम म्हणजे, अल्पमुदतीचा औषधीचा अभ्यासक्रम केल्याने वैद्यकीय आणि वैज्ञानिक सीमारेषांचा दर्जाही राखला जात नाही. खरा प्रश्न हा नाही की कोणत्या डॉक्टरांनी उपचार करावेत, पण प्रश्न हा आहे की ॲलोपॅथी डॉक्टर्स ग्रामीण भागात उपलब्धच नसतात. ग्रामीण भागात आज भारतातील ६५ टक्के लोकसंख्या राहते आणि त्यांच्यासाठी डॉक्टरांचे प्रमाण केवळ ३२ टक्के आहे. त्यात ॲलोपॅथी डॉक्टर्स ग्रामीण भागात काम करण्यास नाखूश असतात. बरेचसे डॉक्टर्स त्यांना दिलेली सक्तीची मुदत पूर्ण करून सरकारी रुग्णालयातील नोकरी सोडून खासगी प्रॅक्टिस करण्यास उत्सुक असतात, पण त्यावर हा निर्णय म्हणजे योग्य उत्तर नाही. महाराष्ट्र सरकारच्या निर्णयामुळे दोन्ही पॅथींच्या डॉक्टरांमध्ये वाद उद्भवला आहे, जो जनतेच्या हिताचा नाही आणि डॉक्टरांच्या तर हिताचा नाहीच. अर्थात, यातही होमिओपॅथीची एक बाजू आहेच. त्यांच्या मते, पात्र होमिओपॅथ्स प्राथमिक आरोग्य सेवेतील आणि आदिवासी पट्ट्यातील डॉक्टरांची कमतरता भरून काढू शकतात. या भागांत अलोपॅथी डॉक्टरांची संख्या अत्यल्प असते किंवा नसतेच. येथे एक महत्त्वाचा मुद्दा येतो; सरकारने लोकांना आरोग्याची आणि काळजीची हमी दिली आहे, पण क्रॉस पॅथी म्हणजेच मिश्र उपचार पद्धतीमुळे वैद्यकीय प्रमाणपद्धतीचे डायल्यूशन, म्हणजेच तिची परिणामकारता सौम्य केली जाते. हा धोका मोठा आहे. पण यात सर्वात मोठा प्रश्न हा आहे की, होमिओपॅथ्सना अलोपथीची परवानगी देता येऊ शकते का? हा प्रश्न केवळ या दोन डॉक्टरांपुरता मर्यादित नाही, तर त्यात आयुर्वेदिक डॉक्टरांचाही प्रश्न आहे. आता निवासी डॉक्टरांनी आपला संप मागे घेतला असला, तरी यामुळे ‘पॅडोराज बॉक्स’ (अनपेक्षित समस्यांचा पेढा) उघडला गेला आहे. ॲलोपॅथी डॉक्टरांचे म्हणणे असे आहे की, त्यांना जे कठोर प्रशिक्षण दिले जाते आणि त्यानंतरच त्यांना प्रॅक्टिस करू दिली जाते, ते सहा महिन्यांचा अभ्यासक्रम पूर्ण केलेल्यांना कसे साध्य होईल? हा एक अत्यंत रास्त आणि योग्य प्रश्न आहे, कारण हा खरोखरच रुग्णांच्या जीवाशी खेळ होईल. मुळात हा वाद निर्माण झाला तो २०१४ च्या एका कायद्यानुसार. त्या अनुषंगाने, होमिओपॅथ्सना एक वर्षाचा अभ्यासक्रम पूर्ण करून ॲलोपॅथी औषधे रुग्णांवर वापरण्यास सक्षम करण्याचे धोरण होते. अनेक वर्षे हा खटला न्यायालयात प्रलंबित आहे, तरीही हा वाद मध्येच उद्भवला आणि पेटला. सध्या उच्च न्यायालयाच्या आदेशामुळे निवासी डॉक्टरांनी आपला संप मागे घेतला असला, तरीही हा वाद अजून धूमसतच आहे. आता सरकारलाच यातून मध्यममार्ग काढला पाहिजे. ॲलोपॅथी उपचारपद्धती अत्यंत कार्यक्षम आहे; परंतु ती महाग आहे.

# हिंदुत्ववाद्यांनी मौन पत्करले?

**उत्तरेकडील राज्यात कावडयात्रा करणाऱ्या मुलांचे शिवीगाळ, हाणामारी, तोडफोड करतानाचे तसेच नशेने उन्मत्त झाल्याचे, भोजपुरी डान्सर्ससोबत अश्लील नाच करतानाचे अनेक व्हिडिओ व्हायरल झाले. त्यावरुन खूप टीका होते, वादंगही निर्माण झाले. ह्या विषयावर कथित हिंदुत्ववाद्यांनी मौन पत्करले?**

‘हिंदू धर्म धोक्यात आहे’ म्हणणारे लोक कावड यात्रेतील गैरप्रकाराबाबत दोन प्रकारच्या भूमिका घेताना दिसतात.एकीकडे ते अश्लीलतेचा निषेध करतात आणि भक्तीत पावित्र्य राहावे अशी मागणी करतात. दुसरीकडे, यात्रेला ‘अराजकता’ किंवा ‘दंगेखोरी’ म्हणून टीका करणाऱ्यांना ते ‘हिंदूविरोधी’ मानतात आणि एकंदर आपल्या अस्मितावजा आस्थेचे रक्षण करतात.काही संघटना नॉन-हिंदूंचा सहभाग किंवा अयोग्य व्यावसायिकांवर बंदीची मागणी करतात.परंतु स्वतःच्या समुदायातील विकृतींवर कठोर आत्मनिरीक्षण केले पाहिजे याकडे त्यांचा कटाक्ष नसतो! अस्सल धर्मरक्षणाची हीच खरी कसोटी आहे.

नशा आणि नाचगाणे याबाबतही काहीजण एक वेगळा युक्तिवाद करतात. शिवाशी संबंधित भांग, गांजा किंवा नशासेवन काही भक्तांमध्ये प्रचलित आहे; काहीजण त्याकडे ‘ऊर्जा’ किंवा ‘भक्ती’ म्हणून पाहतात. तर काहीजण मदिरा कमी प्रमाणात घेतात, कारण नियम आणि परंपरा मद्यसेवनास मान्यता देत नाहीत हे त्यांना ज्ञात असते. कावड यात्रेत तरुण गटांमध्ये नशा करण्याचे प्रमाण लक्षणीय आहे.समाजातील मोजक्या लोकांनी कावडियांनी नशेपासून दूर राहण्याची स्पष्ट अपील केले. त्याचबरोबर लाखो कावडिये शांत, श्रद्धापूर्ण मार्गाने आपली भक्तीरसपूर्ण यात्रा पूर्ण करतात हेही एक वास्तव आहे.

मागच्या काही दिवसांत उत्तरेकडील राज्यात कावडयात्रा करणाऱ्या मुलांचे शिवीगाळ, हाणामारी, तोडफोड करतानाचे तसेच नशेने उन्मत्त झाल्याचे, भोजपुरी डान्सर्ससोबत अश्लील नाच करतानाचे अनेक व्हिडिओ व्हायरल झाले. त्यावरुन खूप टीका होते, वादंगही निर्माण झाले. ह्या विषयावर कथित हिंदुत्ववाद्यांनी मौन पत्करले, धर्माची परंपरेची कुचेष्टा होत असल्याचे त्यांना दिसत नसेल काय असा प्रश्न अनेकजण विचारताहेत; मीडियादेखील ह्या बाबतीत नेहमीप्रमाणे मौन राहिला. ह्या सगळ्यांच्या मुळाशी काय धगधगते याचा शोध मराठी माध्यमांत क्वचित घेतला गेला.

उत्तरेकडील पंचांग आणि मराठी पंचांगामध्ये फरक आहे हे आपल्याकडील अनेकांना ठाऊक नसते. मराठी नववर्ष आणि उत्तरेकडील, दक्षिणेकडील, उत्तरपूर्वेकडील भागात नववर्ष वेगवेगळ्या दिवशी साजरे होते. तद्वतच मराठी श्रावणाच्या आणि उत्तरेकडील श्रावणाच्या तारखा वेगळ्या आहेत. तिकडील भागात श्रावण आता मध्यात येईल आणि आपल्याकडील श्रावण दोन दिवसांनी सुरु होईल. असो. पवित्र समजल्या जाणाऱ्या श्रावणा महिन्यात, गंगेच्या पात्रामधले पाणी कावडीत भरून घेऊन लाखो भक्त ‘बम बोले’च्या जयघोषातआपल्या गावाच्या दिशेने पायी वाटचाल करतात. अलीकडील काही वर्षांत महाराष्ट्रात नवरात्र काळात तुळजाभवानी देवीच्या मंदिरातील ज्योत आपल्या गावाकडून आणलेल्या मशालीत प्रज्वलित करून घेतली जाते. ही ज्योत घेऊन देवीभक्त मंडळी आपल्या गावाकडे धावत निघतात अशी एक परंपरा रूढ होऊ पाहतेय. कावड यात्राही अशीच आहे, ह्यात गंगातीराहून, कावडीत गंगाजल भरून आपापल्या गावाकडे नेले जाते.

वास्तवात कावडयात्रा श्रद्धा, तप आणि शिवाच्या भक्तीची परंपरा आहे. परंतु सोशल मीडियावर वादग्रस्त क्लिप्स वेगाने पसरू लागल्यापासून कावडियाविषयी काहीशी अस्वस्थता दिसून येते. ट्रॅक्टर किंवा डीजेच्या वाहनावर भगव्या वस्त्रांत स्त्रिया भोजपुरी गाण्यांच्या तालावर अश्लील हावभाव करत नाचत असतात, तर कावड घेणारे तरुण त्यांच्याभोवती थिरकतात. नशा करुन बेधुंद नाचणारी, किळसवाणे हावभाव करणारी, अचकट विचकट हातवारे करणारी, धक्का लागला म्हणून तोडफोड करणारी, वाहनचलकांना बेदम मारहाण करणारी भक्त मंडळींची दृश्ये व्हायरल झालीत. उत्तर प्रदेशातील बस्ती, देवरिया यांसारख्या भागांतून नाचणाऱ्या बायकांचे व्हिडिओ अधिक प्रमाणात समोर आले आहेत. स्थानिक लोकांना याचा संताप येत नाही का, असा सवाल विचारला जातोय मात्र याचे उत्तर कुणीच देत नाहीये. असो. ही विकृत व्यवस्था एका नियोजनबद्ध पद्धतीने चालते. धर्म, समाज व शासन यांच्याशी ह्या व्यवस्थेचा थेट संबंध आहे.

कावड यात्रा मुख्यतः उत्तराखंड (विशेषतः हरिद्वार), पश्चिम उत्तर प्रदेश, दिल्ली-एनसीआर, हरियाणा आणि बिहार या भागांत प्रस्थापित आहे. गतवर्षी हरिद्वारमध्ये सुमारे साडेचार कोटी भक्तांनी आपल्या कावडीद्वारे गंगाजल नेले असे प्रशासकीय आकडेवारी सांगते. पूर्वीच्या वर्षांशी तुलना करता ही संख्या लाखो-कोटींमध्ये वाढली आहे. गत काही दशकांत यात्रा धार्मिक श्रद्धापूर्ण पद्धतीने साजरी होत होती; आता कावड परंपरेत, तरुणांच्या मोठ्या गटांनी डीजे, लाईट्स आणि मनोरंजनाचा समावेश केला.अश्लील नृत्याचे प्रमाण पूर्व उत्तर प्रदेश (बस्ती, देवरिया, गोंडा परिसर) आणि बिहारच्या सीमावर्ती भागांत अधिक दिसते, जिथे लग्न-उत्सवांमध्ये ‘ऑर्केस्ट्रा’ संस्कृती खोल रुजली आहे. पश्चिम उत्तर प्रदेशात डीजे आणि जोरदार संगीत अधिक आहे, पण हिडीस नृत्याचे प्रमाण तुलनेने कमी आहे.

कावड यात्रेत बीभत्स नृत्य करणाऱ्या मुली कोठून येतात आणि त्यांना कसे आणले जाते, त्यांचे ग्रुप्स कसे काम करतात याचीही एक कार्यप्रणाली आहे. उत्तर प्रदेश आणि बिहारमधील ऑर्केस्ट्रा नृत्याची संस्कृती याला मोठ्या प्रमाणात जबाबदार आहे. लग्न, धार्मिक उत्सव, यात्रा, जयंत्या किंवा राजकीय सामाजिक कार्यक्रमात रात्रीचे शो सादर करणाऱ्या या कलाकारांना आता कावड गटही बोलावताहेत. वाईट गोष्ट अशी की



कौटुंबिक, समाजिक आणि राजकीय कार्यक्रमात ह्या मुलींना नाचगाणे करायला बोलवून त्यांचे शोषण करणे ही गोष्ट आता नॉर्मल होऊन लोकांच्या अंगवळणी पडलीय, त्यात कुणालाच काही खटकत नाही. त्यामुळे अतिशय सहजतेने ह्या मुलींना कावडयात्रेतही नाचवले जातेय! इथे चूक दुरुस्त करायची असेल तर मूळापासून दुरुस्त करावी लागेल मात्र सध्यातरी हे अशक्य दिसते कारण या मुलींची शोषण व्यवस्था इतकी भक्कम झालीय की, त्यावर पैसा कामावणाऱ्या ऐषाराम करणाऱ्या लोकांची संख्या अफाट आहे!

नाचगाणे करणाऱ्या मुली बहुधा पश्चिम बंगाल, झारखंड, ओडिशा, नेपाळ सीमावर्ती भाग किंवा स्थानिक गरीब कुटुंबांतून, मागास जातींमधून येतात.ह्या व्यवसायात आलेल्या मोजक्या मुली स्वेच्छेने येतात उर्वरित सर्व मुलींचे एक तर शोषण झालेले असते वा दडपशाही पद्धतीने त्यांना एस्कॉर्ट केलेले असते. त्यांचे अपहरणही केलेले असू शकते अथवा काही केसेसमध्ये त्यांना विकतही घेतलेले असते. काहींबाबतचे तस्करीचे आणि शोषणाचे खटले न्यायप्रविष्ट असतात! ह्याविषयी दमछाक करणारे काम म्हणजे, सातत्याने तक्रार करत राहावी लागते. दहापैकी एका तक्रारीवर कारवाई होते. विशेषतः अल्पवयीन मुलींच्या बाबतीत पोलिस थोडीफार कारवाई करताना दिसतात, कारण या वयोगटातील मुलींविषयी त्यांनी कारवाई केली नाही तर नोकरीवर गदा येऊ शकते हे त्यांना ठाऊक असते.

ह्या मुलींचे मानधन साधारणतः प्रति कार्यक्रम दोन ते पाच हजार रुपये असते. त्यांना मिळणाऱ्या टिप्सचे उत्पन्न वाटून असते, त्यातली हिस्सेदारी समान नसते. त्या त्या मुलीवर आणि तिच्या कमाईवर हिस्सेदारी अवलंबून असते. पाच ते पंधरा मुलींचा एक ग्रुप असतो. संपूर्ण ग्रुपची बुकिंग वीस हजार ते ऐंशी हजार रुपयांपर्यंत असू शकते; त्यातून डीजे, वाहन आणि मध्यस्थांचा खर्च वजा केला जातो. यासाठीचे पैसे स्थानिक कावड गटांच्या वर्गणीद्वारे, गावातील देणग्यांमधून किंवा प्रायोजकांकडून जमा केले जातात. ही औपचारिक ‘सिस्टिम’ नाही; विकृत मनोरंजनाचा हा एक अनौपचारिक बाजार आहे. ज्याने भक्तीच्या मार्गात भयानक शिरकाव केलाय. हा विकार कसा दूर होणार ह्याविषयी फारशी चर्चा होताना दिसत नाही.

अनेकांना हे हिडीस प्रकार आवडत नाहीत. सोशल मीडियावर याविषयी तीव्र टीका होताना दिसते. भजन गायिका अनुराधा पौडवाल यांनी, ‘हे नॉनसेन्स बंद करा’ असे स्पष्ट सुनावलेय मात्र काही फरक पडला नाही. सच्चे कावडिये आणि धार्मिक संघटना या प्रकाराला खऱ्या भक्तीचा अपमान मानतात. तरीही रस्त्यावर उतरून ह्या घाणेरड्या गोष्टींचा थेट विरोध करताना फार कुणी दिसत नाहीत. उलट, कावडियांची गर्दी दरवर्षी प्रचंड वाढते. यातले काही गट आक्रमक असतात हे आता अधोरेखित झालेय. त्यामुळे स्थानिक प्रशासन कायदा सुव्यवस्था राखण्यातच व्यस्त राहते. उत्तरेकडील काही भागांत हे प्रकार, मस्ती किंवा सांस्कृतिक मनोरंजन म्हणून सहन केले जातात. इकडच्या भागांत लग्नांमध्येही हीच दृश्ये दिसतात. भीती, उदासीनता आणि आपल्या धर्मियांच्या बाबतीत जास्त बोलू नये ही कचखाऊ मानसिकता यास कारणीभूत ठरते.

स्थानिक प्रशासन तथा राज्य सरकारे आणि पोलिसांच्या वतीने ह्याविषयी वारंवार स्पष्टीकरण दिले गेले. उत्तर प्रदेश सरकारने डीजेच्या आकारावर मर्यादा घातली. उंची १२ फूट आणि रुंदी १० फुटापेक्षा जास्त नको, असा नियम केलाय मात्र त्याची अंमलबजावणी नगण्य आहे. अश्लील, भडक किंवा आपत्तिजनक गाणी पूर्णपणे बंद असावीत असाही नियम आहे, त्याला कथित भक्त मंडळींनी फाट्यावर मारलेय. आवाजाची डेसिबल मर्यादा आणि रात्रीची वेळ मर्यादाही सरकारने निर्धारित केली आहे, मात्र ती केवळ कागदोपत्री आहे. ह्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांना नोटिस देणे, वाहन अथवा डीजे जप्त करणे किंवा काढून टाकणे अशी कारवाई काही केसेसमध्ये केली गेली. मांस-मदिरा विक्रीवर बंदीचा नियम मात्र काहीशा कठोरपणे लागू केला गेलाय. महिला पोलिसांना मोठ्या संख्येने तैनात केले गेलेय आणि महिलांसाठी सुविधाही वाढवल्या गेल्यात. कावड यात्रा सुरक्षित आणि सुव्यवस्थित पद्धतीने व्हावी ह्यासाठी आपण कटिबद्ध असल्याचा सरकारे दावा करतात. परंतु लाखो लोकांच्या गर्दीत प्रत्येक गोष्ट नियंत्रित करणे अवघड आहे हे देखील एक वास्तव आहे.

अश्लील नाचगाण्यात सामील होणे, नशा करणे, हिंसक होत हाणामाऱ्या करणे, दादागिरी करणे ही समस्या केवळ कावड यात्रेची नाही. ती उत्तरेकडील ग्रामीण-निम्न मध्यमवर्गीय, गरीब बेरोजगार, अर्धशिक्षित तरुणांच्या मनोरंजनाच्या भूक, बेरोजगारी, डिजिटल माध्यमांतील भडक संस्कृतीचे, अर्धवट धार्मिक ज्ञानाचे आणि कसलाही आकृतिबंध नसलेल्या अर्थव्यवस्थेचे प्रतिबिंब आहे.भक्ती आणि अश्लीलता एकत्र नांदू शकत नाहीत. शिवाचे भक्त असणे म्हणजे शिस्त, संयम आणि आदर; मात्र ही भावना आता लोप पावताना दिसते. यासाठी प्रशासनाने नियमांची कठोर अंमलबजावणी केली पाहिजे.समाजाने, धार्मिक म्होरक्यांनी स्वतःच्या विकृतींवर प्रश्न उपस्थित केले पाहिजेत आणि भक्तांनी पवित्रतेचे रक्षण केले पाहिजे. कावड फक्त गंगाजल वाहून नेण्यापुरती सीमित नसते; अंतःकरणातला शुद्ध प्रवाहही वाहून नेण्यासाठीही कावड असते. जर तो प्रवाह अश्लीलतेच्या गाळाने मलिन झाला, तर भक्तीची नदीच आटते ह्या मूलभूत गोष्टीचा कावडियांना विसर पडला आहे आणि कथित धर्मरक्षक, संस्कृतीरक्षक ह्याविषयी चकार शब्द बोलायला तयार नाहीत, एक प्रकारे हे धर्माचे आणि परंपरेचे नुकसान आहे, अधःपतन आहे! मात्र लोकांना याची फारशी चाड असेल असे वाटत नाही!

**समीर गायकवाड**

# भाजपा- अकाली दल युतीचे संकेत !



पंजाबमधील अकाली दल या पक्षाचे अध्यक्ष सुखबीर बादल यांनी नुकतीच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेतली.पुढील वर्षी पंजाबमध्ये होणाऱ्या विधान सभा निवडणुकीत भाजप व अकाली दल यांची युती करण्याबाबत नरेंद्र मोदी आणि सुखबीर बादल यांच्यात बोलणी झाल्याचे बोलले जात आहे.अकाली दल आणि भाजपा यांच्यात प्रदीर्घ काळ (तीन दशके) असलेली युती २०२०मध्ये तीन केंद्रीय कृषी कायद्याविषयी दोन पक्षांमध्ये मतभेद निर्माण झाल्यामुळे तुटली होती.पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि अकाली दलाचे अध्यक्ष सुखबीर बादल यांच्यातील चर्चेच्या अगोदर बादल यांनी हरयाणाचे मुख्यमंत्री नायबसिंग सैनी यांची भेट घेतली होती.त्याभेटीत बादल यांनी दोन पक्षांमधील युती बाबत सैनी यांच्याशी चर्चा केली होती.नायबसिंग सैनी हे पंजाब भाजपाचे प्रभारी आहेत.आश्चर्याची गोष्ट म्हणजे मार्च २०२६ मध्ये केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी पंजाबमधील मोगा येथील एका सभेत, पुढील वर्षी होणाऱ्या पंजाब विधानसभा निवडणुकीत अकाली दलाबरोबर युती करण्याची शक्यता फेटाळून लावली होती.त्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सुध्दा,आपल्या जालंदर (पंजाब) भेटीत अकाली दलावर तिव्र टिका केली होती. त्यामुळे पंजाब विधानसभा निवडणुकीत भाजपा आणि अकाली दल यांच्यामध्ये युती होण्याची शक्यता नाकारण्यात आली होती.या पार्श्वभूमीवर पंजाब भाजपा अध्यक्ष केवलसिंग धिल्लाँ यांचे एक विधान महत्त्वाचे होते.ते म्हणाले की भाजपा, पंजाब विधानसभेच्या सर्वच्या सर्व म्हणजे ११७ जागा लढवण्याची तयारी करत असून, अकाली दलाबरोबर युती करण्याची कोणतीही शक्यता नाही.

मात्र पंजाबचे माजी मुख्यमंत्री आणि भाजपचे वरिष्ठ नेते कॅप्टन अमरिंदर सिंग आणि पंजाब भाजपाचे माजी अध्यक्ष सुनील जाखर यांच्या मते अकाली दल आणि भाजपा यांच्यात विधानसभा निवडणुकीत युती झाल्यास त्याचा मोठा फायदा भाजपाला मिळू शकेल.यापुर्वी अकाली दल आणि भाजपा यांच्या युती मध्ये अकाली दल हे मोठ्या भावाची भूमिका बजावत होते. त्यांच्या तील जागा वाटपाचा फॉर्म्युला त्यावेळी वेगळा होता. तेंव्हा पंजाबमधील लोकसभेच्या एकूण तेरा जागांपैकी अकाली दल १० जागी लढत होते तर भाजपा तीन जागांवर लढत होती.विधानसभा निवडणुकीत पंजाब विधानसभेच्या एकूण ११७ जागांपैकी अकाली दल ९४ जागांवर लढत होते तर भाजपा २३ जागांवर लढत होती.२०२० साली हे दोन्ही पक्ष एकमेकां पासून वेगळे झाल्यानंतर २०२२ साली झालेल्या पंजाब विधानसभा निवडणुकी मध्ये भाजपा आणि अकाली दल हे पक्ष स्वतंत्रपणे लढले होते.त्या निवडणुकीत अकाली दलाने तीन जागा जिंकल्या होत्या,तर भाजपाने दोन जागा जिंकल्या होत्या.२०२४ मध्ये झालेल्या लोकसभा निवडणुकीत भाजपला पंजाब मधील लोकसभेची एकही जागा जिंकता आली नव्हती,तर अकाली दलाला एका जागेवर विजय मिळाला होता.अकाली दलाशी युती करण्यावरून पंजाब भाजपामध्ये दोन मतप्रवाह पहायला मिळत आहेत. मात्र युती झाल्यास, त्यामध्ये भाजप हा धाकटा भाऊ असणार नाही, याबाबतीत त्यांचे एकमत आहे.त्यांच्या मते युती झाली तर अकाली दलाला, भाजपसाठी पुर्वीपेक्षा जास्त जागा सोडाव्या लागतील त्यापैकी काहींच्या मते तर दोन्ही पक्षांनी समसमान जागा लढवायला हव्यात.या बाबतीत अकाली दलाचे असे म्हणणे आहे की दोन पक्षांतील युती बाबतची बोलणी फायनल झाल्यानंतर जागा वाटपाबाबतचा निर्णय घेता येईल.विधानसभा निवडणुकीतील जागा वाटपामध्ये अकाली दल, भाजपा करीता ३५ च्या आसपास जागा सोडण्यासाठी राजी होऊ शकेल.अर्थात बदलत्या परिस्थिती मध्ये इतक्या कमी जागा स्विकारण्याची तयारी, भाजपा दाखवेल असे वाटत नाही भाजपाकडून किमान पन्नास जागांची मागणी करण्यात येईल, अशी शक्यता दिसत आहे.

मध्यंतरी पंजाबमध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका झाल्या, त्यांमध्ये अकाली दल आणि भाजप यांनी केलेली कामगिरी यासंदर्भात पहावी लागेल.त्या निवडणुकीत सत्ताधारी आम आदमी पक्षाने राज्यातील नगरपालिकांमधील एकूण १९७७ वॉर्ड्सपैकी ९५८ वॉर्ड्स जिंकून चांगली कामगिरी केली होती. कॉंग्रेस, अकाली दल आणि भाजपा हे पक्ष या निवडणुकीत आम आदमी पक्षाच्या खूप मागे राहिले होते.कॉंग्रेसने या निवडणुकीत ३९७ वॉर्ड्समध्ये विजय मिळवला होता.तर अकाली दलाने १९२ वॉर्ड्समध्ये विजय मिळवला होता.१७२ वॉर्ड्स जिंकणाऱ्या भाजपचा निवडणुकी मध्ये चौथा क्रमांक लागला होता.यावरुन हे लक्षात आले की आम आदमी पक्ष हा भाजपा आणि अकाली दलापेक्षा खूपच मजबूत स्थितीत आहे. २०२४ मध्ये झालेल्या लोकसभा निवडणुकीत भाजप आणि अकाली दल यांना मिळालेल्या मतांची टक्केवारी आता पाहूया.त्यावेळी अकाली दल पंजाबमधील लोकसभेच्या सर्वच्या सर्व म्हणजे १३ जागा लढले होते.त्यांना १३.४८ टक्के मते मिळाली होती.तर भाजपानेही तेवढ्याच जागा लढवून १८.६५ टक्के मिळवली होती.

या पार्श्वभूमीवर वरील दोन पक्षांनी मिळवलेल्या मतांची एकत्रित टक्केवारी ३२ टक्के इतकी होती.तेंव्हा युती झाली तर जागा वाटप करताना दोन्ही पक्षांना ही टक्केवारी लक्षात घ्यावी लागेल.एक गोष्ट मात्र नक्की आहे की अकाली दल आणि भाजपा यांची युती झाली तर ही युती सत्ताधारी आम आदमी पक्ष आणि कॉंग्रेसला तोडीसतोड लढत देऊ शकेल.

नुकताच, कॉंग्रेसने अमरिंदरसिंग राजा वॉरिंग यांना पंजाब प्रदेश कॉंग्रेस समितीच्या प्रमुखपदी कायम ठेवण्याचा निर्णय घेतला आहे.तर माजी मुख्यमंत्री चरणजीतसिंग चन्नी यांची निवडणूक प्रचार समितीच्या अध्यक्षपदी नेमणूक करण्यात आली आहे.त्यानंतर वॉरिंग आणि चन्नी यांच्या पाठिराख्यांमध्ये वाद सुरू झाला.चन्नींच्या समर्थकांनी अशी मागणी केली की, चन्नी यांच्याकडे पंजाब प्रदेश कॉंग्रेस समितीचे अध्यक्षपद सोपवण्यात यावे.चन्नी यांचे समर्थक त्या साठी आक्रमक झाले आणि त्यांनी पक्ष प्रभारी (पंजाबचे) भुपेश बाघेल यांनी बोलावलेल्या संघटनात्मक बैठकीला दांडी मारली.नंतर संगरुर व पतियाळा येथील पक्षाच्या बैठकीत दोन्ही गटांनी (चन्नी आणि वॉरिंग यांचे समर्थक) एकमेकांविरोधात घोषणाबाजी केली आणि एकमेकांच्या अंगावर खुर्च्या फेकल्या.वॉरिंग यांनी चन्नी समर्थकांना उद्देशून, ‘रा.स्व.संघाचे चमचे’ असे वादग्रस्त विधान केल्यामुळे, चन्नी यांचे समर्थक संतप्त झाले.त्यांनी ‘चन्नी लाओ, पंजाब बचावो’ अशा घोषणा दिल्या.

या पार्श्वभूमीवर पुढील वर्षी होणाऱ्या विधानसभा निवडणुकीपुर्वी पक्षांतर्गत मतभेद मिटविण्यात, कॉंग्रेसला अपयश आल्यास, त्याचा विपरीत परिणाम पक्षाच्या कामगिरीवर होऊ शकेल.त्याचा फायदा भाजपाला मिळू शकेल पण त्या करीता भाजपा आणि अकाली दल यांची युती होणे अतिशय गरजेचे आहे.पंजाब कॉंग्रेसमध्ये फूट पडल्यास, विधानसभा निवडणुकीत आम आदमी पक्ष आणि भाजपा- अकाली दल युती हे निवडणूक रिंगणातील प्रमुख प्रतिस्पर्धी असतील.

**अभय गोखले**

गुरुवार, दि. १३ ऑगस्ट २०२६
E-mail:-ytljanmadhyam@gmail.com

# जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सत्य

# राजकीय वरदहस्तातून ठेकेदाराची मनमानी..!

## बेचखेड्यात शेती पाण्याखाली, जलसंधारण अधिकाऱ्यांचा मात्र हात झटकण्याचा प्रयत्न

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**यवतमाळ, दि. १२ :** जलसंधारण विभागाच्या वतीने यवतमाळ तालुक्यातील बेचखेडा शिवारात सुरू असलेल्या नाला खोलीकरणाच्या कामाचा मोठा फटका स्थानिक शेतकऱ्यांना बसला आहे. या कामात मृद व जलसंधारण अधिकारी आणि ठेकेदार यांचे संगनमत असल्याचा गंभीर आरोप नुकसानग्रस्त शेतकऱ्यांनी केला आहे.

इतकेच नव्हे तर, संबंधित ठेकेदाराला जिल्ह्यातील एका मोठ्या राजकीय नेत्याचा राजाश्रय असल्यानेच प्रशासनाकडून मनमानी कारभार सुरू असल्याचा संतापही शेतकऱ्यांमधून व्यक्त होत आहे. बेचखेडा शिवारातील नाला खोलीकरणाचे काम सुरू असताना



तांत्रिक निकषांचे सर्रास उल्लंघन करण्यात आले. याबाबत शेतकरी जयश्री चौधरी यांनी यापूर्वीच मृद व जलसंधारण अधिकारी भूमेश दमाये, संबंधित प्रशासन तसेच स्थानिक आमदारांकडे निवेदनाद्वारे तक्रार केली होती. मात्र, ठेकेदाराला असलेल्या राजकीय वरदहस्तामुळे प्रशासनाने या तक्रारींकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केल्याचा शेतकऱ्यांचा आरोप आहे.

या तांत्रिक त्रुटींमुळे नाल्याचा नैसर्गिक पाण्याचा प्रवाह बदलला. त्यानंतर झालेल्या मुसळधार पावसामुळे नाल्याला पूर येऊन पाण्याचा प्रवाह थेट शेतांकडे वळला. यामुळे जयश्री चौधरी, आशीष पाचोळे यांच्यासह परिसरातील अनेक शेतकऱ्यांच्या शेतात पाणी शिरून कापूस, सोयाबीनसह विविध पिकांचे अतोनात नुकसान झाले आहे. शेकडो एकर शेती बाधित झाली असून, प्रशासनाने वेळीच उपाययोजना केली असती तर ही वेळ आली नसती, असे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे. या संपूर्ण प्रकरणाची प्रत्यक्ष पाहणी करून सखोल तांत्रिक तपासणी करण्यात यावी, दोषींवर कठोर कारवाई करावी आणि नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने नुकसानभरपाई द्यावी, अशी मागणी आता जोर धरू लागली आहे. या प्रकरणी प्रशासन आता नेमकी कोणती भूमिका घेते, याकडे संपूर्ण बेचखेडा परिसराचे लक्ष लागले आहे.

### शेतकरीच स्वतःच्या नुकसानीला जबाबदार:- भूमेश दमाये

**या गंभीर प्रकरणावर मृद व जलसंधारण अधिकारी भूमेश दमाये यांची प्रतिक्रिया घेतली असता, त्यांनी सर्व खापर शेतकऱ्यांवरच फोडले आहे. दमाये म्हणाले, "जयश्री चौधरी व आशिष पाचोळे यांनी नाला खोलीकरणाचे काम व्यवस्थित करू दिले नाही. त्यांनी कामात अडथळे आणल्यामुळेच त्यांच्या शेतात पाणी शिरले असून, पिकांच्या झालेल्या नुकसानीला ते सर्वस्वी स्वतःच जबाबदार आहेत." अधिकाऱ्यांच्या या उलट्या आरोपांमुळे आणि हात झटकण्याच्या भूमिकेमुळे शेतकऱ्यांमधील असंतोष अधिकच भडकला आहे.**

# बाभूळगाव ज्वेलर्स चोरीचा छडा,तिघे जेरबंद, २२४ ग्रॅम सोने जप्त

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**बाभूळगाव, दि. १२ :** धनश्री ज्वेलर्सचे शटर फोडून तब्बल १७ लाख ७० हजार रुपयांचा ऐवज लंपास करणाऱ्या चोरट्यांच्या टोळीचा स्थानिक गुन्हे शाखा व बाभूळगाव पोलिसांनी छडा लावला आहे. संयुक्त पथकाने तिघांना अटक करून त्यांच्याकडून २२४ ग्रॅम सोन्याचे दागिने तसेच गुन्ह्यात वापरलेल्या दोन दुचाकी जप्त केल्या आहेत.

२७ जुलैच्या मध्यरात्री चोरट्यांनी दुकानाची रेकी करून शटर फोडत सोन्याचे दागिने लंपास केले होते. दुकानमालक जितेंद्र प्रेमचंद तातेड यांच्या तक्रारीवरून बाभूळगाव पोलिसांनी गुन्हा दाखल केला. तपासाची सूत्रे हाती घेत पोलिसांनी तांत्रिक माहिती व गुप्त बातमीदारांच्या आधारे आरोपींपर्यंत मजल मारली. अजय मोहन काळे (२६, कुरवाई, मध्यप्रदेश), विनोद वानसाहेब पवार



(४६, मोगरा पारधी बेडा, अमरावती) व मंगलसिंग ऊर्फ बबलू सुरेश पारधी (१९, मुरादपूर, मध्यप्रदेश) यांना अटक करण्यात आली. चौकशीत आरोपींनी गुन्ह्याची कबुली दिल्याचा दावा पोलिसांनी केला आहे. टोळीतील उर्वरित आरोपींचा शोध सुरू आहे. पोलीस अधीक्षक कुमार चिंता, अपर पोलीस अधीक्षक अशोक थोरात, सहायक पोलीस अधीक्षक तथा उपविभागीय पोलीस अधिकारी अमोल कोळी , सतिश चवरे, पोलीस निरीक्षक, स्था.गु.शा. यांचे मार्गदर्शनात ठाणेदार बाभुळगांव दिपमाला भेंडे , प्रभारी अधि. सायबर पो.स्टे. यवतमाळ यशोधरा मुनेश्वर , स्थानिक गुन्हे शाखा येथील अंमलदार यांनी यशस्वीरित्या पार पाडली आहे.

# अरुणोदय विद्यालयात जागतिक आदिवासी दिन साजरा..!

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**दिग्रस, दि. १२ :** तालुक्यातील लाख रायाजी येथील अरुणोदय माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात जागतिक आदिवासी दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. आदिवासी समाजाची समृद्ध संस्कृती, परंपरा, कला, भाषा आणि गौरवशाली इतिहास विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यासोबतच आदिवासी समाजाच्या सामाजिक व शैक्षणिक विकासाबाबत जनजागृती करण्याच्या उद्देशाने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे प्राचार्य सुधीर काळबोंडे होते. यावेळी विद्यार्थ्यांना जागतिक आदिवासी दिनाचे महत्त्व समजावून सांगताना देशाच्या सामाजिक, सांस्कृतिक आणि विकासाच्या वाटचालीत आदिवासी समाजाने दिलेल्या योगदानावर प्रकाश टाकण्यात आला. आधुनिकतेच्या



प्रवाहात आदिवासी समाजाची पारंपरिक ओळख, बोलीभाषा, लोककला आणि सांस्कृतिक वारसा जतन करण्याची गरजही यावेळी अधोरेखित करण्यात आली. आदिवासी संस्कृती ही केवळ इतिहासाचा भाग नसून देशाच्या विविधतेचे आणि समृद्ध सांस्कृतिक वारशाचे प्रतीक आहे, असा संदेश विद्यार्थ्यांना देण्यात आला. आदिवासी समाजाच्या संघर्षाची, परंपरांची आणि सामाजिक योगदानाची माहिती विद्यार्थ्यांना देत त्यांच्या मनात या समाजाविषयी आदर व संवेदनशीलता निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात आला. यावेळी तोफिक शेख, प्रशांत गावंडे-पाटील, कु. शिल्पा राऊत, मोहन घिनमिने, परमेश्वर मेश्राम, अवथरे, प्रदीप व महेश यांची प्रमुख उपस्थिती होती. शिक्षकांनी विद्यार्थ्यांना आदिवासी समाजाच्या गौरवशाली इतिहासासह त्यांच्या सांस्कृतिक वारशाची सविस्तर माहिती दिली. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी विद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले. विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविल्याने कार्यक्रमाला उत्साहाचे स्वरूप प्राप्त झाले.

# गजानन विठ्ठल एनगंटीवार यांचा सेवानिवृत्ती सोहळा उत्साहात संपन्न

## कृषी उत्पन्न बाजार समितीतील ३२ वर्षांच्या प्रदीर्घ सेवेला निरोप

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**झरी, दि. १२ :** कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये तब्बल ३२ वर्षे प्रदीर्घ व उल्लेखनीय सेवा बजावलेले गजानन विठ्ठल एनगंटीवार हे सेवानिवृत्त झाल्याने त्यांच्या सेवापूर्ती निमित्त आयोजित करण्यात आलेला सेवानिवृत्ती सत्कार समारंभ मोठ्या उत्साहात व आनंददायी वातावरणात पार पडला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती राजीव कासावर होते.

प्रमुख पाहुणे म्हणून पुरुषोत्तम आवारी, निलेश एल्टीवार, देवंन्ना भंडारवार, मंगेश मोहीतकर ,सतीश आदेवार ,निलेश बेलेकार व संचालक मंडळ यांची उपस्थिती होती. यावेळी उपस्थित मान्यवरांनी गजानन विठ्ठल एनगंटीवार यांच्या ३२ वर्षांच्या




प्रदीर्घ सेवेला उजाळा देत त्यांच्या कार्याचे कौतुक केले. कर्तव्यनिष्ठा, प्रामाणिकपणा आणि जबाबदारीने त्यांनी आपल्या सेवाकाळात दिलेले योगदान उल्लेखनीय असल्याचे मान्यवरांनी सांगितले. सेवानिवृत्तीच्या निमित्ताने एनगंटीवार यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी सहकारी, अधिकारी, कर्मचारी तसेच उपस्थित मान्यवरांनी त्यांना पुढील आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमास कृषी उत्पन्न बाजार समितीचे अधिकारी, कर्मचारी, पदाधिकारी, सहकारी व हितचिंतक मोठ्या संख्येने उपस्थित होते. उत्साहपूर्ण वातावरणात झालेल्या या कार्यक्रमाने गजानन विठ्ठल एनगंटीवार यांच्या प्रदीर्घ सेवेला भावपूर्ण निरोप देण्यात आला.

## थोडक्यात

### फुलवाडीतील वनपाल बदलीवरून संताप..!

**उपवनसंरक्षक कार्यालयासमोर उपोषण**

**पुसद :** वन विभागातील २०२६ च्या बदली प्रक्रियेत नियम डावलून



प्रकाश कनिराम जाधव यांची फुलवाडी बीटमध्ये बदली करण्यात आल्याचा आरोप करत सामाजिक कार्यकर्ते चक्रधर मारोतराव नरवाडे यांनी बुधवार, १२ ऑगस्टपासून उपवनसंरक्षक, पुसद कार्यालयासमोर उपोषण सुरू केले आहे.

यवतमाळ वनवृत्तातील बदली प्रक्रियेत नियमांचे पालन झाले नसल्याचा आरोप नरवाडे यांनी केला आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार, जाधव यांची यापूर्वी सिंगद व दिग्रस वर्तुळात नियुक्ती झाली असून, दिग्रस येथे त्यांना मुदतवाढ ही देण्यात आली होती. संबंधित आदेशानुसार दोन राऊंड पूर्ण झाल्यानंतर त्यांची पुसद वनविभागा बाहेर बदली होणे अपेक्षित असताना पुन्हा पुसद विभागातील फुलवाडी राऊंड मध्ये नियुक्ती करण्यात आल्याचे निवेदनात नमूद आहे. या बदलीमुळे इतर वनपालांवर अन्याय होत असल्याचा दावा करत जाधव यांची बदली तात्काळ रद्द करून अन्य विभागात नियुक्ती करण्याची मागणी करण्यात आली आहे. यापूर्वी दिलेल्या निवेदनाची दखल न घेतल्याने उपोषणाचा मार्ग स्वीकारल्याचे नरवाडे यांनी स्पष्ट केले.

### प्रियदर्शनी कॉन्वेंट स्कूल, आमणीच्या दोन विद्यार्थ्यांचे सुयश

**यवतमाळ जिल्हा गुणवत्ता यादीत मिळविले स्थान निधी नजरधने १६ वी, प्रज्वल सिडणुरे २४ वे – जिल्ह्यातील २५ गुणवंतांमध्ये एकाच शाळेचे दोन विद्यार्थी**

✦ किरण नरवाडे

**महागाव:** महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांच्यामार्फत घेण्यात




आलेल्या प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा, इयत्ता चौथी (एप्रिल २०२६) च्या निकालाने महागाव तालुक्यात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. प्रियदर्शनी कॉन्वेंट स्कूल, आमणी या शाळेच्या दोन विद्यार्थ्यांनी यवतमाळ जिल्ह्याच्या गुणवत्ता यादीत स्थान मिळवून शाळेचे व तालुक्याचे नाव उज्ज्वल केले आहे. जिल्ह्यातून केवळ २५ विद्यार्थ्यांची निवड होत असताना त्यात एकाच शाळेचे दोन विद्यार्थी असणे ही निश्चितच अभिमानाची गोष्ट आहे. कु. निधी गणेश नजरधने हिने २९८ पैकी २०४ गुण मिळवून ६८.४५६४ टक्के गुणांसह जिल्हा गुणवत्ता यादीत १६ वा क्रमांक पटकावला आहे. तर कु. प्रज्वल व्यंकट सिडणुरे याने २९८ पैकी १९२ गुण मिळवून ६४.४२९५ टक्के गुणांसह २४ वा क्रमांक मिळविला आहे. दोघांच्याही अधिकृत प्रमाणपत्रावर अनुक्रमे १६/२५ व २४/२५ असे जिल्हा गुणवत्ता क्रमांक नमूद असून हे यश त्यांच्या परिश्रमाची व चिकाटीची साक्ष देते.

या यशामागे विद्यार्थ्यांची अखंड मेहनत, पालकांचे प्रोत्साहन आणि शाळेतील शिक्षकवृंदाचे मनःपूर्वक मार्गदर्शन यांचा मोलाचा वाटा आहे. शाळेचे मुख्याध्यापक श्री. अभिषेक राठोड व संचालिका श्रीमती वनमाला ताई राठोड यांनी दोन्ही विद्यार्थ्यांचे व त्यांच्या पालकांचे हार्दिक अभिनंदन केले असून संपूर्ण शिक्षकवृंदाचेही कौतुक केले. "हे यश केवळ या दोन विद्यार्थ्यांचे नसून ते संपूर्ण महागाव तालुक्याचे आहे," असे त्यांनी सांगितले. निधी गणेश नजरधने व प्रज्वल व्यंकट सिडणुरे यांच्या या उल्लेखनीय कामगिरीबद्दल पालक, शिक्षक, ग्रामस्थ व शिक्षणप्रेमी नागरिकांकडून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. हे यश तालुक्यातील इतर विद्यार्थ्यांसाठीही प्रेरणादायी ठरेल, अशी आशा व्यक्त केली जात आहे.

# महामार्ग लगतचा धोकादायक विद्युत खांब,पुष्पा स्टाईल..

**ढाणकी, दि. १२ :** ढाणकी-ब्राह्मणगाव महामार्गावर सोईट (म.) गावाजवळील विद्युत खांब धोकादायक अवस्थेत असून, पुष्पा स्टाईल प्रमाणे झुकला असून तो कोणत्याही क्षणी कोसळण्याची शक्यता निर्माण झाली आहे. महामार्गालगत असलेल्या या खांबावर विद्युत प्रवाहाच्या तारा असल्याने तो एखाद्या वाहनावर किंवा प्रवाशांवर कोसळल्यास मोठी दुर्घटना घडण्याची भीती व्यक्त होत आहे. या मार्गावर महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या बसेस सह दररोज असंख्य दुचाकीस्वार, चारचाकी वाहने तसेच विविध इंग्रजी माध्यमांच्या शाळांची वाहने ये-जा करतात. त्यामुळे धोकादायक खांबा मुळे नागरिकांच्या जीवितास धोका निर्माण झाला आहे. खांबा मधून सध्या विद्युत प्रवाह सुरू आहे किंवा नाही, याची माहिती नसली तरी तो कोसळल्यास गंभीर अनर्थ होण्याची शक्यता नाकारता येत नाही. ढाणकी येथील महावितरणच्या कारभाराबाबत यापूर्वीही नागरिकांमध्ये



नाराजी व्यक्त झाली असून, या कारभारा विरोधात विराट मोर्चाही काढण्यात आला होता. त्यानंतरही परिस्थितीत अपेक्षित सुधारणा झालेली नसल्याचा आरोप नागरिकांकडून होत आहे. वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या आदेशांकडे स्थानिक यंत्रणा दुर्लक्ष करते का, असा सवालही उपस्थित होत आहे. वीज वितरण कंपनीकडून बिल वसुलीसाठी तत्परता दाखविली जाते. मात्र धोकादायक खांबांची दुरुस्ती करण्यासाठी अशीच तत्परता का दाखविली जात नाही, असा संतप्त सवाल नागरिक विचारत आहेत. संबंधित अधिकाऱ्यांनी तातडीने पाहणी करून खांब दुरुस्त अथवा बदलावा, अन्यथा दुर्घटना घडल्यास त्याची जबाबदारी कोणाची, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

# 'एक वही–एक पेन'मधून २०० विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचा आधार



✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**बाबुळगाव, दि. १२ :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती व महापरिनिर्वाण दिनानिमित्त राबविण्यात येणाऱ्या 'एक वही–एक पेन' अभियानातून कोटंबा येथील सावित्रीबाई फुले मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या वसतिगृहातील सुमारे २०० विद्यार्थ्यांना वह्या, पेन व अन्य शैक्षणिक साहित्याचे मोफत वाटप करण्यात आले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला अभिवादन करण्यात आले. बुद्ध संदेश शिक्षण प्रचार सभेचे व्यवस्थापक विजय ढंगे, तथागत विधायक वरिष्ठ व कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य डी. बी. सातपुते, शिक्षक, कर्मचारी व वसतिगृह प्रशासन उपस्थित होते. समाजहितासाठी कार्यरत 'एक वही–एक पेन' अभियानाच्या कार्यकर्त्यांचा यावेळी सत्कार करण्यात आला. ॲड. राहुल पाटील यांनी विद्यार्थ्यांना शिक्षणाचे महत्त्व, स्पर्धात्मक युगातील संधी आणि सातत्यपूर्ण अभ्यासाची गरज पटवून देत डॉ. आंबेडकरांच्या विचारांचा अंगीकार करण्याचे आवाहन केले. राजेश गुर्जर, प्रीतम थुल, सूरज पाटील, हिमांशु देशभ्रतार व ॲड. राहुल पाटील यांच्या हस्ते साहित्याचे वितरण झाले. समाजसहभागातून राबविण्यात येणारा हा उपक्रम गरजू विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरत असल्याचे उपस्थितांनी सांगितले.

# कळंब चौकात गोवंश तस्करीचा पर्दाफाश

**यवतमाळ, दि. १२ :** कत्तलीच्या उद्देशाने चारा-पाण्याची कोणतीही व्यवस्था न करता घरातच २० ते २५ गोवंश कोंबून ठेवल्याचा धक्कादायक प्रकार कळंब चौक परिसरात उघडकीस आला. यवतमाळ शहर पोलिस ठाण्याच्या डीबी पथकाने बुधवारी (ता. १२) धडक कारवाई करून गोवंशांची सुटका केली. याप्रकरणी एका संशयिताला ताब्यात घेण्यात आले असून, वृत्त लिहीपर्यंत पोलिसांची कारवाई सुरू होती. मिळालेल्या माहितीनुसार, कळंब चौकातील एका व्यक्तीने कत्तलीच्या उद्देशाने २० ते २५ गोवंश घरात कोंबून ठेवले होते. माहिती मिळताच डीबी पथकाने घटनास्थळी धाव घेत जनावरांची मुक्तता केली. जप्त गोवंशांना गौशाळेत पाठविण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली. ही कारवाई पोलिस अधीक्षक कुमार चिंता, अपर पोलिस अधीक्षक अशोक थोरात, उपविभागीय पोलिस अधिकारी अमोल कोळी व पोलिस निरीक्षक निलेश सुरडकर यांच्या मार्गदर्शनाखाली डीबी पथकाने केली.

# उमरखेडचा मृदा व जलसंधारण उपविभाग 'जैसे थे'!

## उमरखेड-महागावच्या शेतकऱ्यांना दिलासा

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**उमरखेड , दि. १२ :** यवतमाळ जिल्ह्यातील मृदा व जलसंधारण विभागाच्या उपविभागीय कार्यालयांच्या फेररचनेत उमरखेड उपविभाग इतरत्र जोडण्याच्या हालचालींना अखेर ब्रेक लागला आहे. उमरखेड-महागाव विधानसभा मतदारसंघाचे आमदार किसनराव वानखेडे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केलेल्या मागणीला यश आले असून, मृदा व जलसंधारण विभागाचे सचिव जितेंद्र पापळकर यांनी उमरखेड उपविभाग पूर्वीप्रमाणेच स्वतंत्र ठेवण्याचे स्पष्ट केले आहे.

सुधारित आकृतीबंधानुसार उमरखेड उपविभाग पुसदला, तर महागाव दिग्रसला जोडण्याच्या



हालचाली सुरू असल्याचे समोर आल्यानंतर आमदार वानखेडे यांनी तातडीने शासनस्तरावर पाठपुरावा केला. भाजपा नेते नितीन भुतडा यांनीही सचिव जितेंद्र पापळकर यांची भेट घेत उमरखेडचे भौगोलिक महत्त्व, विस्तीर्ण क्षेत्र आणि शेतकऱ्यांच्या सोयीचा मुद्दा प्रभावीपणे मांडला. उमरखेड उपविभाग अन्यत्र जोडल्यास जलसंधारणाच्या योजनांच्या अंमलबजावणीसह शेतकऱ्यांच्या प्रशासकीय कामांमध्ये अडथळे निर्माण होऊन नागरिकांची गैरसोय होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली होती. त्याची दखल घेत शासनाने उमरखेड उपविभाग 'जैसे थे' ठेवण्याचा निर्णय घेतल्याने शेतकरी बांधवांना मोठा दिलासा मिळाला आहे.

### जिल्ह्यातील उपविभागांची रचना

**१) यवतमाळ – यवतमाळ, बाभुळगाव**
**२) दिग्रस – दिग्रस, पुसद**
**३) उमरखेड – उमरखेड, महागाव**
**४) मारेगाव – मारेगाव, वणी**
**५) घाटंजी – घाटंजी, आर्णी**
**६) नेर – नेर, दारव्हा**
**७) राळेगाव – राळेगाव, कळंब**
**८) केळापूर – केळापूर, झरी**

**या निर्णयामुळे उमरखेड-महागावमधील शेतकरी व नागरिकांमध्ये समाधान व्यक्त होत असून, स्थानिक प्रशासन शेतकऱ्यांच्या दारातच उपलब्ध राहण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.**

# आदिवासी विद्यार्थ्यांचे मृत्यू नव्हे, व्यवस्थेने केलेले खून : वसंतराव पुरके

**यवतमाळ,, दि. १२ :** गडचिरोली जिल्ह्यातील धानोरा तालुक्यातील जपतलाई येथील अनुदानित आदिवासी आश्रमशाळेत सर्पदंशामुळे तीन विद्यार्थिनींचा झालेला मृत्यू ही नैसर्गिक दुर्घटना नसून व्यवस्थेने केलेले खून आहेत, असा गंभीर आरोप माजी शिक्षणमंत्री तथा काँग्रेस आदिवासी सेलचे प्रदेशाध्यक्ष वसंतराव पुरके यांनी केला. यवतमाळ येथे पत्रकार परिषदेत बोलताना पुरके यांनी आश्रमशाळांमधील विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न उपस्थित केला. दीपिका लकडा, सुष्मिता मंडल आणि अनु कोरेटी या विद्यार्थिनींचा सर्पदंशाने मृत्यू झाला. विद्यार्थिनींना सुरक्षित पलंगाची व्यवस्था असती तर ही दुर्घटना टाळता आली असती, असे त्यांनी सांगितले. २५ वर्षांपासून सुरू असलेल्या आश्रमशाळेत मूलभूत सुविधांचा अभाव गंभीर असल्याचा आरोपही त्यांनी केला. आश्रमशाळांना विद्यार्थी संख्येनुसार शासनाकडून आहार व निवासासाठी अनुदान मिळते. मात्र हा निधी विद्यार्थ्यांच्या सुविधांवर खर्च होतो का, याची चौकशी करावी, अशी मागणी पुरके यांनी केली. आदिवासी विकासासाठी हजारो कोटींची तरतूद असताना विद्यार्थ्यांना साधा पलंगही मिळत नसेल तर निधी जातो कुठे, असा सवाल त्यांनी उपस्थित केला. आदिवासी विकास मंत्री अशोक उईके यांच्या कार्यपद्धतीवरही पुरके यांनी टीका केली. आदिवासी समाजाच्या प्रश्नांवर सरकार अपयशी ठरत असून, अन्यायाविरोधात लवकरच रस्त्यावर उतरण्याचा इशारा त्यांनी दिला. मुख्यमंत्री व आदिवासी विकास मंत्र्यांनी राजीनामा द्यावा, अशी मागणी सीमा तेलंगे यांनी केली. पत्रकार परिषदेला ॲड. अनिल किन्नाके व अजय घोडाम उपस्थित होते.

**तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी दारव्हा यांचे कार्यालय मध्यावर्ती प्रशासकीय ईमारत, दारव्हा जि. यवतमाळ विभाग प्रस्तुतकार - २**

E-mail: tahsildar.darwha@gmail.com Phone No. ०७२३८ २५४१५२

क्रमांक/म.स/प्रस्तु-२/कावि/१०२/२०२६ दिनांक ०५.०८.२०२६

**जाहीर प्रकटन**

सर्वत्र जनतेस सुचित करण्यात येते की, प्रकरणात जन्म/मृत्यु नोदणी निबंधक मौजा किन्ही वळगी यांनी प्रमोद सदाशिव इंगोले यांचे जन्माची नोद ग्राम पंचायत/नगर परीषद किन्ही वळगी ता. दारव्हा जि. यवतमाळ येथील जन्म/मृत्यु नोंदणी रजीस्टरला नसल्यामुळे अर्जदार प्रमोद सदाशिव इंगोले यांनी स्वताच्या जन्माची नोद ग्रा.प/नं.प. किन्ही वळगी येथे करण्या करीता जन्म मृत्यु नोंदणी अधिनीयम १९६९ व सुधारणा अधिनीयम, २०२३ शासन निर्णय क्रमांक २५२५/(ई.आ.९९११८१)प्र.क्र.२२ कु.कु दिनांक १२ मार्च २०२५ अन्वये विलंबाने करावयाच्या नोंदी बाबत आदेश मिळण्याकरीता प्रस्ताव या कार्यालयास सादर करण्यात आला आहे. सदर प्रस्तावात अर्जदार यांची जन्माची दिनांक ०६.०२.१९८१ ही असल्याचे नमुद केले आहे.

तेव्हा याबाबत सदरहु प्रकरणात हितसबंध असणार अथवा इतर कुणाचे काही हरकत/आक्षेप असल्यास त्या बाबतच्या हरकती/आक्षेप या कार्यालयास दिनांक १९.०८.२०२६ पर्यंत कार्यालयीन वेळेत प्रत्येक्ष हजर राहुन सादर कराव्यात ऊशीरा येणारे आक्षेप/हरकती स्वीकारण्यात येणार नाही किंवा त्यांचा कोणताही विचार केल्या जाणार नाही. याची नोंद घेण्यात यावी.

स्थळ दारव्हा
दिनांक ०५.०८.२०२६
स्वा -
तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी दारव्हा

प्रतीलीपी,

१. प्रमोद सदाशिव इंगोले अर्जदार यांनी उक्त जाहीर प्रकटन प्रसिध्द वर्तमान पत्रात प्रसिध्द करून वर्तमान पत्राची एक पत्र या कार्यालयास मुदतीत सादर करावी.
२. संपादक दैनकि करण्याबाबत अग्रेषीत. सदर प्रकटन आपले प्रसिध्द दैनीकात प्रसिध्द

राजेश पऊळ
तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी द्वारव्हा

# जिल्ह्यात महावितरणच्या ‘समाधान शिबिरा’त ९४ टक्के तक्रारींचा जाग्यावरच निपटारा

**अमरावती/का.प्र.**



जिल्ह्यातील वीज ग्राहकांच्या विविध समस्यांचे तातडीने निवारण करण्यासाठी महावितरणतर्फे शनिवारी विशेष ‘ग्राहक समाधान शिबिरा’चे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात प्राप्त झालेल्या एकूण ४३५ तक्रारींपैकी ४०८ तक्रारींचे (९४ टक्के) जागेवरच निवारण करून ग्राहकांना दिलासा देण्यात आला आहे. उर्वरित २७ तक्रारी पुढील सात दिवसांत सोडवण्यात येतील, अशी माहिती महावितरणचे अधीक्षक अभियंता दिपक देवहाते यांनी दिली.

मुख्य अभियंता दिलीप दोडके यांच्या निर्देशानुसार वीज ग्राहकांच्या समस्यांचे त्यांच्याच कार्यक्षेत्रात जलद निरसन व्हावे, या उद्देशाने जिल्ह्यातील ४ विभागांमधील २३ उपविभागाअंतर्गत एकाच दिवशी हे शिबीर पार पडले. या मेळाव्यात नवीन वीज जोडणी, नावात बदल, सरासरी व वाढीव वीजबिल आणि स्मार्ट मीटरशी संबंधित तक्रारी दाखल झाल्या होत्या. ग्राहकांच्या समस्यांचे तात्काळ निरसन करण्यासाठी महावितरणचे वरिष्ठ अधिकारी सर्व ठिकाणी प्रत्यक्ष उपस्थित होते.

समाधान शिबिरात आलेल्या एकूण ४३५ तक्रारींपैकी १४० तक्रारी या जुन्या मीटरशी संबंधित (सरासरी वीजबिल, नावात बदल आणि फॉल्टी मीटर) होत्या, तर २७९ ग्राहकांनी स्मार्ट मीटर व वाढीव वीजबिलाबाबत शंका उपस्थित केल्या होत्या. तसेच १६ तक्रारी सोलर मीरशी संबंधित होत्या. अधिकाऱ्यांनी या सर्व अर्जांची तत्परतेने पाहणी करत घटनास्थळीच ४०८ तक्रारींचा निपटारा केला. यामध्ये स्मार्ट मीटरशी संबंधित २६०, सोलर मीटर १५ आणि जुन्या मीटरशी संबंधित १३३ तक्रारींचा समावेश आहे.

यावेळी उपस्थित अधिकाऱ्यांनी ग्राहकांच्या स्मार्ट मीटरबाबतच्या शंकांचे निरसन करताना त्याच्या अचूकतेची माहिती दिली. अचूक मीटर रीडिंग, दिवसा वीज वापरावर मिळणारी प्रति युनिट ८५ पैसे सवलत, दर अर्ध्या तासाला मिळणारी वीज वापराची नोंद आणि करंट लिकेजची माहिती या सुविधांमुळे स्मार्ट मीटर अत्यंत फायदेशीर व पारदर्शक असल्याचे महावितरणतर्फे स्पष्ट करण्यात आले. भविष्यातही स्मार्ट मीटरशी संबंधित तक्रारींना प्राधान्य देऊन त्या सोडवण्याचे आश्वासन महावितरणने दिले.

## शहरात जखमी गोवंशासाठी धावणार ‘गौ संजीवनी ॲम्ब्युलन्स’

### वसा संस्थेला अत्याधुनिक कॅटल ॲम्ब्युलन्स सुपूर्द

**अमरावती/का.प्र.**



शहरातील रस्त्यांवर अपघातात जखमी होणाऱ्या आणि आजारी अवस्थेत बेवारस भटकणाऱ्या गोवंशासह इतर मोठ्या प्राण्यांना वेळेत वैद्यकीय उपचार मिळणे आता सोपे होणार आहे. शहरातील मालू परिवाराने सामाजिक बांधिलकी जपत ‘वसा’ संस्थेला एक अत्याधुनिक हायड्रॉलिक कॅटल (पशू) ॲम्ब्युलन्स दान केली आहे.

दस्तूरनगर येथील मंगलधाम कॉलनीतील गोवर्धन पर्वतावर वसलेले श्री गोरक्षण व्हेटर्नरी हॉस्पिटल आणि वसा ॲनिमल रेस्क्यू सेंटर येथे ‘गौ संजीवनी’ असे नामकरण करण्यात आलेल्या या ॲम्ब्युलन्सचा लोकार्पण सोहळा नुकताच मान्यवरांच्या उपस्थितीत पार पडला. स्व. प्रवीण मालू आणि स्व. प्रणम मालू यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ ही ॲम्बुलन्स ’वसा’ संस्थेला देण्यात आली आहे. ‘वसा’ संस्थेच्या वर्धापनदिनाचे औचित्य साधून ही रुग्णवाहिका मान्यवरांच्या हस्ते ‘गौ-अर्पण’ करण्यात आली. याप्रसंगी मंचावर महाराष्ट्र गो-सेवा आयोगाचे सदस्य डॉ. सुनील सूर्यवंशी, वर्षा मालू, अलका मालू, संस्थेचे सचिव गणेश अकर्ते, कोषाध्यक्ष भूषण सायंके आणि अध्यक्ष शुभम सायंके प्रामुख्याने उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन डॉ. सुमित वैद्य तर आभार प्रदर्शन संपदा गडलिंग यांनी केले.

## बनावट सह्यांच्या प्रकरणाला नवे वळण

### स्वातंत्र्यदिनी युवासेनेच्या जिल्हाप्रमुखांनी दिला बेमुदत उपोषणाचा इशारा

**खल्लार/वार्ताहर**

दर्यापूर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सचिवांच्या कारभारासंदर्भात वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे सादर करण्यात आलेल्या तक्रार अर्जावरून सुरू झालेल्या वादाला आता नवे वळण मिळाले आहे. तक्रार अर्जामध्ये ज्या आठ व्यक्तींची नावे आणि सह्या त्यांच्या संमतीशिवाय वापरण्यात आल्याचा आरोप करण्यात आला होता. याप्रकरणी संबंधितांनी पोलिसांकडे तक्रार दाखल केल्यानंतर आता थेट अमरावती जिल्हा सहनिबंधक कार्यालयातही आठ जणांनी आपली भूमिका मांडली आहे.

२० जुलै २६ रोजी कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सचिवांच्या कारभारासंदर्भात विभागीय सहनिबंधक आणि इतर वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे तक्रार अर्ज साद करण्यात आला होता.मात्र, संबंधित आठ व्यक्तींनी सदर तक्रारीशी आपला कोणताही संबंध नसल्याचे स्पष्ट केले आहे. तक्रार अर्जातील मजकुराची आपल्याला कोणतीही माहिती नसून आपल्या नावासमोर करण्यात आलेल्या सह्या आपल्या नसल्याचे त्यांनी दावा स्पष्ट केले आहे.यानंतर संबंधित व्यक्तींनी दर्यापूरच्या उपविभागीय पोलिस अधिकाऱ्यांकडे लेखी तक्रार दाखल करून कथित बनावट सह्या आणि नावांच्या गैरवापराची सखोल चौकशी करण्याची मागणी केली.



१० ऑगस्ट रोजी अमरावती जिल्हा सहनिबंधक कार्यालयात या प्रकरणासंदर्भात चौकशी झाली. यावेळी युवासेना जिल्हाप्रमुख अंकुश पाटील कावडकर, विक्की उर्फ किरण होले,सुरज देशमुख यांनी आपली बाजू मांडली.सदर तक्रार पोस्टाच्या माध्यमातून करण्यात आल्याचे समोर आल्याने, ही तक्रार नेमकी कोणी केली, संबंधित व्यक्ती कोण आहे आणि तक्रार अर्जावर संबंधित आठ व्यक्तींची नावे व सह्या कशा वापरण्यात आल्या, याचा शोध घेण्याची मागणी करण्यात आली. संबंधित व्यक्तीचा लवकरात लवकर शोध घेऊन त्याच्यावर कायदेशीर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी यावेळी करण्यात आली. तसेच या प्रकरणात योग्य ती कारवाई न झाल्यास १५ ऑगस्ट रोजी सहाय्यक निबंधक कार्यालय, दर्यापूर येथे आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला आहे.या घडामोडीमुळे प्रकरणाला वेगळे वळण मिळाले असून, तक्रार अर्जामागे नेमके कोण आहे, याबाबत आता उत्सुकता निर्माण झाली आहे. व या प्रकरणा संदर्भात पोस्ट ऑफिस कार्यालय अमरावती या ठिकाणी तक्रार दाखल केली असून तेथिल शेजारी असलेल्या दुकानाची सीसीटीव्ही फुटेजची मागणी सुद्धा यावेळी तकारकर्त्यांकडून करण्यात आलेली आहे.त्यामुळे लवकरच या प्रकरणातील मुख्य सूत्रधार हाती लागणार असल्याचे सुद्धा आता बोलल्या जात आहे.प्रियंका मालठाणे आणि सभापती प्रविण नेमाडे यांची नावे आहेत.शहरातील महत्वाच्या वर्दळीच्या रस्त्यांवर मोकाट जनावरांचा वावर वाढल्याने नागरिकांमधून नाराजी व्यक्त केली जात होती.अखेर प्रशासनाने घेतलेल्या निर्णयाचे नागरिकांकडून स्वागत केले जात आहे.

## खरा शिक्षक हा खरा विद्यार्थी असतो-डॉ. कुमार बोबडे

### अध्यापन क्षमतांचे सक्षमीकरण: कार्यपद्धती कार्यशाळा

**अमरावती/का.प्र.**

बदलत्या शिक्षण पद्धतीनुसार अध्यापनाच्या पद्धतीतही आवश्यक बदल करणे गरजेचे असून, शिक्षकांनी आधुनिक अध्यापन कौशल्ये आत्मसात करून स्वतःला सतत अद्ययावत ठेवले पाहिजे कारण ‘खरा शिक्षक हा खरा विद्यार्थी असतो,’असे प्रतिपादन जनसंवाद विभागप्रमुख व ज्येष्ठ पत्रकार डॉ. कुमार बोबडे यांनी केले.शिक्षकाने आयुष्यभर विद्यार्थी राहून शिकत राहिले पाहिजे,असेही ते म्हणाले.

श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालयाच्या आय.क्यू.ए.सी.आणि एच.आर.डी.सी.तर्फे आयोजित ‘अध्यापन क्षमतांचे सक्षमीकरण: कार्यपद्धती’विषयक कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते.महाविद्यालयाच्या डॉ.पंजाबराव देशमुख सभागृहात आयोजित कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्र.प्राचार्य डॉ. महेंद्र मेटे होते तर डॉ.वनिता काळे ह्या प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होत्या. आय.क्यू.



ए.सी.समन्वयक डॉ.अपर्णा सरोदे, एच.आर.डी.सी.समन्वयक डॉ. शिवाजी कानफाडे प्रामुख्याने उपस्थित होते.आपल्या उद्घाटनपर भाषणात डॉ. कुमार बोबडे म्हणाले की, शिक्षकांनी केवळ अभ्यासक्रमापुरते मर्यादित न राहता अवांतर वाचन केले पाहिजे. विद्यार्थ्यांना आजच्या काळात मैत्रीपूर्ण वातावरणात शिक्षण देण्याची गरज आहे. विद्यार्थ्यांना अवघड विषय साध्या आणि सोप्या भाषेत समजावून सांगता आला पाहिजे.

कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य प्रा. डॉ. महेंद्र मेटे यांनी शिक्षणाच्या बदलत्या स्वरूपावर भाष्य केले. शिक्षणाचे स्वरूप बदलले असून, नव्या पिढीला घडविण्याची महत्त्वपूर्ण जबाबदारी शिक्षकांवर आहे. विकसित देशांमध्ये विद्यार्थी मोठ्या प्रमाणात स्वयं अध्ययन करतात आणि शिक्षकाची भूमिका मार्गदर्शकाची असते. त्याच धर्तीवर भारतातही विद्यार्थ्यांमध्ये स्वयंअध्ययनाची सवय विकसित होणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. कार्यशाळेच्या मुख्य वक्त्या डॉ. वनिता काळे यांनी ‘शिकविण्याची कौशल्ये आणि वर्ग व्यवस्थापन’ या विषयावर मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांना विषयातील आशयाचे आकलन व्हावे यासाठी शिक्षक विविध अध्यापन पद्धती, तंत्रे, कौशल्ये आणि प्रतिमानांचा वापर करतात. या सर्व बाबींचे प्रभावी नियोजन व अंमलबजावणी म्हणजे वर्ग व्यवस्थापन होय, असे त्यांनी स्पष्ट केले.विद्यार्थ्यांना स्वयंअध्ययनासाठी तयार करणे ही आजच्या शिक्षणव्यवस्थेची गरज आहे. बदललेल्या शिक्षण पद्धतीनुसार शिक्षकांमध्ये विविध अध्यापन कौशल्ये विकसित होणे आवश्यक आहे, असेही त्या म्हणाल्या.‘शिक्षक शिकवतो म्हणजे नेमके काय करतो?’ या प्रश्नाच्या माध्यमातून त्यांनी अध्यापन प्रक्रियेचे विश्लेषण केले.

प्रास्ताविकात प्रा. डॉ. शिवाजी कानफाडे यांनी शिक्षण पद्धतीत मोठ्या प्रमाणात बदल झाला असून, त्यानुसार अध्यापन पद्धतीतही बदल करणे आवश्यक असल्याचे सांगितले.बदलत्या काळातील विद्यार्थ्यांच्या गरजा लक्षात घेऊन शिक्षकांनी आपल्या अध्यापन पद्धतीमध्ये आवश्यक बदल करावेत, या उद्देशाने या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आल्याचे त्यांनी स्पष्ट केले.कार्यक्रमाचे संचालन डॉ. मनोज जोशी यांनी, पाहुण्यांचे स्वागत डॉ .उमेश कडू व डॉ. सुवर्णा गाडगे यांनी केले.तर डॉ. अपर्णा सरोदे यांनी उपस्थितांचे आभार मानले.कार्यशाळेला महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक उपस्थित होते.

## विदर्भस्तरीय खंजिरी भजन स्पर्धेत गुरुदेव सेवा मंडळाचा डंका

**अंजनगाव सुर्जी/वार्ताहर**



वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या भजन परंपरेला उजाळा देण्यासाठी खासदार सांस्कृतिक महोत्सव समिती, नागपूर यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या भव्य विदर्भ स्तरीय खंजिरी भजन स्पर्धेत गुरुदेव सेवा मंडळ, मोझरी (गुरुकुंज) च्या बाल कलाकारांच्या चमूने घवघवीत यश संपादन केले आहे.या स्पर्धेची महाअंतिम फेरी नागपूर येथे मोठ्या उत्साहात संपन्न झाली. विदर्भातील अनेक नामवंत भजन मंडळांनी या स्पर्धेत सहभाग घेतला होता. अत्यंत चुरशीच्या झालेल्या अंतिम फेरीत गुरुदेव सेवा मंडळ मोझरीच्या चमूने आपल्या सुमधुर आणि प्रभावी सादरीकरणाने परीक्षकांचे व रसिकांची मने जिंकत चौथ्या क्रमांकाचे मानाचे पारितोषिक पटकावले.या चमूला चौथ्या क्रमांकाचे पारितोषिक केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले.

यावेळी मंचावर खासदार सांस्कृतिक महोत्सवाचे प्रेरणास्थान आणि पद्मश्री पुरस्कार प्राप्त जनार्दन बोथे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.या पुरस्कार प्राप्त संघामध्ये विशेष आकर्षण ठरला तो अंजनगाव सुर्जी येथील बाल कलाकार सक्षम गिरनाळे याने तबला गायनात आपल्या प्रतिभेचे दर्शन घडवले. त्याच्या साथीला तबला वादक व इतर बाल कलाकार म्हणून शिव तिडके, कुंदन गुडदे, हरीओम देवडे, कृष्णा बोरकर, ऋग्वेद बांबल, विशमय जांभुळे, भावेश पावशे, प्रेम पडघान, आकाश वानखडे, कृष्णा पिंपळकर, रुद्र लांडगे यांनी अप्रतिम साथसंगत केली.राष्ट्रसंतांच्या विचारांचा वारसा या चिमुकल्यांनी खंजिरीच्या ठेक्यावर अतिशय प्रभावीपणे सादर केला, असे मत उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केले. गुरुदेव सेवा मंडळाच्या या यशाबद्दल मोझरी, अंजनगाव सुर्जी परिसरातून सर्व स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत असून बाल कलाकारांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

### वीरेंद्र जगताप,ॲड.कीर्ती इमले व मो.अनिस सौदागर यांच्या वाढदिवसानिमित्त

## ११० गुणवंत विद्यार्थी व शिक्षकांचा गौरव सामाजिक उपक्रमांना उत्स्फूर्त प्रतिसाद

**चांदूर रेल्वे/वार्ताहर**

मा.आ.प्रा.वीरेंद्र जगताप यांच्या वाढदिवसानिमित्त तसेच नगरसेविका ॲड. कीर्ती इमले आणि नगरसेवक तथा गटनेता मो.अनिस सौदागर यांच्या वाढदिवसानिमित्त चांदूर रेल्वे शहरात विविध सामाजिक व शैक्षणिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमांना नागरिक,विद्यार्थी,पालक व शिक्षकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

उपक्रमाची सुरुवात ग्रामीण रुग्णालय,चांदूर रेल्वे येथे रुग्णांना फळवाटप करून करण्यात आली.त्यानंतर यशवंत लॉन्स,चांदूर रेल्वे येथे महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांच्या शिष्यवृत्ती परीक्षेत यश संपादन केलेल्या ११० गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा उत्साहात पार पडला. यावेळी विद्यार्थ्यांसोबतच त्यांच्या शैक्षणिक यशामागे मोलाचे







योगदान देणाऱ्या शिक्षकांचाही गौरव करण्यात आला. गुणवंत विद्यार्थ्यांच्या पाठीवर कौतुकाची थाप देत त्यांना भविष्यातील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या. तसेच न. प. हुतात्मा स्मारक अभ्यासिका येथील विद्यार्थ्यांसाठी पुस्तक भेट वितरणाचा उपक्रम राबविण्यात आला.

कार्यक्रमात महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसचे महासचिव परीक्षित जगताप यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. तसेच प्रा. प्रभाकरराव वाघ आणि हर्षल वाघ प्रास्ताविक सतपाल वरठे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत शिक्षण, मेहनत, सातत्य आणि जिद्द यांचे महत्त्व पटवून दिले.कार्यक्रमाच्या व्यासपीठावर बाजार समितीचे सभापती राजेंद्र राजनेकर, खरेदी-विक्री संघाचे अध्यक्ष दिनेश ठाकरे, माजी सभापती गणेश आरेकर,अमोल होले, शिट्टु सूर्यवंशी, ॲड. कीर्ती इमले, अरिहंत गेडाम, निलोफर शेख, माजी नगराध्यक्ष अंजला अग्रवाल, प्रियांका वरठे, पूनम कोकाटे,कल्पना लांजेवार तसेच यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अभिजीत देशमुख यांनी केले.यावेळी उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करत त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. शिक्षणाच्या माध्यमातून शहरातील युवा पिढी सक्षम व्हावी, गुणवंत विद्यार्थ्यांना प्रोत्साहन मिळावे आणि त्यांच्यामध्ये स्पर्धात्मक परीक्षांची सकारात्मक भावना निर्माण व्हावी, या उद्देशाने अशा उपक्रमांची गरज असल्याचे मान्यवरांनी सांगितले.या उपक्रमातून सामाजिक बांधिलकी आणि शैक्षणिक क्षेत्राप्रती असलेली सकारात्मक भूमिका अधोरेखित झाली. मा. आ. वीरेंद्र जगताप मित्र परिवार,यांच्या वतीने आयोजित कार्यक्रमाला उपस्थित मान्यवर, विद्यार्थी, पालक, शिक्षक व नागरिकांनी कौतुक केले.

## संक्षिप्त

### स्वातंत्र्य दिन व मनपाच्या वर्धापन दिनाच्या तयारीचा आढावा



**अमरावती**-स्वातंत्र्य दिनाचा ७९ वा व अमरावती महानगरपालिकेचा ४३ वा वर्धापन दिन तसेच ‘हर घर तिरंगा’ उपक्रमाच्या अनुषंगाने उपायुक्त योगेश पिठे यांनी कामकाजाचा आढावा घेतला. हा आढावा मा. उपायुक्त-३ यांच्या कार्यालयात घेण्यात आला.यावेळी स्वातंत्र्य दिन, महानगरपालिका वर्धापन दिन आणि ‘हर घर तिरंगा’ उपक्रमाच्या पार्श्वभूमीवर करण्यात येणाऱ्या विविध कामांचे नियोजन, तयारी आणि अंमलबजावणीबाबत संबंधित अधिकाऱ्यांकडून माहिती घेण्यात आली. कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडण्यासाठी आवश्यक असलेल्या विविध बाबींचा आढावा घेऊन संबंधितांना आवश्यक त्या सूचना देण्यात आल्या.शहरातील नागरिकांचा उत्स्फूर्त सहभाग मिळवून ‘हर घर तिरंगा’ उपक्रम प्रभावीपणे राबविण्याच्या दृष्टीने प्रशासनाने योग्य नियोजन करण्यावर यावेळी भर देण्यात आला. स्वातंत्र्य दिन व महानगरपालिकेचा वर्धापन दिन उत्साहात आणि शिस्तबद्ध पद्धतीने साजरा करण्यासाठी सर्व संबंधित विभागांनी समन्वयाने काम करण्याच्या सूचनाही देण्यात आल्या.या बैठकीत शहर अभियंता श्रीधर कांबळे,सहाय्यक आयुक्त नंदकिशोर तिखिले, भुषण पुसतकर, नितीन बोबडे,धनंजय शिंदे, मनोज शहाळे, शिक्षणाधिकारी डॉ.प्रकाश मेश्राम,अग्निशमन अधिक्षक अजय पंधरे,भांडार अधिक्षक मंगेश जाधव,उपअभियंता शरद तिनखेडे,स्वास्थ अधिक्षक विजय बुरे,एन.यु.एल.एम. विभागाचे व्यवस्थापक भुषण बाळे,प्रफुल ठाकरे उपस्थित होते.

### भौतिकशास्त्र विभागात सर सी. व्ही. रमण अभ्यास मंडळाचे उद्घाटन



**चांदूर रेल्वे**-राजर्षी शाहू सायन्स कॉलेजच्या भौतिकशास्त्र विभागात सर सी. व्ही. रमण अभ्यास मंडळ स्थापनेचे उद्घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पी. आर. वडनेरकर यांच्या अध्यक्षतेखाली उत्साहात पार पडले.भौतिकशास्त्र विभागप्रमुख प्रा. एस. ए. वाणी यांनी प्रास्ताविकातून अभ्यास मंडळ स्थापनेची उद्दिष्टे व त्यातून होणारा विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास यावर प्रकाश टाकत विद्यार्थ्यांना प्रोत्साहित केले. यानंतर प्रा. डॉ. ए. पी. पाचकवडे यांनी अभ्यास मंडळ २०२६–२७ मधील विद्यार्थ्यांची नावे जाहीर केली. प्राचार्य यांच्या हस्ते अभ्यास मंडळ २०२६–२७ चे सर्व पदाधिकाऱ्यांचे (अध्यक्ष–श्वेता मरगडे,उपाध्यक्ष–वैदेही महल्ले,सचिव– हर्षाली महाले,खजिनदार–आर्यन पाचोडे,सदस्य–कृतिका बोपले,वंशिका पारधी,प्रणय बोपे) पेन व पुष्प देऊन सत्कार करण्यात आला. अध्यक्षीय भाषणात डॉ. पी आर वडनेरकर यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आणि मंडळाच्या माध्यमातून दर्जेदार शैक्षणिक उपक्रम राबविण्यात येतील असा विश्वास व्यक्त केला. कार्यक्रमाचे संचालन,बी.एस्सी. भाग दोन ची विद्यार्थिनी कृतिका बोपले हिने केले.कार्यक्रमाला प्रा.डॉ. रोशनी भगत व बी.एस्सी.भाग१,२ आणि ३ चे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### एकलव्य गुरुस्कूलच्या विद्यार्थ्यांची डाक कार्यालयाला भेट



**नांदगाव खंडेश्वर**- एकलव्य गुरुकुल स्कूलच्या वर्ग चौथीच्या विद्यार्थ्यांनी डाक कार्यालयाला भेट देऊन प्रत्यक्ष पोस्ट ऑफिसच्या कामाची माहिती घेतली.विद्यार्थ्यांकरिता शासनाच्या अनेक स्कीम राबविण्यात येते ज्यामध्ये सुकन्या समृद्धी योजना, लेक लाडकी,पोस्ट पेमेंट बँक, पीपीएफ खाते, स्पीड पोस्ट, रजिस्टर, मनीऑर्डर सेवा,परंतु विद्यार्थ्यांना याबाबत तोंडी माहिती दिली. खाते कोठे काढल्या जाते त्याचे महत्त्व काय आपल्याकडे असलेले पैसे कुठे बचत करतात त्यावर व्याजासह परतावा किती मिळते व ते पैसे आपल्यला भविष्यात शिक्षणासाठी किंवा इतर कामाकरीत कसे कामी पडते हे प्रत्यक्ष शिकायला मिळावे व पोस्टाचे काम कसे चालतात याची माहिती विद्यार्थ्यांना व्हावी या हेतूने ही क्षेत्रभेट राबविण्यात आली. यामध्ये पोस्ट ऑफिसचे शिवाजी जगदाळे यांनी सर्व विद्यार्थ्यांना याबाबत सविस्तर माहिती दिली. यामध्ये इंग्रज काळापासून आजपर्यंत झालेले बदल आधुनिक सुविधा याबद्दलही सविस्तर मार्गदर्शन केले.सोबत संतोष साबळे (सब पोस्टमास्तर) परमेश्वर गीते,प्रवीण पाटील, आशिष घोडे,सुनील हांडे या सर्व कर्मचारी यांनी सुद्धा विद्यार्थ्यांचे स्वागत व मार्गदर्शन केले. शाळेचे मुख्याध्यापक विलास मारोटकर व्यवस्थापक अनुप काकडे,एकलव्य अकादमीचे अध्यक्ष विशाल ढवळे, सहाय्यक शिक्षिका गुंजन नेवारे सिद्धीका सोनुलकर प्रकाश लोहांडे ईश्वर जाधव जनार्दन शेलारे किरण गुल्हाने प्रियंका मेश्राम गुंफा उके पल्लवी गाडेकर वैशाली मोरे अपर्णा चव्हाण नीलिमा देवघरे सविता सुने रेखा पंचगडे अश्विनी शिरभाते यांचे सहकार्य लाभले.

### राष्ट्रीय ग्रंथपाल दिवस साजरा

**अमरावती**-ग्रंथालयाचे जनक डॉ.. एस. आर. रंगनाथन यांची जयंती त्यांच्या ग्रंथालयाबाबत अमूल्य अशा कार्यामुळे राष्ट्रीय ग्रंथपाल दिवस म्हणून साजरी केली जाते. त्याच अनुषंगाने श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती द्वारा संचालित व डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला संलग्नित श्री शिवाजी उद्यानविद्या महाविद्यालय, अमरावती येथे मोठ्या उत्साहात राष्ट्रीय ग्रंथपाल दिवस साजरा करण्यात आला.महाविद्यालयाचे प्राचार्य श्री.चंद्रशेखर देशमुख यांच्या हस्ते डॉ .रंगनाथन यांच्या प्रतिमेचे पूजन करून हार अर्पण करण्यात आला. याप्रसंगी उपस्थित विद्यार्थ्यांना डॉ. रंगनाथन यांच्या जीवन चरित्रावर महाविद्यालयाचे सहाय्यक ग्रंथपाल श्री. मंगेश जुनघरे यांनी प्रकाश टाकला. याप्रसंगी महाविद्यालयातील शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.



# ग्रामीण भागात का वाढताहेत घटस्फोट ?

**भा**रतीय ग्रामीण भागाची ओळख केवळ शेती, तर ती मजबूत कौटुंबिक व्यवस्थेमुळेही आहे. अनेक पिढ्यांपासून विवाह ही केवळ दोन व्यक्तींमधील वैयक्तिक निवड नसून संपूर्ण कुटुंब आणि समाजाशी जोडलेली संस्था मानली गेली. मात्र गेल्या काही वर्षांत ग्रामीण भागातील कौटुंबिक न्यायालय आणि दिवाणी न्यायालयांमध्ये दाखल होणाऱ्या घटस्फोटाच्या प्रकरणांमध्ये सातत्याने वाढ होताना दिसत आहे. हा बदल केवळ विवाहसंस्था कमकुवत होत असल्याचा निष्कर्ष काढण्यासाठी पुरेसा नाही; उलट तो ग्रामीण समाजातील सामाजिक, आर्थिक, मानसिक आणि कायदेशीर परिवर्तनाचा महत्त्वपूर्ण संकेत आहे.

जेन झी चा दृष्टिकोन

आज ग्रामीण भागातील तरुण पिढीचे आयुष्य पूर्ववींपेक्षा पूर्णपणे वेगळे झाले आहे. शिक्षण, इंटरनेट, सामाजिक माध्यमे आणि रोजगाराच्या बदलत्या संधींमुळे त्यांच्या अपेक्षा बदलल्या आहेत. विशेषतः अनेक सुशिक्षित तरुणींना विवाहानंतर गावात राहण्यापेक्षा पुणे, मुंबई, नागपूर किंवा इतर महानगरांमध्ये स्थायिक होण्याची इच्छा असते. दुसरीकडे अनेक तरुण शेती, कौटुंबिक व्यवसाय किंवा पालकांची जबाबदारी यामुळे गाव सोडण्यास तयार नसतात. विवाहापूर्वी या अपेक्षांवर स्पष्ट चर्चा न झाल्यास, विवाहानंतर राहणीमान, करिअर आणि भविष्याबाबत सतत मतभेद निर्माण होतात.

न्यायालयीन अनुभवात अशा कारणांमुळे निर्माण झालेले बाद दिवसेंदिवस वाढताना दिसत आहेत. यासोबतच 'जनरेशन झेड'म्हणून ओळखली जाणारी नवीन पिढी नातेसंबंधांकडे वेगळ्या दृष्टिकोनातून पाहते. या पिढीसाठी समानता, वैयक्तिक स्वातंत्र्य, मानसिक आरोग्य आणि परस्पर सन्मान हे नात्याचे महत्त्वाचे आधार आहेत. केवळ परंपरेच्या नावाखाली अन्याय किंवा अपमान सहन करण्याची तयारी या पिडीत कमी झाली आहे. हा बदल सकारात्मक असला, तरी संवादाचा अभाव, कमी सहनशीलता आणि त्वरित निर्णय घेण्याची प्रवृती यामुळे किरकोळ मतभेदही गंभीर स्वरूप धारण करतात.

ग्रामीण अर्थव्यवस्थेतील अस्थिरत वैवाहिक संघर्षाला कारणीभूत ठरते. शेतीवरील अवलंबित्व, हवामानातील अनिश्चितता, वाढते उत्पादनखर्च, कर्जबाजारीपणा आणि मर्यादित रोजगाराच्या संधी यामुळे अनेक कुटुंबांवर आर्थिक ताण वाढतो. आर्थिक असुरक्षिततेचा परिणाम केवळ जीवनमानावर होत नाही, तर पति-पत्नीमधील नात्यावरही होतो. अनेक प्रकरणांमध्ये वादाची सुरुवात आर्थिक कारणांमुळे झाली असली, तरी त्याचे रूपांतर नंतर मानसिक दुराव्यात आणि शेवटी घटस्फोटात होते, व्यसनाधीनता ही ग्रामीण भागातील वैवाहिक वादांची आणखी एक गंभीर बाजू आहे. दारू, जुगार आणि इतर व्यसनांमुळे केवळ आर्थिक नुकसान होत नाही, तर कौटुंबिक हिंसा, मानसिक छळ आणि दुर्लक्ष यांचे प्रमाण वाढते.

> **ग्रामीण भागातील वाढते घटस्फोट हे समाजातील बदलत्या वास्तवाचे प्रतिबिंब आहे. या प्रश्नाकडे केवळ परंपरा विरुद्ध आधुनिकता अशा चौकटीत न पाहता, बदलत्या अपेक्षा, आर्थिक परिस्थिती, कायदेशीर जागरूकता आणि सामाजिक संक्रमण या सर्व घटकांचा एकत्रित विचार करणे आवश्यक आहे.**

कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम, २००५ अंतर्गत दाखल होणाऱ्या अनेक प्रकरणांमध्ये व्यसन हे मूळ कारण असल्याचे दिसून येते. अशा परिस्थितीत विवाह टिकविण्यापेक्षा सुरक्षित जीवन जगणे हीच अनेक महिलांची प्राथमिकता बनते. पूर्वी एकत्र कुटुंबपद्धतीमुळे पतिपत्नांमधील वाद ज्येष्ठ मंडळीच्या मध्यस्थीने अनेकदा मिटवले जात. आज विभक्त कुटुंबपद्धती आणि रोजगारासाठी होणारे स्थलांतर यामुळे हा आधार कमी झाला आहे. त्यातच डिजिटल माध्यमांवरील कृत्रिम जीवनशैली पाहून स्वतःच्या वैवाहिक आयुष्याची तुलना करण्याची प्रवृत्ती वाढली आहे. त्यामुळे वास्तवापेक्षा अपेक्षा अधिक वाढतात आणि असमाधान निर्माण होते.

एक विधिज्ञ म्हणून न्यायालयात काम करताना हे जाणवते की, प्रत्येक घटस्फोटामागे हिंसा किंवा अत्याचारच असतो असे नाही; तर संवादाचा अभाव, करिअरबाबत मतभेद, राहणीमानाविषयी वेगवेगळ्या अपेक्षा, आर्थिक ताण आणि परस्पर समजुतीचा अभाव ही कारणेही तितकीच महत्त्वाची असतात. त्यामुळे प्रत्येक प्रकरणाकडे पूर्वग्रह न ठेवता स्वतंत्रपणे पाहणे आवश्यक आहे.

काही प्रकरणांमध्ये संताप किंवा सुडाच्या भावनेतून कायद्याचा गैरवापर करण्याचाही प्रयत्न होतो, तर काही ठिकाणी प्रत्यक्ष पीडित व्यक्तीला न्याय मिळवण्यासाठी दीर्घकाळ संघर्ष करावा लागतो. म्हणूनच कायद्याचा वापर आणि गैरवापर या दोन्ही बाबीचा संतुलित विचार करणे आवश्यक आहे. ग्रामीण भागातील न्यायालयांसमोरही अनेक व्यावहारिक अडचणी आहेत. पक्षकारांचे कायदेशीर अज्ञान, न्यायालयांवरील वाढता ताण, न्यायाधीशांची अपुरी संख्या आणि प्रदीर्घ न्यायप्रक्रिया यामुळे अनेक खटले वर्षानुवर्षे प्रलंबित राहतात, पोटगी, मुलांचा ताबा आणि शेतीवर आधारित उत्पनाचे मूल्यांकन यांसारखे प्रश्न न्यायालयांसाठीही आव्हानात्मक ठरतात. या सर्व प्रक्रियेत सर्वाधिक परिणाम मुलांवर होतो.

पालकांमधील सततचा संघर्ष, न्यायालयीन वाद आणि विभक्त राहण्याची वेळ यामुळे त्यांच्या मानसिक आरोग्यावर शिक्षणावा आणि सामाजिक विकासावर परिणाम होतो म्हणूनच प्रत्येक वैवाहिक वाद हा केवळ दोन व्यक्तील संघर्ष नसून त्याचे व्यापक सामाजिक परिणाम असतात या परिस्थितीवर उपाय म्हणून केवळ कठोर कायदे पुरेसे ठरणार नाहीत. विवाहपूर्व समुपदेशन, वैवाहिक जीवनातील अपेक्षांबाबत स्पष्ट संवाद, ग्राम पातळीवरील व्यवस्था, कायदेविषयक जनजागृती आणि व्यसनमुक्ती अभियान यांना अधिक महत्व देण्याची गरज आहे.

विशेषतः विवाहापूर्वी राहणीमान, करिअर, पालकांची जबाबदारी, आर्थिक नियोजन आणि भविष्यात कुठे स्थायिक जायचे याविषयी दोन्ही बाजूंमध्ये स्पष्ट चर्चा होणे आवश्यक आहे.

वकील म्हणून आपली भूमिका केवळ न्यायालयीन लढाई लढण्यापुरती मर्यादित नसावी. ज्या प्रकरणांमध्ये नाते टिकविण्याची शक्यता आहे, तेथे समुपदेशन आणि सामोपचाराला प्राधान्य दिले पाहिजे. परंतु त्या ठिकाणी कौटुंबिक हिंसा, मानसिक छळ किंवा मानवी प्रतिष्ठा निर्माण झाला आहे, तेथे पीडित व्यक्तीला तातडीने आणि प्रभावी न्याय मिळवून देणे हे तितकेच आवश्यक आहे.

ग्रामीण भागातील वाढते घटस्फोट हे समाजातील बदलत्या वास्तवाचे प्रतिबिंब आहे. या प्रश्नाकडे केवळ परंपरा विरुद्ध आधुनिकता अशा चौकटीत न पाहता, बदलत्या अपेक्षा, आर्थिक परिस्थिती, कायदेशीर जागरूकता आणि सामाजिक संक्रमण या सर्व घटकांचा एकत्रित विचार करणे आवश्यक आहे.

मजबूत कुटुंब या सर्वांनी समन्वयाने काम करण्याची गरज आहे. कारण टिकविण्यासाठों कायदा, समाज, कुटुंब आणि समुपदेशन न्यायालय एखाद्या नात्याचा कायदेशीर शेवट करू शकते: परंतु विश्वास, संवाद आणि परस्पर समजुती या मूल्यांवरच कोणत्याही कुटुंबाचे भविष्य उभे राहते.

**ॲड. साक्षी सरोदे**
८८३०८२५४४९

# एआय: शिक्षकाचा प्रतिस्पर्धी नव्हे, तर सहप्रवासी!

**आ**जची विद्यार्थी पिढी ही डिजिटल जगतात वाढणारी पिढी आहे. माहिती मिळविण्याची, शिकण्याची आणि स्वतःला व्यक्त करण्याची तिची पद्धत पूर्वीच्या पिढ्यांपेक्षा वेगळी आहे. त्यामुळे शिक्षण प्रक्रियेत आधुनिक तंत्रज्ञानाचा समावेश असणे ही काळाची गरज झाली आहे. ही गरज ओळखून राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० मध्ये तंत्रज्ञानाधारित शिक्षण, कौशल्य विकास आणि भविष्यकालीन क्षमतांना विशेष महत्त्व देण्यात आले आहे. त्याचाच एक भाग म्हणून महाराष्ट्र शासनाने गुगलच्या सहकार्याने शिक्षकांना कृत्रिम बुद्धिमत्ता आणि डिजिटल कौशल्यांचे प्रशिक्षण देण्याचा निर्णय घेतला आहे. या कराराकडे केवळ तांत्रिक प्रशिक्षण म्हणून नव्हे, तर शिक्षणातील नव्या शक्यतांच्या दृष्टीने पाहणे अधिक उचित ठरेल.

शिक्षण क्षेत्रात कृत्रिम बुद्धिमत्तेची चर्चा सुरू झाल्यापासून काही प्रश्न सातत्याने उपस्थित होत आहेत. 'एआयमुळे शिक्षकांचे महत्त्व कमी होणार का?', 'माहिती सहज उपलब्ध असताना शिक्षकांची गरज काय?' असे प्रश्न अनेकांच्या मनात आहेत. मात्र, या प्रश्नांची उत्तरे शोधताना शिक्षणाच्या इतिहासाकडे एकदा मागे वळून पाहणे आवश्यक वाटते. फळा आला, पाठ्यपुस्तके आली, रेडिओ, दूरदर्शन, संगणक, इंटरनेट आणि स्मार्टफोन आले. प्रत्येक वेळी तंत्रज्ञानामुळे शिक्षणाच्या पद्धती बदलल्या; पण शिक्षकाचे स्थान अबाधित राहिले. ना त्याला पर्याय निर्माण झाला, ना त्याचे महत्त्व कमी झाले. कारण शिक्षण ही केवळ माहिती देण्याची प्रक्रिया नसून माणूस घडविण्याची प्रक्रिया आहे. म्हणूनच कृत्रिम बुद्धिमत्तेकडे शिक्षकाचा प्रतिस्पर्धी म्हणून नव्हे, तर नव्या युगातील सहप्रवासी म्हणून पाहणे अधिक योग्य ठरेल.

शिक्षकाचे काम केवळ वर्गात अध्यापन करण्यापुरते मर्यादित नसते. पाठ नियोजन, अध्ययन निष्पत्तीशी सुसंगत कृतींची आखणी, प्रश्ननिर्मिती, कार्यपत्रिका तयार करणे, मूल्यमापन, अहवाल लेखन, शैक्षणिक साहित्य निर्मिती आणि विद्यार्थ्यांच्या प्रगतीचे सातत्याने निरीक्षण अशा अनेक जबाबदाऱ्या एकाच वेळी पार पाडाव्या लागतात. अनेकदा विद्यार्थ्यांसाठी अधिक नाविन्यपूर्ण उपक्रम राबविण्याची इच्छा असूनही वेळेच्या मर्यादा आड येतात. अशा वेळी कृत्रिम बुद्धिमत्ता शिक्षकाची जागा घेण्यासाठी नव्हे, तर त्याच्या मदतीला धावून येणारा एक सक्षम सहकारी ठरू शकते. यामुळे वाचणारा वेळ विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता विकासासाठी, अधिक उपक्रमशील अध्यापनासाठी आणि त्यांच्या वैयक्तिक गरजा समजून घेण्यासाठी वापरता येऊ शकतो.

माझ्या दृष्टीने एआयचे सर्वांत मोठे योगदान म्हणजे ते शिक्षकाच्या विचारांना नवे आयाम देऊ शकते. एखाद्या पाठासाठी विविध स्तरांनुसार प्रश्न तयार करणे, उपक्रमांची आखणी करणे, स्थानिक संदर्भातील उदाहरणे शोधणे, खेळाधारित कृती सुचविणे, चित्रे, तक्ते,



सादरीकरणे तयार करणे, भाषांतर करणे किंवा एखादी संकल्पना विद्यार्थ्यांच्या पातळीला अनुरूप सोप्या भाषेत मांडणे यांसारख्या अनेक गोष्टी एआयच्या सहाय्याने अधिक प्रभावीपणे करता येतात. जे काम पूर्वी बराच वेळ घेणारे होते, ते आज कमी वेळात आणि अधिक परिणामकारकपणे करता येऊ लागले आहे. परिणामी, यांत्रिक कामांचा ताण कमी होऊन विद्यार्थ्यांशी अधिक संवाद साधण्यासाठी वेळ उपलब्ध होतो. माझ्या मते, हाच या तंत्रज्ञानाचा सर्वांत मोठा फायदा आहे.

आजचा अभ्यासक्रम विद्यार्थ्यांना केवळ माहिती देण्यापेक्षा विचार करायला, प्रश्न विचारायला, अनुभवातून शिकायला आणि स्वतः ज्ञानाची निर्मिती करायला प्रोत्साहन देतो. वर्गातील प्रत्येक विद्यार्थी वेगळा असतो. त्याची गती, क्षमता, आवडीनिवडी आणि शिकण्याच्या गरजा भिन्न असतात. अशा परिस्थितीत सर्व विद्यार्थ्यांसाठी एकच पद्धत प्रभावी ठरत नाही. कृत्रिम बुद्धिमत्तेच्या सहाय्याने विविध क्षमतांच्या विद्यार्थ्यांसाठी वेगवेगळे अध्ययन साहित्य तयार करणे, अतिरिक्त मदतीची गरज असलेल्या विद्यार्थ्यांना पूरक सामग्री उपलब्ध करून देणे किंवा प्रगत विद्यार्थ्यांसाठी अधिक आव्हानात्मक कृती तयार करणे शक्य होते. त्यामुळे अध्यापन अधिक समावेशक आणि विद्यार्थीकेंद्रित होते.

अर्थात, कोणत्याही गोष्टीवरील अती अवलंबित्व धोकादायकच असते. एआयदेखील याला अपवाद नाही. कृत्रिम बुद्धिमत्ता माहिती देऊ शकते; परंतु ती माहिती नेहमीच अचूक असेल याची हमी नसते. त्यामुळे एआयने दिलेली माहिती चिकित्सक दृष्टीने तपासणे, तिची विविध संदर्भांच्या आधारे पडताळणी करणे आणि आवश्यक ते बदल करणे ही शिक्षकाची जबाबदारी राहणार आहे. माहिती आणि ज्ञान यांतील फरक समजावून सांगणे, योग्य प्रश्न विचारण्याची वृत्ती विकसित करणे आणि विवेकपूर्ण विचारांची जडणघडण करणे हे कोणतेही तंत्रज्ञान करू शकत नाही.

खरे तर कृत्रिम बुद्धिमत्तेचा सर्वांत मोठा लाभ वेळ वाचविण्यात नसून, शिक्षकाला पुन्हा विद्यार्थ्यांकडे घेऊन जाण्यात आहे. शिक्षणाचा केंद्रबिंदू तंत्रज्ञान नसून विद्यार्थी आहे. विद्यार्थ्यांच्या डोळ्यांतील कुतूहल ओळखणे, त्यांच्या शंकांना संवेदनशीलतेने उत्तर देणे, अपयशात त्यांना धीर देणे, यशात त्यांचे कौतुक करणे आणि त्यांच्यामध्ये मूल्यांची पेरणी करत त्यांना चांगला माणूस म्हणून घडविणे हे कोणत्याही कृत्रिम बुद्धिमत्तेला शक्य नाही.

कदाचित उद्याच्या वर्गात फळ्याची जागा स्क्रीन घेईल, वहीऐवजी टॅबलेट असेल आणि माहितीचा स्त्रोत कृत्रिम बुद्धिमत्ता असेल; पण विद्यार्थ्यांच्या डोळ्यांतील कुतूहलाला दिशा देणारा, त्यांच्या अपयशावर मायेचा हात ठेवणारा, त्यांच्या यशात आनंद मानणारा आणि त्यांच्यात माणूस घडविण्याचे स्वप्न पाहणारा शिक्षक तितकाच आवश्यक राहील. म्हणूनच, कृत्रिम बुद्धिमत्तेच्या युगात माझ्यासारख्या शिक्षकाला भीती वाटत नाही; उलट एका नव्या सहप्रवाशासोबत अधिक समृद्ध, अधिक सर्जनशील आणि अधिक मानवी शिक्षणप्रवासाची उत्सुकता वाटते.

शिक्षक म्हणून एआय मला केवळ वेळ वाचवून देणार नाही; तो मला पुन्हा विद्यार्थ्यांमध्ये रमण्याची संधी देणार आहे. आणि कदाचित, कृत्रिम बुद्धिमत्तेच्या या नव्या युगात शिक्षक म्हणून माझे सर्वांत मोठे यश हे तंत्रज्ञानावर प्रभुत्व मिळविण्यात नसून, तंत्रज्ञानाच्या सहाय्याने अधिक संवेदनशील, अधिक विचारशील आणि अधिक माणूसपण जपणाऱ्या पिढीच्या निर्मितीत सहभागी होण्यात असेल.

**अजय काळे**

## स्तनपान जागृती सप्ताह

आपलं लेकरु खरच-
असते की नाही
जीव की प्राण?

त्याच्या संतुलीत विकासासाठी
आवश्यक आहे स्तनपान ..!

संसर्गजन्य आजार व-
कुपोषणाचा धोका होतो कमी

बौध्दीक शारीरीक मानसिक
विकासाच्या वृध्दीची असते
हमी..!

गैरसमजापोटी आजकाल
स्तनपान टाळण्यावर देती भर

त्यामुळे माता व बालकालाही
दुष्परीणाम भोगावे
लागे आयुष्यभर..!



**प्रा.अशोक सारडा,**
मेहकर
मो.९४२१३ ९४३३९

# भक्तांचा भाव आणि भगवंताची धाव

**दे**वशयनी आषाढी एकादशीच्या पर्वावर आषाढी वारीचा सोहळा पंढरपुराच्या वाळवंटात संपन्न झाला.राज्याच्या नव्हे तर देशाच्या कानाकोपऱ्यातून आषाढी वारीत हजारो दिंड्या विठुरायाच्या दर्शनासाठी दाखल होतात. यंदा तर सातासमुद्रापार इंग्लंडमधून पंढरपुरात विठ्ठल भक्तांची मांदियाळी पालखीसह दाखल झाली होती.पंढरीच्या वारीचा महिमा मोठा विलक्षण आहे.आता अनेक दिंड्या परतीचा वाटेवर निघाल्या आहेत. तर काहींची परतवारी पूर्ण सुद्धा झालेली आहे.

भगवंताला भक्ताच्या भेटीची ओढ कायम असते यात शंका नाही.देवभक्ताचे अतूट नातं जन्मोजन्मीचे असते.भगवंताच्या भक्तीने केवळ स्वतःचा उद्धार होत नाही,तर भक्तांच्या कुळाचा उद्धार सुद्धा होत असतो.भगवंत भक्तांच्या नातेसंबंधात आपल्या संतांची थोरवी फार मोठी आहे.याच थोर भक्तीपरंपरेतील संत सावता माळी होय.विठ्ठलाच्या नामस्मरणात आपल्या शेतमळ्यात कार्यमग्न राहून, विठ्ठलभक्ती करणारे संत सावता महाराज सर्वांचे सुप्रचित आहे.

*'कांदा मुळा भाजी*
*अवघी विठाई माझी।*
*लसूण मिरची कोथिंबीर*
*अवघा झाला माझा हरी।।*
*ऊस गाजर रताळू*
*अवघा झालासे गोपाळू।*
*मोट नाडा विहीर दोरी*
*अवघी व्यापिली पंढरी।।*
*सावता म्हणे केला मळा*
*विठ्ठल पायी गोविला गळा'।*

अशा शब्दात सावतामाळी रचना करून आपल्या मळ्यात प्राणप्रिय विठाईला शोधतात.मळ्यातील लसूण,मिरची,कोथिंबीरीला आपला हरी



म्हणतात.तर ऊस,गाजर,रताळूला गोपाळु मानतात आणि याच मळ्यातील मोट,नाडा, विहीर,दोरी च्या रूपाने आपल्या मळ्याला पंढरी सारखे व्यापून टाकल्याची अनुभूती येते.मग पंढरीच्या वारीला जाण्याचे प्रयोजन उरतच नसे. खरंतर,सावता माळी पंढरीची वारी कधीच करत नसे.परंतु आपल्या अरण गावावरून जाणाऱ्या प्रत्येक वारकऱ्याला माझा निरोप विठुराया पर्यंत पोहोचवा असे म्हणायचे.

भक्ताला भगवंताच्या भेटीची ओढ असावी परंतु, सावता महाराजांच्या बाबतीत उलट घडते.पंढरीचे सावळे परब्रम्ह सावतांच्या मळ्यात सावता सोबत राबतात. केवढा हा भक्ताप्रति देवाचा प्रेमभाव.भक्तांचा श्रेष्ठ अधिकार एवढा की,चक्क देव भक्तांच्या भेटीला जातो.या भक्तीपरंपरचे अनोखे दर्शन सुमारे पाच शतकांपासून आजही बघायला मिळते. होय! आपला लाडका भक्त संत सावता माळ्याच्या भेटीसाठी पांडुरंगाची पालखी श्रीक्षेत्र अरण गावात मार्गस्थ होते. विठ्ठल- रुक्मिणीच्या महाद्वारातून, शेकडो वारकऱ्या समावेत 'ज्ञानोबा- तुकाराम, पुंडलिक वरदा हरी विठ्ठल' च्या गजरात विठुरायाच्या पादुका पालखी समावेत अरणच्या दिशेने मार्गस्थ होतात. आषाढी वारीनंतर पांडुरंग परमात्मा स्वतःआपल्या भक्तांच्या भेटीसाठी निघतात.ही पंढरीच्या विठ्ठलभक्ती परंपरेतील अत्यंत भावस्पर्शी परंपरा मानली जाते. ज्याप्रमाणे भक्त पुंडलिकाचा सेवाभाव पाहून श्रीहरी विष्णू वैकुंठ सोडून थेट पंढरपुरात आले.त्याचप्रमाणे, भक्ती आणि कर्मयोगाचा संयोग सावता माळ्यांच्या बाबतीत झालेला दिसतो.पंढरपूर ते अरण या मार्गावर मजल-दरमजल करत विठुरायाची पालखी सावत्या माळ्यांच्या अरण गावी पोहोचते. संत सावता माळ्यांच्या संजीवन समाधी सोहळ्यानंतर, विठुरायाच्या पालखीच्या परतीचा प्रवास सुरू होतो. भक्तांच्या भेटीसाठी साक्षात भगवंत निघाल्याचे हे अनोखे विलक्षण भक्तीपर्व पाहण्यासाठी हजारो भाविक अरण मध्ये दाखल होतात.

*'धन्य ते अरण, रत्नाचीच खाण*
*जन्मला निधान, सावता तो'*

अशा शब्दात संत नामदेवांनी सावता माळ्यांचा गौरव केला आहे.

**शशिकांत तोटे**
दारव्हा,जि.यवतमाळ
मो:९१३०८३५४५८

# श्रावण मास!!

*बालकवींनी श्रावण मासाचे*
*सुंदर वर्णन केले आहे.*
*'श्रावण मासी हर्ष मानसी*
*हिरवळ दाटे चोहिकडे।*
*क्षणात येते सरसर शिरवे क्षणात*
*फिरुनी उन पडे।'*

**अ**सा हा वर्षा ऋतूत जलधारांचा वर्षाव करत येणारा श्रावणमास हसत खेळत येतो असे भासते.भारतीय संस्कृती, समृद्ध परंपरा आणि व्रते आणि सण- उत्सव यांचे विलोभनिय दर्शन हा श्रावणमास घडवतो. हिंदु संस्कृती 'निसर्ग देवोभव' असे मानते. निसर्ग हे ईश्वराचेच एक रुप आहे. पृथ्वी,जल,वायू(वारा),तेज(सूर्य)आणि आकाश ही पंचमहाभूते या वेगवेगळ्या देवता आहेत.यांच्या कृपेशिवाय आपले जीवन अशक्य आहे.चराचरात ईश्वर व्यापलेला आहे.प्राणी आणि वनस्पती हे सुद्धा आपले सन्मित्र आहेत.या विचारधारेला अनुसरून श्रावण शुद्ध पंचमीला नागपंचमी साजरी केली जाते.नागदेवतेची पूजा केली जाते.महाराष्ट्रात काही ठिकाणी श्रावण अमावस्येला तर काही ठिकाणी भाद्रपद अमावस्येला 'बैलपोळा' म्हणजे बैलांची पूजा केली जाते. भारत हा शेतीप्रधान देश आहे. बैलांविषयी कृतज्ञता म्हणून हा दिवस पाळला जातो.



श्रावणातील रविवारी आदित्य रेणूबाईची काही ठिकाणी पूजा केली जाते. सूर्यनारायणाच्या कृपेमुळेच मानवी जीवन संपन्न होते. सर्व प्रकारच्या ऊर्जेचा प्रमुख स्रोत म्हणजे सूर्यदेव. म्हणून कृतज्ञता भावाने ही पूजा केली जाते.'मंगळागौरी ' हा नववधूंसाठी उत्साहाचा आणि मांगल्याचा दिवस असतो.श्रावणातील दर मंगळवारी मंगळागौरीची- देवीची पूजा केली जाते.या पूजेत एकवीस प्रकारची पत्री म्हणजे पाने देवीला अर्पण केली जातात. बेल तुळस,माका,पारिजात, रुई, आघाडा,दुर्वा अशा वेगवेगळ्या वनस्पतींचा यामधे समावेश असतो. या निमित्ताने या वनस्पतींचा औषधी उपयोग माहित व्हायला त्यामुळे मदत होते.

दर शुक्रवारी जिवतीची पूजा केली जाते. ही पूजा 'आई' आपल्या अपत्यांचे रक्षण व्हावे त्यांना दीर्घायुष्य लाभावे यासाठी जीवतीची पूजा करते.शनिवारी मारुतीची उपासना केली जाते मारुतीच्या उपासनेमुळे शक्ती प्राप्त होते बळ मिळते.तसेच मनाची सकारात्मकता वाढते. हनुमंताला रूईच्या पानांची माळ घातली जाते.कारण रुईच्या पानाच्या मागच्या बाजूला जो पांढरा थर असतो तो त्यावर मध घालून चाटल्यास शक्ती मिळते. हल्लीच्या भाषेत बोलायचे झाले तर थकवा आल्यावर जसे 'ओआरएस' घेतले जाते तेच काम रुईचे पान करते.श्रावण सोमवारी शिवाची पूजा केली जाते.शिव पिंडीवर दुधाचा अभिषेक केला जातो आणि बिल्वपत्र वाहिले जाते. त्याचा आध्यात्मिक स्तरावर लाभ होत असतो.

श्रावण पौर्णिमा म्हणजे राखी पौर्णिमा! भाऊ बहिणीचे एकमेकांवरील प्रेम व्यक्त करण्याचा दिवस. बहिण भावाला राखी बांधते म्हणजेच त्याचे कल्याण व्हावे असे देवाकडे मागणी मागते आणि भावाने तिचे रक्षण करावे अशी राखीच्या माध्यमातून विनंती करते.सध्या हिंदूंवर लव जिहाद चे भयानक संकट ओढवले आहे या संकटाचा सामना करण्यासाठी प्रत्येक युवक युवतीने स्वसंरक्षण प्रशिक्षण घेण्याची आवश्यकता आहे. स्वतःचे आपल्या कुटुंबाचे आणि आपल्या समाजबांधवांचे रक्षण होण्यासाठी हे प्रशिक्षण आवश्यक आहे.

नारळी पौर्णिमा हा कोळी बांधवांसाठी महत्त्वाचा दिवस. ते समुद्राला म्हणजेच जल देवतेला नारळ अर्पण करून आपल्या मासेमारीला आरंभ करतात. जलदेवतेला कृतज्ञता व्यक्त करून स्वतःचे रक्षण व्हावे मासेमारीचा उद्योग निर्विघ्नपणे चालू रहावा यासाठी प्रार्थना करतात. 'श्रीकृष्ण जन्म'हा श्रावण महिन्यातील महत्त्वाचा दिवस. कृष्ण जन्माच्या दुसऱ्या दिवशी दहीहंडी हा उत्सव साजरा केला जातो. सध्या दहीहंडीला धार्मिक स्वरूप न राहता बाजारी आणि विकृत स्वरूप आलेले आहे. ते बदलण्याची आवश्यकता आहे.

हल्ली बायकांची दहीहंडी असा एक विकृत प्रकार रूढ होत आहे. स्त्री -पुरुष समानता या चुकीच्या संकल्पनेमुळे असे होत आहे.निसर्गानेच स्त्रियांकडे वेगळे दायित्व दिलेले आहे.स्त्री हे सर्जनाचे प्रतीक आहे.स्त्री आणि पुरुष यांच्या शरीर रचनेत निसर्ग दत्त फरक आहे त्याचा मान राखायलाच हवा. आरोग्य दृष्ट्या आणि अध्यात्मिक दृष्ट्या स्त्रियांनी दहीहंडी फोडणे अयोग्य आहे.हा बोध घेऊ या. हसत खेळत येणाऱ्या श्रावण मासाचे स्वागत करूया.

**संध्या काटदरे**

## जाहीर नोटीस

**वि. सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १३२०/२०२६ — प्रोसेस नं. १०१८५/२०२६
चौ.ता. २१/०९/२०२६ — दिनांक : ०७/०८/२०२६

**अर्जदार :** १. आदिश नितिन रायपुरे २. कु. ऋतुजा नितीन रायपुरे दोघेही रा. बाजोरिया नगरी, हिंगणा रोड, कौलखेड, अकोला. ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : सिमा नितीन रायपुरे
**पत्ता :-** रा. व्दारा आदिश नितिन रायपुरे रा. बाजोरिया नगरी, हिंगणा रोड, कौलखेड, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत सिमा नितीन रायपुरे यांचे दि. २३/०५/२०२६ रोजी राहते घरी, अकोला. ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २१/०९/२०२६ रोजी सकाळी १:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०७/०८/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
प्र. अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## जाहीर नोटीस

**वि. सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १२९५/२०२६ — प्रोसेस नं. १०१९१/२०२६
चौ.ता. १७/०९/२०२६ — दिनांक : ०७/०८/२०२६

**अर्जदार :** १. चंद्रकला भिमराव सहारे २. सुनिल भिमराव सहारे, मो. क्र. ८९९९७६९५४० दोघेही रा. स्मशान भूमी रोड, महात्मा फुले नगर, सिंधी कॅम्प, अकोला. ता. जि. अकोला. ३. कल्पना शैलेष वाघाडे रा. स्मशान भूमी रोड, महात्मा फुले नगर, सिंधी कॅम्प, अकोला. ता. जि. अकोला. ४. किरण कुंदन पारोचे रा. क्वॉटर नं. ७, सर्वोपचार रूग्णालय, अकोला. ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : भिमराव उकर्डा सहारे
**पत्ता :-** रा. स्मशान भूमी रोड, महात्मा फुले नगर, सिंधी कॅम्प, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत भिमराव उकर्डा सहारे यांचे दि. २४/०६/२०२० रोजी शासकीय वैद्यकिय महाविद्यालय, अकोला ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक १७/०९/२०२६ रोजी सकाळी १:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०७/०८/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
प्र.अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## जाहीर नोटीस

**वि.०३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १३०९/२०२६ — प्रोसेस नं. १०३१४/२०२६
चौ.ता. २३/०९/२०२६ — दिनांक : १०/०८/२०२६

**अर्जदार :** १. कल्पना दिलीप पिटके २. केदार दिलीप पिटके ३. केतकी दिलीप पिटके सर्व रा. गुप्ते मार्ग, दिवेकर जिम जवळ, जठारपेठ, अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : दिलीप जनार्दन पिटके
**पत्ता :-** रा. गुप्ते रोड, दिवेकर जिम जवळ, जठारपेठ, अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत दिलीप जनार्दन पिटके यांचे दि. ०६/०७/२०२६ रोजी अकोला येथे निधन झाले आहे. वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २३/०९/२०२६ रोजी सकाळी १:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक १०/०८/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
प्र. अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## जाहीर नोटीस

सर्वत्र बॅक, वित्तीय संस्था तसेच सर्वत्र लोकांना या जाहीर नोटीस व्दारे सुचित करण्यात येते की श्रीमती विजया व्यंकटेश नामजोशी रा. पालवनकर यांचा वाडा लहान उमरी अकोला. ता. जि. अकोला यांचे कडुन फसवणुक करुन श्रीराम बील्डकॉन तर्फे सचिन कोकाटे, अभय बीजवे, आदित्य बीजवे यांनी मौजे उमरी प्र अकोला चे गेट कं. ८ + १३ मधील जमीनीचे रहीवासी वापरा करीता रा.मा. कं. २८/२/१९७२ – ७३, नि ता. २१/०१/१९७३ नुसार अकृषक प्लॉट क्रं. ८ मीळकत क्रं. २२५ क्षेत्र २९३ चौ. मी. वर बांधकाम असतांना खुला प्लॉट दाखवुन गैर कायदेशीर खरेदीखत दस्त कं. ५२२५ / २०२३ नुसार दि. ०४/१०/२०२३ चे नोंदवले होते. सदर मालमत्तेची कीमत रक्कम रु. १,०१,५०,०००/- अशी ठरलेली होती. खरेदी खतामध्ये मध्ये नमुद धनादेशावर तारीख नमुद केलेली नव्हती. परंतु सचिन कोकाटे व अभय बीजवे व आदित्य बीजवे यांनी गुंडामार्फत अपहरण करुन दि. ०२/०८/२०२६ रोजी पाडले त्याबाबत पोलीस स्टेशन सीव्हील लाईन्स अकोला येथे दिलेलया तक्रारीनुसार पोलीस स्टेशन सीव्हील लाईन्स अकोला चे ठाणेदार कायटे मॅडम यांनी केलेल्या समजोत्या नुसार धनादेशावर दि. ०७/०८/२०२६ अशी तारीख नमुद करण्याचे ठरले. परंतु श्रीराम बील्डकॉन अकोला यांनी विजया व्यंकटेश नामजोशी यांचे नावे दिलेला दि. अकोला वाशीम जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅक ली . अकोला चा रक्कम रु.१०,५०,००० /- धनादेश कं. ०००१४५ दि. ०७/०८/२०२६ तसेच धनादेश कं. ०००१४६ रक्कम रु.१००००००/- तसेच धनादेश कं. ०००१४४ रक्कम रु.११,००,०००/- अनादरीत झालेले आहेत. करीता तशी नोंद अभीलेखात घेण्याची कृपा करावी. तसेच सचिन कोकाटे यांनी दिलेला भारतीय स्टेट बॅक शाखा आदर्श कॉलीनी अकोला चा धनादेश कं ४१६७८९ रक्कम रु - .६०,००,०००/- दिले होते. सदर धनादेश अनादरीत झाला आहे. तसेच वि. ४ थे सह दिवाणी न्यायाधिश ( क स्तर ) अकोला यांचे न्यायालयात रे. दि. मु. २२९/२०२४, विजया श्रीराम बील्डकॉन प्रलबीत आहे तसेच कार्यवाहीसाठी जिल्हाधिकारी कार्यालय अकोला समोर उपोषण सुरु आहे. करीता कुणीही कोणत्याही प्रकारचा व्यवहार वरील मालमत्तेबाबत श्रीराम बील्डकॉन सोबत करु नये. सबब ही जाहीर नोटीस.

**श्रीमती. विजया व्यंकटेश नामजोशी**
रा. पालवनकर यांचा वाडा लहान उमरी
अकोला. ता. जि. अकोला मो. ९६५७४९१५०१
नोटीस देणार


जनमाध्यम
जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

**संपादक - प्रदीप देशपांडे**
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अकोला आवृत्ती वर्ष - ३० अंक २४४**
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail. com, abhiram.deshpande70@gmail.com

# घरं पाडली ; आता 'न्याय' मिळेपर्यंत महिलांचा एल्गार!

## १४ ऑगस्टपासून गटविकास अधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषणाचा इशारा

■ प्रतिनिधी | अकोट ■

'आमचा गुन्हा काय? आम्ही गरीब आहोत, एवढाच?' असा संतप्त सवाल करीत वडाळी सटवाई येथील गरीब व निराधार महिलांनी ग्रामपंचायत प्रशासनाविरोधात दंड थोपटले आहेत. स्वतःच्या मालकीच्या प्लॉटवरील घरे दि. १० ऑगस्ट रोजी पाडण्यात आल्याचा आरोप करीत या महिलांनी आता थेट आंदोलनाचा मार्ग स्वीकारला असून, १४ ऑगस्टपासून पंचायत समिती अकोट येथील गटविकास अधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषण करण्याचा इशारा दिला आहे.

### वडाळी सटवाईतील कारवाईने संताप



महिलांच्या निवेदनानुसार, कुटुंबाचा उदरनिर्वाह करीत असताना स्वतःच्या जागेवर त्यांनी घरे उभी केली होती. मात्र, अचानक झालेल्या कारवाईने त्यांच्या संसाराचा अक्षरशः चुराडा झाला. घरातील भांडीकुंडी, संसारोपयोगी साहित्य आणि इतर वस्तूंचे नुकसान झाल्याचा दावा त्यांनी केला आहे. डोक्यावरचे छप्पर हिरावून घेणाऱ्या या कारवाईमुळे कुटुंबे उघड्यावर आली असल्याचे महिलांचे म्हणणे आहे.

सर्वात गंभीर बाब म्हणजे, संबंधित महिलांनी आपल्या प्लॉटची ग्रामपंचायत अभिलेखात नमुना क्रमांक ८ मध्ये नोंद करण्यासाठी मागील वर्षभरापासून अर्ज-विनंत्या केल्याचा दावा केला आहे. मात्र, या अर्जांवर अंतिम निर्णय घेण्याऐवजी बांधकाम परवानगी नाकारण्यात आली आणि त्यानंतर घरांवर कारवाई करण्यात आल्याचा आरोप त्यांनी केला आहे.

यामुळे प्रशासनाच्या कारवाईवरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. जागेची नोंद करण्यासाठी अर्ज करणाऱ्या महिलांच्या अर्जांचे काय झाले? बांधकाम परवानगी नेमकी कोणत्या कारणाने नाकारण्यात आली? आणि घरे पाडण्यापूर्वी कोणती कायदेशीर प्रक्रिया पार पडली? या प्रश्नांची उत्तरे प्रशासनाला द्यावी लागणार आहेत.

गावातील अनधिकृत बांधकामांबाबत प्रशासनाची भूमिका समान आहे का, यावरही महिलांनी बोट ठेवले आहे. गरीब, महिला आणि राजकीयदृष्ट्या कमजोर व्यक्तींवरच कारवाई होत असल्याचा संशय त्यांनी व्यक्त केला आहे.

'आमच्या घरांवर ज्या नियमांचा आधार घेऊन कारवाई केली, त्याच नियमांच्या आधारे गावातील प्रत्येक अनधिकृत बांधकामावर कारवाई करून दाखवा,' असे खुले आव्हानच महिलांनी प्रशासनाला दिले आहे. एक न्याय आणि दुसऱ्याला दुसरा न्याय हा कारभार चालणार नाही. गरीबांच्या घरावर बुलडोझर चालवायचा असेल, तर तो कायद्याच्या चौकटीत सर्वांवर समान चालला पाहिजे, अशी भूमिका महिलांनी घेतली आहे.

### 'मागण्या मान्य होईपर्यंत माघार नाही'

प्रशासनाने तातडीने निर्णय न घेतल्यास १४ ऑगस्टपासून आमरण उपोषण सुरू करण्याचा निर्धार महिलांनी व्यक्त केला आहे. 'घरांचा प्रश्न सुटेपर्यंत, जागेची कायदेशीर नोंद होईपर्यंत आणि झालेल्या नुकसानीची भरपाई मिळेपर्यंत संघर्ष सुरूच राहील,' असा ठाम इशारा निवेदनातून देण्यात आला आहे. दरम्यान, महिलांनी केलेल्या आरोपांबाबत ग्रामपंचायत व संबंधित प्रशासनाची अधिकृत भूमिका अद्याप स्पष्ट झालेली नाही. त्यामुळे १० ऑगस्टच्या कारवाईमागील नेमका कायदेशीर आधार काय होता आणि कारवाईपूर्वी सर्व प्रक्रिया पाळण्यात आली होती का, याचा खुलासा प्रशासनाकडून होणे आता आवश्यक ठरणार आहे.

### नुकसानभरपाई, निवारा आणि घरासाठी परवानगी


महिलांनी प्रशासनासमोर एक-दोन नव्हे तर नऊ मागण्या मांडल्या आहेत. घर पाडण्याच्या कारवाईची चौकशी, प्लॉटची नमुना क्रमांक ८ मध्ये नोंद, नियमानुसार बांधकाम परवानगी, घर व संसारोपयोगी साहित्याचा पंचनामा करून नुकसानभरपाई, कारवाईची कागदपत्रे देणे, दोषींवर कारवाई तसेच गावातील आणि अकोट तालुक्यातील अनधिकृत बांधकामांची समान निकषांवर तपासणी करण्याची मागणी करण्यात आली आहे. त्याचबरोबर घर गमावलेल्या कुटुंबांना तातडीने निवारा आणि आवश्यक शासकीय मदत देण्याची मागणीही करण्यात आली आहे.

### नोटीसपासून पंचनाम्यापर्यंत सर्व कागदपत्रांची मागणी

घर पाडण्यापूर्वी प्रशासनाने कोणती नोटीस बजावली, कोणता आदेश काढला, पंचनामा झाला का, तसेच कारवाईची संपूर्ण कायदेशीर प्रक्रिया काय होती, याची कागदपत्रे उपलब्ध करून देण्याची मागणी महिलांनी केली आहे. कारवाईदरम्यान कोणत्याही अधिकारी किंवा कर्मचाऱ्याने अधिकाराचा गैरवापर केला असल्यास संबंधितांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणीही करण्यात आली आहे.

# रोहयोच्या कामात वयोवृद्ध मजुरांची कागदोपत्री उपस्थिती!

## खेट्रीतील प्रकार; शासनाच्या निधीचा गैरवापर झाल्याचा आरोप




■ प्रतिनिधी | खेट्री ■

पातूर तालुक्यातील खेट्री येथे रोजगार हमी योजनेच्या (रोहयो) कामांमध्ये प्रत्यक्ष कामावर उपस्थित नसलेल्या तसेच वयोमानामुळे मजुरीचे काम करण्यास सक्षम नसलेल्या मजुरांची कागदोपत्री उपस्थिती दाखविल्याचा आरोप होत आहे. संबंधित यंत्रणेच्या दुर्लक्षामुळे शासनाच्या निधीचा गैरवापर होत असल्याची चर्चा गावात सुरू आहे. रोहयोच्या कामावर दररोज प्रत्यक्ष उपस्थित असलेल्या मजुरांची नोंद हजेरीपत्रकावर करणे अपेक्षित असताना काही कामांमध्ये कागदोपत्री हजेरी दाखवून मजुरीची रक्कम काढली जात असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. विशेष म्हणजे, काही वयोवृद्ध तसेच प्रत्यक्ष कामावर नसलेल्या मजुरांची नावे मस्टर रोलवर दाखविण्यात आल्याचा दावा करण्यात येत आहे.

या प्रकाराची सत्यता पडताळण्यासाठी संबंधित कामांची प्रत्यक्ष पाहणी करून हजेरीपत्रक, मस्टर रोल, मजुरांच्या बँक खात्यात जमा झालेली मजुरी आणि कामाच्या ठिकाणचे अभिलेख तपासण्याची मागणी होत आहे. चौकशीअंती अनियमितता आढळल्यास संबंधितांकडून शासनाच्या निधीची वसुली करून दोषींवर कारवाई करावी, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे. दरम्यान, रोजगार हमी योजनेचा मुख्य उद्देश ग्रामीण भागातील गरजू नागरिकांना स्थानिक पातळीवर रोजगार उपलब्ध करून देणे हा आहे. मात्र, प्रत्यक्ष गरजू मजुरांना काम न मिळता कागदोपत्री हजेरीच्या माध्यमातून निधीचा अपव्यय होत असेल, तर यामुळे योजनेच्या मूळ उद्देशालाच हरताळ फासला जात असल्याची भावना व्यक्त होत आहे.

**मजुरीसाठी मजुरांचे शहरांकडे पलायन! :** खेट्री येथे रोहयोच्या कामांमध्ये वयोवृद्ध व कथित बोगस मजुरांची कागदोपत्री उपस्थिती दाखविल्यामुळे गरजू मजुरांना काम मिळत नसल्याचा आरोप आहे. परिणामी, रोजगाराच्या शोधात गावातील मजुरांना शहरांकडे पलायन करावे लागत असल्याची स्थिती आहे. पातूर पंचायत समितीच्या संबंधित अधिकाऱ्यांनी या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेऊन चौकशी करावी, अशी मागणी ग्रामस्थांकडून होत आहे.

# 'व्यसनाला नकार, उज्ज्वल भविष्याला होकार!'

■ प्रतिनिधी | अकोट ■

व्यसनाची सुरुवात अनेकदा 'एकदा करून पाहू' या मानसिकतेतून होते आणि पुढे त्याचे रूपांतर आयुष्य उद्ध्वस्त करणाऱ्या सवयीत होते. त्यामुळे विद्यार्थीदशेतच व्यसनांपासून दूर राहण्याची जाणीव निर्माण होणे गरजेचे आहे. याच उद्देशाने अकोट शहर पोलीस ठाण्याच्या वतीने आस्की किड्स येथे व्यसनमुक्त भारत अभियान राबविण्यात आले.



**आस्की किड्समध्ये व्यसनमुक्त भारत अभियान**
**पोलीस निरीक्षक किशोर जुनघरे यांचा विद्यार्थ्यांना कानमंत्र**

कार्यक्रमात पोलीस निरीक्षक किशोर जुनघरे यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत तंबाखू, गुटखा, सिगारेट, मद्य तसेच अमली पदार्थांपासून दूर राहण्याचे आवाहन केले. व्यसनाचा परिणाम केवळ आरोग्यावरच होत नाही, तर त्याचा फटका शिक्षण, व्यक्तिमत्त्व आणि भविष्यातील करिअरलाही बसतो, याकडे विद्यार्थ्यांचे लक्ष वेधण्यात आले. सध्याच्या काळात मित्रांचा दबाव, ताणतणाव, नैराश्य किंवा कुतूहलातून काही विद्यार्थी व्यसनांकडे आकर्षित होतात. अशा परिस्थितीत कोणत्याही दबावाला बळी न पडता 'नाही' म्हणण्याची मानसिक ताकद विद्यार्थ्यांनी विकसित करावी, असा संदेश यावेळी देण्यात आला. व्यसनांपासून दूर राहण्यासाठी विद्यार्थ्यांनी आपली ऊर्जा क्रीडा, कला, संगीत आणि सामाजिक उपक्रमांकडे वळवावी. शारीरिकदृष्ट्या तंदुरुस्त आणि मानसिकदृष्ट्या सक्षम युवा पिढी घडविणे ही काळाची गरज असल्याचेही मान्यवरांनी सांगितले. कार्यक्रमाला स.पो.उ.नि. हिंमतराव दंदी, शाळेचे सचिव नितीन झाडे, प्राचार्य नेहा झाडे यांची प्रमुख उपस्थिती होती. पोलीस निरीक्षक किशोर जुनघरे यांचे शाळेचे सचिव नितीन झाडे यांनी स्वागत केले. कार्यक्रमाचे संचालन शिक्षक मनीष सरकटे यांनी केले. यावेळी शिक्षक आशिष पवार, गौरव कांडलकर, अरुणा काळे, मंजुषा हरणे, पूजा भट्टी यांच्यासह शिक्षकवर्ग उपस्थित होता.

# समाजाने 'स्त्रीत्वाचा स्वीकार' या संकल्पनेची कास धरावी




■ प्रतिनिधी | अकोला ■

आज समाजात सर्व स्तरावर तरुण महिलावर वाढत असलेल्या विविध दबावांच्या पार्श्वभूमीवर स्वाभिमान, प्रतिष्ठा आणि संतुलनासह स्त्रीत्व समजून घेण्याची व ते स्वीकारण्याची घरी गरज आहे. स्त्री ही खऱ्या अर्थाने ताठ मानेने जगून तिने तिचे स्त्रीत्व जपले पाहिजे.म्हणून या संकल्पनेचा समाजाने स्वीकार करून स्त्रीत्वाला सन्मान द्यावा असे आवाहन गर्ल इस्लामिक ऑग.र्च्या वतीने करण्यात आले. नवयुवती व विद्यार्थिनींच्या विकास संदर्भात विविध उपक्रम राबविणाऱ्या गर्ल इस्लामिक ऑग.र्च्या वतीने १ ऑगस्ट ते ३१ ऑगस्ट पर्यंत राष्ट्रीय स्तरावर 'स्त्रीत्व स्वीकार'हे अभियान राबविण्यात येत आहे.गर्ल इस्लामिक ऑग.र्च्या वतीने शासकीय विश्रामगृह येथे बुधवारी आयोजित पत्रकार परिषदेत या विषयाची माहिती देण्यात आली. यावेळी शाखा अध्यक्ष कु. आसेमा शेख,ऑर्ग च्या राष्ट्रीय कार्यकारणी सदस्या कु अयमान शादाब, महाराष्ट्र उत्तर दोनच्या कॅम्पस सचिव सफिया शेख,माध्यम सचिव मोनिसा शेख, जमात ए इस्लामी हिंदच्या महिला शाखा अध्यक्ष सरवत सलमा सहाबा, मोहीम समनव्यक फायका समिन आदी पदाधिकारी उपस्थित होत्या.

# 'गुटखा-दारूला नाही, शिक्षण-क्रीडेला होकार!'

## मुंडगावात पोलिसांचा विद्यार्थ्यांना कानमंत्र

■ प्रतिनिधी | अकोट ■

'व्यसनाच्या वाटेवर जाऊ नका, शिक्षण आणि क्रीडेतून भविष्य घडवा!' असा थेट संदेश देत अकोट ग्रामीण पोलिसांनी मुंडगाव येथील राधाबाई गणगणे विद्यालयातील विद्यार्थ्यांमध्ये व्यसनमुक्तीची जनजागृती केली. अकोला जिल्हा पोलिसांच्या 'मिशन उडान' उपक्रमांतर्गत हा कार्यक्रम घेण्यात आला.



विद्यालयाचा परिसर नशामुक्त आणि तंबाखूमुक्त ठेवण्याच्या उद्देशाने आयोजित या कार्यक्रमात अकोट ग्रामीण पोलिस ठाण्याचे ठाणेदार श्रीधर गुट्टे यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. तंबाखू, गुटखा, दारू तसेच विविध अमली पदार्थांच्या सेवनामुळे आरोग्यावर होणारे गंभीर परिणाम त्यांनी विद्यार्थ्यांना समजावून सांगितले. व्यसनाची सुरुवात सहज होत असली तरी त्याचा परिणाम आरोग्य, शिक्षण आणि भविष्यातील संधींवर होतो. त्यामुळे विद्यार्थ्यांनी व्यसनांपासून दूर राहून शिक्षण, क्रीडा आणि सकारात्मक उपक्रमांमध्ये सहभागी व्हावे, असे आवाहन त्यांनी केले.

विद्यार्थिनींशी संवाद साधताना ठाणेदार गुट्टे यांनी मुलींना अन्याय, छळ किंवा त्रास सहन न करण्याचे आवाहन केले. कोणत्याही प्रकारचे भीतीचे वातावरण निर्माण झाल्यास तातडीने पोलिसांशी संपर्क साधावा अथवा ११२ या आपत्कालीन क्रमांकाचा वापर करावा, असे त्यांनी सांगितले. 'व्यसनमुक्त विद्यार्थी, सुरक्षित समाज' हा संदेश या उपक्रमातून विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यात आला. विद्यार्थ्यांना सुरक्षित आणि व्यसनमुक्त वातावरण मिळणे त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी आवश्यक असल्याने विद्यालयाच्या माध्यमातूनही सातत्याने जनजागृती करण्याचा संकल्प करण्यात आला.

कार्यक्रमाला ठाणेदार श्रीधर गुट्टे, बिट जमादार शिवकुमार तोमर, पोलिस हेड कॉन्स्टेबल निलेश खंडारे, सचिन कुलट, पोलिस कॉन्स्टेबल रितेश जयभाये, महिला पोलिस कॉन्स्टेबल दामिनी वानखेडे, प्रतिक्षा शिवणकर यांच्यासह विद्यालयाचे मुख्याध्यापक देवेंद्र सोनटक्के, राजेंद्र मुऱ्हेकार, विनोद रसे, आनंद चंदनकर, डिंगाबर घुगे, निलेश देशमुख, हेमंत गणगणे, माणिक राठोड, शंकर गवई, मिलिंद शेलकर, दीपक गेडाम, अनिता कोडापे, सुवर्णा येवतकर, गीता वलवले, स्वाती मडघे, सुदर्शा पाटकर, अशोक लहाने, अतुल खलोकार, प्रवीण अंबळकार यांच्यासह शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.

# प्रदेशाध्यक्ष पातोडेंच्या सत्कारातून पुरोगामी एकजुटीचा सूर

■ मराठा सेवा संघ, संभाजी ब्रिगेड, जिजाऊ ब्रिगेडचा पुढाकार
■ अठरापगड जाती-धर्मांना सोबत घेऊन काम करण्याचे आवाहन

■ प्रतिनिधी | अकोला ■

वंचित बहुजन आघाडीच्या महाराष्ट्र प्रदेशाध्यक्षपदी लोकशाही पद्धतीने मतदानातून निवड झाल्याबद्दल राजेंद्र पातोडे यांचा मराठा सेवा संघ, संभाजी ब्रिगेड आणि जिजाऊ ब्रिगेडच्या वतीने सत्कार करण्यात आला. अकोला येथील मराठा सेवा संघाच्या जिल्हा कार्यालयात झालेल्या या कार्यक्रमातून शिव-शाहू-फुले-आंबेडकर विचारधारेच्या पुरोगामी चळवळींना एकत्र आणण्याचा सूर उमटला.



लोकशाही प्रक्रियेतून मोठ्या मताधिक्याने निवडून आलेल्या पातोडे यांचा गौरव करताना सामाजिक चळवळींमधील समन्वयाची गरज अधोरेखित करण्यात आली. यावेळी मराठा सेवा संघाचे जिल्हाध्यक्ष डॉ. राजेंद्र कोरडे, माजी जिल्हाध्यक्ष डॉ. पुरुषोत्तम तायडे, प्रदेश संघटक उत्तमराव माने, प्रदेश सदस्य प्रा. प्रदीप चोरे, जिजाऊ ब्रिगेडच्या अध्यक्षा सीमाताई बोके, जिल्हाध्यक्षा रेणुताई गावंडे यांच्यासह विविध पदाधिकारी उपस्थित होते.

**'अठरापगड जाती-धर्मांना सोबत घेऊन परिवर्तनाची लढाई'**

सत्काराला उत्तर देताना राजेंद्र पातोडे यांनी पुरोगामी विचारांच्या सर्व सामाजिक चळवळींनी एकदिलाने काम करण्याचे आवाहन केले. केवळ राजकीय पातळीवर नव्हे, तर सामाजिक परिवर्तनाच्या व्यापक भूमिकेतून सर्व घटकांना सोबत घेण्याची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले. अठरापगड जाती-धर्मांना सोबत घेऊन सामाजिक समतेची चळवळ अधिक व्यापक करण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला.

छत्रपती शिवाजी महाराजांनी उभारलेल्या स्वराज्याच्या धर्तीवर लोककल्याणकारी स्वराज्याची संकल्पना पुढे नेण्यासाठी प्रयत्न करण्याची गरज असल्याचेही पातोडे म्हणाले. शिव-शाहू-फुले-आंबेडकर विचारांच्या सर्व सामाजिक चळवळींनी हातात हात घालून काम केले, तर महाराष्ट्रासह देशाला प्रतिगामी विचारांच्या जोखडातून मुक्त करून पुरोगामी दिशेने नेता येईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

### पदाधिकाऱ्यांची मोठी उपस्थिती

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मराठा सेवा संघाचे सचिव प्रा. संदीप निर्मळ यांनी केले. शिवश्री पंकज जायले यांनी प्रास्ताविकातून सत्कार समारंभाची भूमिका मांडली. यावेळी वंचित बहुजन युवा आघाडीचे जिल्हाध्यक्ष श्रीकांत घोगरे, राजकुमार दामोदर, सचिन शिरोळे यांच्यासह मराठा सेवा संघ, संभाजी ब्रिगेड आणि जिजाऊ ब्रिगेडचे जिल्ह्यातील पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जिल्ह्यात चार आमदार भाजपचे; पण जनता कुणाच्या भरोसे

## आर्वीत वानखेडेंविरोधात कुजबुज, देवळीत बकानेंच्या कार्यशैलीवर प्रश्नचिन्ह; वर्ध्यात भोयर मंत्रिपदाच्या वर्तुळात, कुणावार विकासकामांचा धडाका

**वर्धा/ रवींद्र लाखे**

सत्ता आली की जनतेपासून अंतर वाढते आणि कार्यकर्त्यांपासूनही दुरावा निर्माण होतो, असा राजकारणाचा अनुभव आहे. वर्धा जिल्ह्यात सध्या भाजपच्या चारही आमदारांकडे सत्तेची ताकद असली, तरी त्यांच्या कार्यशैलीबाबत मतदारसंघात वेगवेगळ्या चर्चा सुरू झाल्या आहेत. हिंगणघाट सोडले तर जिल्ह्यातील इतर मतदारसंघांत आमदारांचा तोरा आणि जनतेची कोमा' अशी परिस्थिती निर्माण झाली आहे का हा प्रश्न आता राजकीय वर्तुळात चर्चेचा विषय ठरत आहे.

हिंगणघाटचे आ.समीर कुणावार यांचा मतदारसंघ मात्र याला अपवाद ठरत असल्याचे चित्र आहे. विकासकामांचा पाठपुरावा, विविध प्रकल्पांना गती आणि मतदारसंघातील प्रश्न सोडविण्यासाठी सक्रियता यामुळे कुणावार यांच्या कामाची चर्चा इतर मतदारसंघांतही होत आहे. एकाच पक्षाचे चार आमदार असताना कामाच्या पद्धतीत एवढा फरक का? असा सवाल आता कार्यकर्ते उपस्थित करीत आहेत.

**आर्वीत 'एकला चलो'चा सूर**

आर्वीचे आ.सुमित वानखेडे हे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निकटवर्ती असल्याचे त्यांच्या



समर्थकांकडून सांगितले जाते.

याच राजकीय जवळीकीचे वजन मतदारसंघात वापरले जात असल्याची चर्चा विरोधकांकडून केली जात आहे. भाजपमधील ज्येष्ठ नेते, माजी आमदार आणि स्थानिक कार्यकर्त्यांना डावलून स्वतःचे नाव पुढे करण्याची भूमिका घेतली जात असल्याची नाराजी काही कार्यकर्त्यांमध्ये असल्याचे बोलले जाते.

सत्तेचा आधार घेऊन पक्षातीलच आवाज दाबला जात असेल तर उद्या मतदारांचा आवाज कोण दाबणार हा प्रश्न आर्वीच्या राजकीय पटलावर चर्चिला जात आहे. नाराजीची ही धग कायम राहिली तर २०२९ च्या निवडणुकीत त्याचे परिणाम भोगावे लागू शकतात, अशी राजकीय गणिते मांडली जात आहेत.

**देवळीत 'तोरा' की जनतेचा संताप**

देवळीचे आ.राजेश बकाने यांच्याबाबतही मतदारसंघात नाराजीच्या चर्चा सुरू आहेत. समस्या घेऊन आमदारांकडे येणाऱ्या नागरिकांना समाधानकारक उत्तर मिळत नसल्याची तक्रार काही नागरिकांकडून होत आहे. लोकांनी प्रश्न घेऊन यायचे आणि निराश होऊन परत जायचे, तर आमदारकीचा उपयोग काय असा प्रश्न उपस्थित होत आहे.

भाजपचे जिल्हाध्यक्ष संजय गाते यांच्यासारख्या संघटनात्मक नेतृत्वालाही मतदारसंघातील राजकारणात योग्य स्थान मिळत नसल्याची भावना काही कार्यकर्त्यांत असल्याचे सांगितले जाते. त्यामुळे भाजपच्या अंतर्गत राजकारणात भविष्यात संघर्षाची ठिणगी पडण्याची शक्यता नाकारता येत नाही.

**वर्ध्यात मंत्रिपदाचे वजन**

वर्धा विधानसभा मतदारसंघाचे आ. पंकज भोयर यांच्याकडे राज्यमंत्रीपद असल्याने त्यांच्याकडून अपेक्षा अधिक आहेत. मंत्रिपदामुळे प्रशासनावर प्रभाव वाढला असला तरी जनतेच्या प्रश्नांचे निराकरण करण्याची जबाबदारीही त्यांच्यावर तितकीच मोठी आहे.त्यामुळे मंत्रिपदाचे वजन मतदारांच्या अपेक्षांपेक्षा मोठे ठरणार की अपेक्षांच्या ओझ्याखाली राजकीय परीक्षा होणार, हे आगामी काळात स्पष्ट होईल.

दुसरीकडे जिल्हाध्यक्ष संजय गाते यांचा मनमिळावू स्वभाव आणि सर्वांना सोबत घेऊन जाण्याची भूमिका भाजपच्या संघटनात्मक राजकारणात चर्चेत आहे. त्यामुळे सत्तेतील आमदार आणि संघटनेतील नेतृत्व यांच्यातील समन्वय हा भाजपसमोरील महत्त्वाचा मुद्दा ठरणार आहे.

**२०२९ चा 'इशारा' आत्ताच**

भाजपकडे चारही आमदार, राज्यात सत्ता आणि केंद्रात सत्ता असताना जनतेच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष झाले तर सत्तेचा माज मतपेटीत फार काळ टिकत नाही, हा राजकारणाचा धडा आहे. सध्या व्यक्त होणारी नाराजी ही केवळ कुजबुज आहे की आगामी राजकीय वादळाची चाहूल, हे सांगणे घाईचे ठरेल.

मात्र कार्यकर्त्यांतील असंतोष, नेत्यांमधील दुरावा आणि नागरिकांच्या प्रश्नांकडे पाहण्याची पद्धत बदलली नाही, तर २०२९ मध्ये भाजपच्या आमदारांसमोर विकासाचा हिशेब देण्याचे मोठे आव्हान उभे राहू शकते.

हिंगणघाटचा विकासाचा वेग इतरांना आरसा दाखवतोय आता त्या आरशात आपला चेहरा पाहायचा की आरसाच फोडायचा, हा निर्णय आमदारांनाच घ्यावा लागणार आहे.

# रस्ता केला, पण वळणच धोकादायक

## ठेकेदाराच्या हलगर्जीपणाचा गावकऱ्यांना फटका



**चाणकी कोपरा/जनमाध्यम**

जुनोना येथे स्टेट हायवेचे काम करताना रस्त्याच्या कडेला आवश्यक असलेले काही काम ठेकेदाराकडून अर्धवट सोडण्यात आल्याने गावकऱ्यांसमोर नवी समस्या उभी ठाकली आहे. रस्त्यालगत तयार झालेल्या कोलवट भागामुळे गावात येणाऱ्या बसला वळण घेताना मोठी अडचण निर्माण होत असून, प्रवाशांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

स्टेट हायवेचे काम पूर्ण झाल्याचा दावा केला जात असला तरी जुनोना येथील रस्त्याच्या बाजूचा भाग मात्र अद्याप व्यवस्थित करण्यात आलेला नाही. त्यामुळे रस्त्याच्या कडेला खोलगट व असमतल भाग तयार झाला आहे. गावात बस दाखल झाल्यानंतर ती वळविताना चालकांना मोठी कसरत करावी लागत आहे. या ठिकाणी बस घसरून अथवा पलटून अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

विशेष म्हणजे,सार्वजनिक वाहतुकीशी संबंधित एवढी गंभीर बाब असूनही संबंधित यंत्रणा आणि ठेकेदाराकडून अद्याप ठोस उपाययोजना करण्यात आलेली नाही. एखादी दुर्घटना घडल्यानंतरच प्रशासनाला जाग येणार का,असा प्रश्न ग्रामस्थांकडून उपस्थित केला जात आहे.

अर्धवट कामामुळे गावकऱ्यांना जीव मुठीत घेऊन प्रवास करावा लागत आहे. संबंधित ठेकेदाराने तातडीने रस्त्याच्या बाजूचा कोलवट भाग भरून समतलीकरण करावे आणि बस वळण्यासाठी सुरक्षित जागा उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

## संक्षिप्त

### दुकानासमोरून दुचाकी लंपास

**वर्धा-** दुकानासमोर उभी केलेली दुचाकी अज्ञात चोरट्याने लंपास केल्याची घटना सावंगी (मेघे) येथे घडली. राजू सातपुते यांनी त्यांची एमएच ३२ एआर ४१९८ क्रमांकाची दुचाकी दुकानासमोर उभी केली होती. दुकान बंद करून बाहेर आल्यानंतर दुचाकी जागेवर नसल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. परिसरात तसेच इतरत्र शोध घेऊनही दुचाकीचा ठावठिकाणा लागला नाही. अखेर अज्ञात चोरट्याने दुचाकी चोरून नेल्याचे स्पष्ट झाले. याप्रकरणी सावंगी (मेघे) पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून, पुढील तपास सुरू आहे.

० ० ० ०

### युवकावर तलवारीने वार

**वर्धा-** मित्रांसोबत सिद्धार्थनगर चौक परिसरात आलेल्या युवकाला अडवून 'मित्रासोबत का आला' या कारणातून तलवारीने वार करून गंभीर जखमी केल्याची घटना घडली. बोरगाव (मेघे) येथील शादाबखाँ उर्फ बेंड मुक्तयारखाँ पठाण हा मित्रांसोबत जात असताना नीरज उर्फ मिनू विक्रमसिंग चौधरी आणि सुरज विक्रमसिंग चौधरी यांनी त्याला आवाज देत थांबविले. किरकोळ कारणातून वाद घालत दोघांनी तलवारीने वार करून मारहाण केली. यात शादाबखाँ जखमी झाला असून त्याला उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले. तक्रारीवरून वर्धा शहर पोलिसांनी दोघांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

० ० ० ०

### घरात घुसून चाकूचा धाक

**वर्धा-** घरात अनधिकृत प्रवेश करून शिवीगाळ व मारहाण करत चाकूचा धाक दाखवून जीवे मारण्याची धमकी दिल्याची घटना सिद्धार्थनगर परिसरात घडली. शादाब पठाण, आयुष नगराळे आणि सोहेल मोंडा यांनी घरात प्रवेश करून 'मुलगा कुठे गेला' अशी विचारणा केली. त्यानंतर शिवीगाळ करत मारहाण केली. वाद सोडविण्यासाठी गेलेल्या फिर्यादीसह आई व भावांनाही चाकूचा धाक दाखवत जीवे मारण्याची धमकी दिल्याचे तक्रारीत नमूद आहे. याप्रकरणी वर्धा शहर पोलिसांनी तिघांविरुद्ध गुन्हा दाखल केला असून तपास सुरू आहे.

० ० ० ०

### ३८ खातेदारांची ३६ लाखांची फसवणूक

**वर्धा-** खातेदारांकडून जमा केलेली रक्कम पतसंस्थेत जमा न करता ३८ खातेदारांची तब्बल ३६ लाख २५ हजार ८५० रुपयांची आर्थिक फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे.श्री नवदुर्गा नागरी सहकारी पतसंस्थेच्या पाच सदस्यीय चौकशी समितीच्या तपासणीत हा प्रकार समोर आला. याप्रकरणी मुख्य कार्यकारी अधिकारी कुलभूषण विठ्ठलराव वसू यांच्या तक्रारीवरून भास्कर चरणदास लढे याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला.चौकशीत १ जानेवारी २०२६ पासून खातेदारांकडून घेतलेली रक्कम संस्थेत नियमित जमा होत नसल्याचे आढळले. पासबुक आणि संस्थेच्या खात्यांची तपासणी केल्यानंतर मोठी तफावत निदर्शनास आली.३८ खातेदारांच्या ५९ खात्यांशी संबंधित व्यवहारात ३६ लाख २५ हजार ८५० रुपयांचा अपहार झाल्याचे चौकशी अहवालातून स्पष्ट झाल्यानंतर पोलिसांत तक्रार करण्यात आली. वर्धा शहर पोलिस पुढील तपास करीत आहेत.

० ० ० ०

### क्षुल्लक कारणातून इसमाला मारला

**पिंपळगाव-** क्षुल्लक कारणातून झालेल्या वादात इसमाला बैलगाडीची शिवळ मारून जखमी केल्याची घटना पिंपळगाव शिवारात घडली. लोखंडी,ता. समुद्रपूर येथील प्रशांत वसंतराव चाफले हे पिंपळगाव शेतशिवारात असताना देवा गजानन कोरेकार याने त्यांना बैलगाडीची शिवळ मारली. यात चाफले यांना दुखापत झाली.याप्रकरणी त्यांनी पोलिसांत तक्रार दाखल केली. तक्रारीवरून गिरड पोलिसांनी देवा कोरेकार याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.

० ० ० ०

### मारहाणप्रकरणी तिघांविरुद्ध गुन्हा

**अल्लीपूर-** मुलासोबत होत असलेली धक्काबुक्की सोडविण्यासाठी गेलेल्या पित्याला मारहाण केल्याप्रकरणी तिघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सुनील दिगंबर मोडक यांचा मुलगा आणि विशाल पाटील यांच्यात धक्काबुक्की सुरू होती. यावेळी मोडक तेथे गेले असता त्यांना जोरदार धक्का देण्यात आला. त्यामुळे ते रस्त्यावर पडून जखमी झाले. उपचारासाठी रुग्णालयात नेण्यात आले. परतताना विशाल पाटील याने पुन्हा त्यांना अडवून मारहाण केल्याचा आरोप आहे. याप्रकरणी विशाल पाटील, योगेश घोडे आणि गणेश वानखेडे यांच्याविरुद्ध अल्लीपूर पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

# देश प्रथम'चा मंत्र देणारी दीपशिखा विझली; शांतिदेवी जाजू यांना अखेरचा निरोप

## १०२ व्या वर्षी निधन; गर्भावस्थेतही भोगला पाच महिन्यांचा कारावास

## तहसीलदारांकडून अभिवादन; मुलांनी दिला मुखाग्नी

**वर्धा/जनमाध्यम**

स्वातंत्र्यसंग्रामातील त्यागाची ज्वलंत गाथा आणि गांधीवादी विचारांची प्रेरणादायी ज्योत असलेल्या ज्येष्ठ स्वातंत्र्यसैनिक श्रीमती शांतिदेवी दामोदरजी जाजू यांचे वयाच्या १०२ व्या वर्षी निधन झाले. त्यांच्या निधनाने वर्ध्याच्या सामाजिक, गांधीवादी आणि माहेश्वरी समाजजीवनात मोठी पोकळी निर्माण झाली असून, एका युगाचा अंत झाल्याची भावना व्यक्त होत आहे.

१९४२ च्या 'भारत छोडो' आंदोलनाच्या काळात देशभर स्वातंत्र्याची लाट उसळली होती. त्याच काळात वर्ध्यातील गर्भवती वधू असलेल्या शांतिदेवींनी स्वातंत्र्यलढ्यात सहभाग घेतला. सासरे श्री.स्व. कृष्णदासजी आणि पती स्व. दामोदरजी यांच्याकडून मिळालेली राष्ट्रसेवेची प्रेरणा त्यांनी कृतीत उतरविली. ब्रिटिश सत्तेविरोधातील आंदोलनात सहभागी झाल्याने त्यांना अटक झाली. गर्भावस्थेतील वेदना आणि कारावासाच्या यातना अशा दुहेरी संकटांना सामोरे जात त्यांनी पाच महिने तुरुंगवास भोगला; मात्र त्यांचा निर्धार कधीही डगमगला नाही.



गांधीवादी विचारांचा आयुष्यभर अंगीकार करत त्यांनी साधेपणा, सेवा आणि संस्कार यांना जीवनमूल्य मानले. घरातूनच राष्ट्रभक्ती आणि सामाजिक बांधिलकीचे संस्कार त्यांनी पुढील पिढीला दिले.

त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. शासनाच्या वतीने तहसीलदारांनी पुष्पचक्र अर्पण करून अभिवादन केले. मुलगा सुनील व राहुल जाजू यांनी मुखाग्नी दिला. परिवारातील महिलांनीही पार्थिवाला खांदा दिला.

अंत्ययात्रेत विदर्भ प्रादेशिक माहेश्वरी संघटनेचे माजी अध्यक्ष दामोदरजी सारडा, विद्यमान अध्यक्ष प्रा. रमन हेडा यांच्यासह समाजबांधव व गांधीवादी कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले. शांतिदेवींचा 'देश प्रथम'चा विचार सदैव प्रेरणादायी राहणार आहे.

# कामगारांच्या हक्कांसाठी संघटित लढा

## नायरा एनर्जी डिपोमध्ये भारतीय जनता कामगार महासंघाच्या शाखेचे उद्घाटन



**देवळी/जनमाध्यम**

नायरा एनर्जी डिपो,निमगाव (सबाने) येथे भारतीय जनता कामगार महासंघ (महाराष्ट्र) अंतर्गत नव्या शाखेचे उत्साहात उद्घाटन करण्यात आले. या कार्यक्रमाला संघटनेचे पदाधिकारी,कार्यकारिणी सदस्य आणि मोठ्या संख्येने कामगार उपस्थित होते.कामगारांच्या विविध समस्या,त्यांच्या हक्कांचे संरक्षण तसेच न्याय मिळवून देण्यासाठी संघटनेच्या माध्यमातून प्रभावीपणे काम करण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला. डिपोतील कामगारांचे प्रश्न संघटित पद्धतीने प्रशासनासमोर मांडून त्यांचे निराकरण करण्यासाठी नव्या शाखेची महत्त्वपूर्ण भूमिका राहणार असल्याचे पदाधिकाऱ्यांनी सांगितले.

यावेळी भारतीय जनता कामगार महासंघाचे प्रदेश महासचिव तथा युनियन अध्यक्ष मिलिंद देशपांडे,भाजपा सेवाग्राम मंडळ अध्यक्ष तथा युनियन कार्याध्यक्ष गौरव गावंडे,सरपंच राजश्री गावंडे यांच्यासह गजानन दुतारे, श्रीकांत मिरापूरकर, दत्ता महाजन,सतीश अड्डे, विनोद गायकवाड,देवेंद्र दुबे,किरण पुनसे, स्वप्नील बैस, दिलीप रेवतकर, रमेश मरगडे,बबलू झाडे, महेश रेवतकर, आकाश कहाते, कुणाल शेंद्रे, सूरज देशमुख, सचिन चौधरी, देवेंद्र लोखंडे, नितीन उईके आदी उपस्थित होते. नव्या शाखेच्या माध्यमातून कामगारांच्या हक्कांसाठी संघटितपणे लढा देत त्यांच्या समस्या सोडविण्यासाठी आगामी काळात अधिक प्रभावीपणे कार्य करण्याचा संकल्प यावेळी करण्यात आला.

# क्रांती दिनानिमित्त विद्यार्थ्यांनी जागवली राष्ट्रप्रेमाची ज्योत

## स्कूल ऑफ स्कॉलर्समध्ये देशभक्तीपर लघुनाटिकेतून कर्तव्यभावनेचा संदेश

**हिंगणघाट/जनमाध्यम**

स्कूल ऑफ स्कॉलर्स, हिंगणघाट येथे क्रांती दिनानिमित्त विशेष शालेय परिपाठाचे आयोजन करण्यात आले. मुख्याध्यापिका शिल्पा चव्हाण, प्रशासकीय अधिकारी प्रदीप जोशी आणि शैक्षणिक समन्वयक ममता दायमा यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर लघुनाटिका सादर करून राष्ट्रप्रेम आणि कर्तव्यभावनेचा प्रभावी संदेश दिला.



एमराल्ड हाऊसच्या वतीने हाऊस इंचार्ज कविता राय आणि विकास वाढई यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी लघुनाटिका सादर केली. इयत्ता आठवीतील नाझिफा शेख आणि हिरण्या निनावे यांनी कार्यक्रमाचे संचालन केले.

इयत्ता चौथीतील ओमांश सारडा, प्रचित गंधारे, प्रत्यंचा कोसरसारे आणि हंसिका कोपरकर यांनी कर्तव्यभावना व खरी देशभक्ती यांचे महत्त्व अधोरेखित केले.

तसेच इयत्ता पाचवीतील तेजस्विनी कोंबे,इच्छा सचान आणि मिहान मोटवानी यांनी दैनंदिन जीवनातून देशप्रेम व्यक्त करण्याचे विविध मार्ग प्रभावीपणे मांडले. मुख्याध्यापिका शिल्पा चव्हाण यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना देशभक्ती ही केवळ घोषणांपुरती मर्यादित नसून प्रामाणिकपणा,शिस्त,जबाबदारी आणि देशाच्या प्रगतीसाठी सकारात्मक योगदान देण्यातच खरी देशसेवा असल्याचे सांगितले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी संगीत विभागातील आकाश जवादे,पूजा शेंडे, कला विभागातील प्रफुल्ल कासर, रूपाली भेदरकर तसेच क्रीडा विभागातील सत्येंद्र झोटिंग आणि दामिनी राऊत यांचे योगदान लाभले. शिक्षक, शिक्षिका व शालेय कर्मचाऱ्यांनी कार्यक्रमासाठी परिश्रम घेतले.

# कानगावात तरुणांची हरित क्रांती; १०० वृक्षांची लागवड



**वर्धा/जनमाध्यम**

ऑगस्ट क्रांती दिन आणि विश्व आदिवासी दिनाचे औचित्य साधून कानगाव येथे तरुणांच्या पुढाकारातून १०० विविध वृक्षांची लागवड करण्यात आली. 'एक पेड खुद्के नाम'चा संदेश देत तरुणांनी पर्यावरण संवर्धनाचा निर्धार केला.गावातील विविध प्रमुख ठिकाणी वड, पिंपळ, चिंच, गुलमोहर, आवळा, कवठ, कडुनिंब, अमेरिकन साग आणि पारिजात आदी वृक्षांची रोपे लावण्यात आली. केवळ वृक्षलागवड न करता त्यांचे संगोपन करण्याची जबाबदारीही तरुणांनी स्वीकारली.या उपक्रमात निखिल कामजवार, वेद कामजवार, आसिफ शेख, सुमित उगेमुगे, निखिल जाधव,मेहर सिडाम यांच्यासह अनेक तरुणांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. ग्रामपंचायत आणि ग्रामस्थांचेही उपक्रमाला सहकार्य लाभले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विचार मंचाच्या वतीने ९ ते १५ ऑगस्टदरम्यान वृक्षसंवर्धन सप्ताह साजरा करण्यात येत आहे. त्याचाच एक भाग म्हणून कानगावात हा वृक्षलागवड उपक्रम राबविण्यात आला. समाजहिताचे विविध उपक्रम तरुणांच्या माध्यमातून सातत्याने राबविण्यासाठी आम्ही वचनबद्ध आहे, असा निर्धार सुमित उगेमुगे यांनी व्यक्त केला.

# उमेदच्या महिलांचे मानधन वाढवावे-यशवंत झाडे

**वर्धा/जनमाध्यम**

महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानांतर्गत 'उमेद'मध्ये ग्रामीण भागात तळागाळात काम करणाऱ्या सीआरपी महिलांच्या मानधनात वाढ करून ते दरमहा १८ हजार रुपये करावे, अशी मागणी सिटूचे राज्य उपाध्यक्ष यशवंत झाडे यांनी केली. केवळ सहा हजार रुपयांच्या तुटपुंज्या मानधनावर महिलांकडून मोठ्या प्रमाणात काम करून घेतले जात असल्याने त्यांच्या श्रमाचे योग्य मूल्य मिळणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.



गाडगे महाराज सभागृह, कृष्णनगर, वर्धा येथे उमेदअंतर्गत सीआरपी महिलांचा विशाल मेळावा झाला. जिल्ह्यातील आठही तालुक्यांतून सातशेहून अधिक महिला सहभागी झाल्या. बचत गटांची स्थापना,मार्गदर्शन, बैठका घेणे,नियंत्रणासह विविध जबाबदाऱ्या सीआरपी महिला पार पाडत आहेत. मात्र त्यांना मिळणारे मानधन ग्रामसंघाच्या खात्यावर जमा करून त्यानंतर देण्यात येते. ही ग्रेडेशन पद्धत बंद करून मानधन थेट महिलांच्या बँक खात्यात जमा करण्याची मागणी करण्यात आली.

मेळाव्यात ओळखपत्र, ड्रेस कोडसह वर्षातून दोन साड्या, ऑनलाइन कामासाठी मोबाईल व सिमकार्ड तसेच दरमहा रिचार्ज, दहा लाख रुपयांचा सामाजिक सुरक्षा विमा आदी मागण्या करण्यात आल्या.

यावेळी यशवंत झाडे,सुनील घिमे,अर्चना घुगरे,संध्या खैरकार, वैशाली आंबाखाये, शकुंतला नगराळे, जयश्री शंखदरबार, सरिता कटरे आदी उपस्थित होते.

वर्धा जिल्हा आयसीआरपी महिला संघटना स्थापन करून ती सीआयटीयूशी संलग्न करण्याचा निर्णय घेण्यात आला. वैशाली आंबाखाये व शकुंतला नगराळे यांची जिल्हा संघटिका म्हणून निवड करण्यात आली. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

जनमाध्यम जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा,वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.

संपादक-प्रदीप देशपांडे
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

वर्धा आवृत्ती वर्ष-१४ अंक २५७
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३

मुख्य कार्यालय– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल-atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

## जाहीर नोटीस

प्रो.नं.९७८/२०२६
दिवाणी न्यायालय व.स्तर, दर्यापूर
दि.१२.०८.२०२६

**वि.दिवाणी न्यायालय (व.स्तर) दर्यापूर, जि.अमरावती येथील यू.एन.पाटील, सह दिवाणी न्यायाधिश (व.स्तर) यांचे न्यायालयात**

**किरकोळ अर्ज क्र.३३१/२०२६** **ने.ता.२१.०९.२०२६**

**अर्जदार -** १. रेखा मनोहर सौदळे, वय ५७ वर्षे, धंदा - घरकाम
रा.इंदिरा नगर, दर्यापूर, ता.दर्यापूर,जि.अमरावती

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार-** **निरंक**

या नोटीसद्वारे सर्वांना कळविण्यात येते की, **पांडुरंग तुकाराम मोरे** हे दिनांक ०२.११.१९६८, रोजी मरण पावले आहेत.

अर्जदार यांनी मृतकाचे वारस असल्याबाबत **कलम २ बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट प्रमाणे** वारस प्रमाणपत्र मिळणेबाबत न्यायालयात अर्ज केला आहे. जर कोणास वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांचे आत आपला आक्षेप सादर करावा. अन्यथा अर्जदारांना मृतकाचे वारस ठरविण्यास येउन त्यांना वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

**मालमत्तेचे वर्णन - मयत पांडुरंग तुकाराम मोरे** यांचे नांवे मौजे कोळंबी, ता.दर्यापूर, जि.अमरावती येथील शेतगट क्र.१३१, क्षेत्र ०.७७ हे आर पो.ख. ०.०६ हे आर यापैकी क्षेत्र ०.१२ हे आर आकार ०.५० ही सामाईक मिळकत आहे. ज्याची अंदाजे किंमत १०,०००/- इतकी आहे.

आज दि.१२.०८.२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

आदेशानुसार,
**सहाय्यक अधीक्षक (प्रशा.)**
दिवाणी न्यायालय, व.स्तर, दर्यापूर

शिक्का

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती**
**वि.श्री.ए.बी.कट्टे ३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती यांचे न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज क्र.१३२७/२०२६**
**शांताबाई व इतर विरुध्द निरंक**
**पुढील ता.१९.०८.२०२६**

**जाहीरनामा/सायटेशन**

अर्जदार ः
1. **Smt. Shantabai Nilkkanthrao Katore**, Age 82 Yrs. Occu.: Household
2. **Vasantrao Nilkkanthrao Katore**, Aged 54 Yrs. Occu.: Agri. Both R/o. Yavalpura Nandgaon Peth, Tq. & Dist. Amravati
3. **Shobha Haridas Raghorte**, Age 60 Yrs. Occu.: Household R/o. Gurudevnagar, Tq. Tiosa, Dist. Amravati
4. **Naliibai Diapak Bhurlekar,** Age 55 Yrs. Occu.: Household R/o. Galli No. 17, Nanda Nagar, Indore, Tq. & Dist. Indore
5. **Savita Sunil Lakade,** age 50 years, Occ :- Household R/o. Samara Nagar, Old Bye Pass, Amravati
6. **Dilip Mahadev Thoukar**, age 64 years, occ :- Retired, R/o. Nanda Nagar, Indore, Tq. & Dist. Indore
7. **Ujjwala Amol Raghorte**, age 36 years, occ :- Household, R/o. Malu Layout, Sai Nagar, Amravati

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार ः- निरंक**

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत निळकंठ रामचंद्र काटोरे** हे दिनांक १९.०८.२०२० रोजी अमरावती,ता.जि.अमरावती येथे मयत झाले. अर्जदार शांताबाई व इतर विरुध्द निरंक यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **अर्जदार शांताबाई व इतर विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **०१.०८.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, अमरावती

---

**विद्यमान दिवाणी न्यायाधिश क.स्तर क्र.२ यांचे न्यायालय, अमरावती**

**कि.दि.अ.क्र.१६०३/२०२६** **ने.ता.१९/०९/२०२६**

**अर्जदार ः-**
१. **श्रीमती तुळसाबाई अजाबराव गायकवाड, (पत्नी)**
वय ७० वर्षे, व्यवसाय-गृहिणी
रा.नवसारी, अमरावती, ता.जि.अमरावती
२. **सौ.सविता प्रकाश वरवट,(मुलगी),** वय ४८ वर्षे, व्यवसाय- गृहिणी
रा.गणेश चाळ जवळ, आकुरली रोड, ४८ क्रांतीनगर, कांदिवली पूर्व मुंबई, ता.जि.मुंबई
३. **सौ.रेखा राजू इंगळे (मुलगी),** वय ४६ वर्षे, व्यवसाय- गृहिणी
रा.क्रांतीनगर,शिवनी, अकोला, ता.जि. अकोला
४. **सौ.वैशाली सुरेश मोंढे (मुलगी),** वय ३६ वर्षे, व्यवसाय- गृहिणी
रा.पिंपळविहार, ता.जि.अमरावती
५. **राजकुमार अजाबराव गायकवाड (मुलगा)**
वय ५१ वर्षे, व्यवसाय-मजुरी
रा.नवसारी, अमरावती, ता.जि.अमरावती

**विरुध्द**

**गैरअर्जदार ः-** **निरंक**

ज्याअर्थी वरील नमूद अर्जदारांनी या न्यायालयात मुंबई अधिनियम (८) १८२७ चे कलम २ अन्वये वारस प्रमाणपत्र मिळण्याकरिता दि.२८.०७.२०२६ रोजी अर्ज सादर केला आहे. अर्जदार क्रमांक १ यांचे पती व अर्जदार क्रमांक २ ते ५ यांचे वडिल अजाबराव व्यंकटराव उर्फ शंकरराव गायकवाड हे दि.२०.०४.२०१६ रोजी अमरावती, ता.जि.अमरावती येथे मरण पावले. तसेच अर्जदारांनी नमुद केल्याप्रमाणे मृतकांच्या पश्चात वरील अर्जदार हेच कायदेशिर वारसदार असून त्यांना वारसप्रमाणपत्र मिळणे आवश्यक आहे. म्हणून, या न्यायालयात जो कोणी व्यक्ती वरील वारस प्रमाणपत्र देण्यास हरकत घेऊ इच्छित असेल, त्याने आपल्या हरकती दिनांक १९/०९/२०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता या न्यायालयात स्वतः हजर राहून किंवा योग्य वकिलामार्फत लेखी स्वरुपात सादर कराव्यात अन्यथा कोणतीही हरकत नसल्याचे समजून पुढील कार्यवाही करण्यात येईल.

सदर जाहीरनामा दिनांक ०७/०८/२०२६ रोजी दिला आहे.

शिक्का

**आदेशानुसार,**
**सहायक अधीक्षक**
**दिवाणी न्यायालय, कनिष्ठ स्तर,अमरावती**

---

**नमुना ९**
**(नियम १४ व २४ पहा)**
**महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ यांच्या कलम १५०(२) अन्वये सुचना**

ज्याअर्थी तालुका -दर्यापूर गांव - गाजीपूर
गावच्या फेरफाराच्या नोंदवहीत खाली विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे जमिनीतील अधिकारांच्या संपादनासंबंधी नोंद करण्यात आली आहे.

| फेरफाराच्या नोंदवहीतील नोंदीचा अनुक्रमांक किंवा तारीख | संपादन केलेल्या अधिकाराचे स्वरुप | ज्यातील अधिकार संपादन करण्यात आले आहे ते भूमापन व **उपविभाग** क्र. |
|---|---|---|
| ४६७ | **नोदीचा प्रकार** - मृत्यूपत्र / व्यवस्थापत्र<br>**माहिती मिळालेचा दिनांक** ०७.०८.२०२६<br>**फेरफाराचा दिनांक** - ०९.०८.२०२६<br>रणजीतसिंह जयपालसिंह खामरे यांनी अर्ज दिला की कै.ईश्वरसिंह मेहताबसिंह खामरे हे २७.०६.२०२५ रोजी मयत झाले असून त्यांनी लिहून ठेवलेले अनोंदणीकृत मृत्यूपत्राचा दि.३१.०१.२०२५ त्यांची आपल्या मालकीच्या मिळकती खालीलप्रमाणे हस्तांतरित केल्या आहेत.<br>गट/सर्व्हे नंबर ५८ - रणजीतसिंह जयपालसिंह खामरे (खाता क.८१) लागवडीयोग्य क्षेत्र ४.४८०० हे.आर चौ.मी. पोटखराब क्षेत्र ०.०००० हे.आर चो.मी.<br>अनोंदणीकृत मृत्यूपत्र/व्यवस्थापत्र मुद्रांक क. ७४०२४५ दिनांक ३१.०१.२०२५ या मृत्यूपत्राप्रमाणे मयत व्यक्तिचे नांव कमी करुन मृत्यूपत्राप्रमाणे नावे दाखल केली. मृत्यूपत्राची प्रत मृत्यू नोंदीचा दाखला इत्यादी कागदपत्रे दप्तरी दाखल असे. | ५८ |

आणि ज्याअर्थी तुमचा उक्त फेरफारात हितसंबंध आहे असे अधिकार अभिलेखावरुन/फेरफाराच्या नोंदवहीवरुन मला वाटते, आणि ज्याअर्थी उक्त फेरफारात तुमचा हितसंबंध आहे असे मानण्यास मला संयुक्तिक कारण आहे. त्याअर्थी आता मी, **अंजली नरहरी वसू** ज्याठिकाणी उपरोक्त जमीन आहे त्या गावाचा ग्राम महसूल अधिकारी याद्वारे उक्त फेरफाराच्या नोंदीसंबंधी तुम्हास सुचना देत आहे व ही सूचना मिळाल्यापासून १५ दिवसांच्या आत, उक्त नोंदीसंबंधी तुमची हरकत कोणतीही असल्यास, ती तोंडी किंवा लेखी पाठविण्यास तुम्हास फर्मावित आहे. ग्राम महसूल अधिकारी गाजीपूर यांच्याकडे उक्त १५ दिवसांच्या मुदतीत कोणतीही हरकत त्यांचेकडे न मिळाल्यास उक्त नोंदीस तुमची संमती आहे असे गृहित धरले जाईल, कृपया याची नोंद घ्यावी.

ठिकाण - गाजीपूर
दि.११.०८.२०२६

शिक्का

**ग्राम महसूल अधिकारी (सही व शिक्का)**
.ग्राम महसूल अधिकारी, नाचोना
साझा क.३२ ता.जि.अमरावती

नांव
चावडीवर नोटीस प्रदर्शित केल्याची तारीख
रणजीतसिंह जयपालसिंह खामरे
विकांत ईश्वरसिंह खामरे

पत्ता
मु.पो.लेहगांव, हल्ली मु.६४ जीन प्लॉट रेल्वे गेटजवळ बनोसा दर्यापूर

---

जनमाध्यम

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**

**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अमरावती आवृत्ती वर्ष - ३७ अंक ३३६**
**आर.एन.आय.रजी.नं.** 49763/89 **पोस्टल लायसन क्र.** ATI/RNP/47/2023-2025

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
**ई-मेल** - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

---

# परतवाडा शहरातील मुख्य बाजारात जड वाहनांना वेळेची मर्यादा आवश्यक

## अपघातापूर्वीच उपाययोजना करा : स्वीकृत नगरसेवक नील माहेश्वरी

**अचलपूर/ प्रतिनिधीः-** अमरावती येथील राजापेठ फ्लाय ओव्हरवर नुकत्याच झालेल्या भीषण अपघातात दोन महिलांचा दुर्दैवी मृत्यू झाला. या घटनेनंतर शहरातील गर्दीच्या बाजारपेठांमधून होणाऱ्या अवजड वाहनांच्या वाहतुकीचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.या पार्श्वभूमीवर अचलपूर नगरपालिकेचे स्वीकृत नगरसेवक नील माहेश्वरी यांनी परतवाडा शहरातील मुख्य बाजारपेठेत जड वाहनांच्या प्रवेशावर वेळेची मर्यादा घालून वाहतूक नियंत्रण करण्याची मागणी परतवाडा पोलीस प्रशासन व संबंधित विभागाकडे केली आहे.

नील माहेश्वरी यांनी सांगितले की,परतवाडा शहरातील जयस्तंभ चौक ते गुजरी बाजारपर्यंतचा परिसर हा परतवाड्याचा प्रमुख आणि अत्यंत वर्दळीचा बाजारपेठेचा भाग आहे. सकाळी ८ वाजल्यापासून रात्री १० वाजेपर्यंत या परिसरात मोठ्या प्रमाणात नागरिक, महिला, मुले, व्यापारी तसेच दुचाकीस्वारांची वर्दळ असते. अशा गर्दीच्या ठिकाणी ट्रक, टिप्पर, कंटेनर यांसारख्या जड वाहनांची सतत होणारी ये-जा ही गंभीर अपघाताला कारणीभूत ठरू शकते. त्यामुळे प्रशासनाने कोणत्याही मोठ्या दुर्घटनेची वाट न पाहता आत्ताच प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे आवश्यक



आहे, असे त्यांनी स्पष्ट केले.सकाळी ८ ते रात्री १० वाजेपर्यंत अवजड वाहनांना बंदीची मागणी त्यांनी केली आहे. मुख्य बाजारपेठेत सकाळी ८ ते रात्री १० या वेळेत जड वाहनांना प्रवेशबंदी करण्यात यावी. व्यापाऱ्यांना मालाची वाहतूक करण्यासाठी गर्दीच्या वेळेपूर्वी किंवा रात्री स्वतंत्र वेळ निश्चित करण्यात यावा, अशी मागणी नील माहेश्वरी यांनी केली आहे.

तसेच बाजारपेठेच्या प्रमुख प्रवेश मार्गांवर ‘अवजड वाहनांना प्रवेश बंद’ असे स्पष्ट फलक लावावेत, आवश्यक ठिकाणी बॅरिकेडिंग करावे, सीसीटीव्ही निगराणी वाढवावी आणि वाहतूक पोलिसांची नियमित गस्त ठेवावी, अशीही मागणी त्यांच्याकडून करण्यात आली आहे.आणि अवजड वाहनांसाठी शहराबाहेरील किंवा बाजारपेठेला पर्यायी वाहतूक मार्ग निश्चित करण्याची आवश्यकता असल्याचेही मत नील माहेश्वरी यांनी व्यक्त केले.

‘राजपेठ येथील दुर्घटना ही प्रशासनासाठी एक गंभीर इशारा आहे. एखाद्या ठिकाणी अपघाताचा धोका दिसत असताना प्रशासनाने अपघात होण्याची वाट पाहणे योग्य नाही. आजच डोळे उघडून आवश्यक निर्णय घेतला, तर उद्या एखाद्या निष्पाप नागरिकाचा जीव वाचू शकतो. ही मागणी कोणत्याही व्यापारी किंवा वाहनचालकाच्या विरोधात नसून परतवाडा-अचलपूरच्या नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी असल्याचे मत स्वीकृत नगरसेवक नील माहेश्वरी यांनी व्यक्त केले.

---

**फ्लॅट विकणे आहे**

शास्त्री नगर , टोपे नगर बोर्ड ऑफिस जवळ असलेला डुप्लेक्स फ्लॅट विकणे आहे . एक बेड रूम , किचन, स्वतंत्र डायनिंग , प्रशस्त हॉल, एक गेस्ट रूम, टेरेस असा फ्लॅट आहे.
**संपर्क : ९४२२८५७१६९ ९४२२१२०४०६**

---

**पवित्र प्रणालीद्वारे शिक्षक भरती जाहीरात**

**शिक्षक अभियोग्यता व बुद्धिमत्ता चाचणी-२०२५** **(मान्य दिनांक २३.०७.२०२६) (प्रसिध्दी दिनांक ०६.०८.२०२६)**

**संस्थेचे नांव-** (270715SC134) SHRI VIDYANIKETAN SHIKSHAN SANSTHA, AMRAVATI TQ.DIST.AMRAVATI (Primary) - With Interview
**शैक्षणिक स्तर -** (Primary)
SHRI VIDYANIKETAN SHIKSHAN SANSTHA, AMRAVATI या व्यवस्थापनाच्या शाळेमध्ये खाली नमुद केलेल्या पदांसाठी आवश्यक शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता धारण करीत असलेल्या व पवित्र प्रणालीमध्ये नोंदणी केलेल्या पात्र उमेदवारांकडून ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहेत.

**आरक्षण निहाय रिक्त पदांचा तपशील**

| अ. क्र. | प्रवर्ग | महिला | माजी सैनिक | अंश-कालीन | प्रकल्प-ग्रस्त | भुकंप-ग्रस्त | खेळाडू | समांतर आरक्षण व्यतिरिक्त (उर्वरित) पदे | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | ई.मा.व. | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| २. | ई.डब्ल्यू.एस | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| | **एकुण** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | **२** | **२** |

**दिव्यांग (४ टक्के)**

| अस्थिव्यंग (१ टक्का) | कर्णबधिर (१ टक्का) | अंध/अल्पदृष्टी (१ टक्का) | Intellectual Disability and Multiple Disability (1%) ID | Intellectual Disability and Multiple Disability (1%) MD | एकुण |
|---|---|---|---|---|---|
| ० | ० | ० | 0 | 0 | ० |

**अनाथ (१ टक्के)**

| | अनाथ संस्थात्मक | अनाथ संस्थाबाह्य | | एकुण |
|---|---|---|---|---|
| | ० | ० | | |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १३. | **एकुण** | ० | ० | ० | ० | ० | ० | २ | २ |

**शैक्षणिक व व्यावसायिक पात्रता, विषय व पदनिहाय रिक्त पदांचा तपशिल** **(मान्य दिनांक २३.०७.२०२६)**

| अ. क्र. | माध्यम | पद | वेतनश्रेणी/ मानधन | अनुदान प्रकार | विषय | शिकविण्याचे माध्यम | आवश्यक शैक्षणिक पात्रता | आवश्यक व्यावसायिक पात्रता | TET/CTET | एकुण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1. | Marathi | Under Graduate Teacher Std.(1-4/5) | Consolidated Pay - UGT (16000) | Aided | All Sub-jects | Marathi | HSC (Std. 12th) | Diploma | TET Paper 1/CTET Paper-1 | 2 |
| | | | | | | | | **Total** | - | **2** |

**सर्वसाधारण सुचना -** १)अभियोग्यता व बुध्दिमत्ता चांचणी २०२५ (TAIT) प्रविष्ट झालेल्या उमेदवारापैकी ज्या उमेदवारांनी पवित्र प्रणाली (https://tait2025mahateacherrecruitment.org.in) या संकेतस्थळावर वैयक्तिक माहिती नोंदवून स्वप्रमाणित केलेली आहे असे उमेदवार जाहिरातीनुसार ऑनलाईन अर्ज करु शकतील. २)ईच्छुक व अर्हता प्राप्त करणारे उमेदवार ऑनलाईन जाहिरातीच्या अनुषंगाने पात्र असलेल्या पदासाठी पसंती क्रमांक नमुद करुन पोर्टलवर ऑनलाईन अर्ज करतील. ३) शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता व अध्यापनाचे विषय, वयोमर्यादा, आरक्षण, अन्य पात्रता व आवश्यक कागदपत्रे इत्यादीसाठी सर्वसाधारण सुचना सविस्तर तपशिलासह https://tait2025.mahateacherrecruitment.org.in या संकेतस्थळावर पवित्र प्रणालीमध्ये **उमेदवारांसाठी सर्वसाधारण सूचना** या शिर्षाखाली उपलब्ध आहेत. सदर सुचना व सुचनामध्ये नमुद आवश्यक शासन आवश्यक शासन निर्णय यांचे अवलोकन करुन स्वतःची खात्री करुनच ऑनलाईन अर्ज करावेत.

**अध्यक्ष / सचिव**
**श्री.विद्यानिकेतन शिक्षण संस्था, अमरावती**

---

## जाहीर नोटीस

**प्रोसेस क्र. ३६४३/२०२६**

**अमरावती येथील विद्यमान प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश यांचे न्यायालय**

**किरकोळ दिवाणी अपिल क्र. ३८/२०२६** **ने.ता.२१/०८/२०२६**

**अर्जदार - ठाकुरदास गेलोमाल हरवाणी**

**--- विरुध्द ---**

**गैरअर्जदार - रमेशकुमार दयालदास घुंडीयाल व इतर**

**बनाम -**
**१. पियुष रमेशपंत कुरळकर**
**२. प्रियंका पियुष कुरळकर**
**दोघे रा. शुभम कृषी सेवा केंद्र अंबाडा, ता.मोर्शी, जि.अमरावती, मो.नं.- ९८६०२३६२७८**

**APPEAL UNDER ORDER 43 RULE 1 (C) OF THE CODE OF CIVIL PROCEDURE.**

ज्याअर्थी वरील अपिलार्थी ठाकुरदास गेलोमल हरवाणी, वय ८२ वर्षे, व्यवसाय-व्यापार,रा. ईश्वरकृपा, बर्फ कारखाना समोर, राजापेठ, अमरावती, ता.जि.अमरावती यांनी वि. प्रमुख जिल्हा न्यायाधिश अमरावती यांचे न्यायालयात अपिल दाखल केले आहे.

त्याअर्थी उत्तरवादी पियुष रमेशपंत कुरळकर व प्रियंका पियुष कुरळकर यांना पेपर प्रसिध्दीव्दारे नोटिस देण्यात येते की, त्यांनी अपिलाचे सुनावणीसाठी दि.२१.०८.२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता वि. प्रमुख जिल्हा न्यायाधिश अमरावती यांचे न्यायालयात स्वतः किंवा रितसर निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर व्हावे. वर नमुद केलेल्या तारखेस जर कोणीही हजर न झाल्यास सदर्हू अर्जाची एकतर्फी सुनावणी होवून निकाल दिला जाईल.

आज दिनांक ०३/०८/२०२६ रोजी माझे सहीनिशी व कोर्टाचे शिक्क्यानिशी प्रसिध्दीसाठी दिला असे.

अमरावती
दिनांक ः ०३/०८/२०२६

शिक्का

**आदेशानुसार,**
**सहायक अधीक्षक (न्यायीक विभाग),**
**जिल्हा व सत्र न्यायालय, अमरावती**

---

## जाहीर नोटीस

**विद्यमान सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) चांदूर बाजार, जि.अमरावती**

आर.एम.जे.सी.क्र.३५४/२०२६ ने.ता.०७.०९.२०२६

**अर्जदार ः**
१. **मेघा मोहनराव देशपांडे,** वय ६२ वर्षे, व्यवसाय - गृहिणी
२. **वेदांग मोहनराव देशपांडे,** वय ३३ वर्षे, व्यवसाय- नोकरी
अर्जदार क्र.१ व २ रा.भक्तीधाम जवळ, गोकुल नगर, प्रल्हादपुर, चांदूर बाजार, जि.अमरावती
३. **कु.मानसी मोहनराव देशपांडे उर्फ श्रीमती मानसी शरदुल मानुरकर,** वय ३५ वर्षे, व्यवसाय- गृहिणी
रा.फ्लॅट नं. सी-८०१, वैदेही रेसीडेंन्सी, एम.आय.टी.कॉलेज रोड, रामबाग कॉलनी, एक्स सर्व्हीस मॅन कॉलनी, कोठरुड, पुणे- ४११ ०३८

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार ः** निरंक

**बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळण्याबाबत**

अर्जदार वरील ठिकाणी राहतात. **मृतक मोहन विनायकराव देशपांडे** यांचा **मृत्यू दि.२९/०५/२०२६** रोजी रा.शिरजगांव बंड, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती येथे झालेला आहे. तसेच मृतक नलिनी विनायकराव देशपांडे हिचा मृत्यू दि.३०/१२/२०१४ रोजी व मृतक विनायक श्रीकृष्ण देशपांडे यांचा मृत्यू दि. ३०/०१/२०१२ रोजी रा.वर्धा येथे झालेला आहे.

त्यांच्या मृत्यूनंतर अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदारा व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत.

अर्जदार मयतांचे कायदेशिर वारस असल्याबाबत वारस प्रमाणपत्राची कार्यालयीन कामाकरिता आवश्यकता आहे. त्याकरीता विद्यमान सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, चांदूर बाजार येथील न्यायालयात **आर.एम.जे.सी.क्र.३५४/२०२६** नुसार अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असल्यास वृत्तपत्रामध्ये जाहीरात प्रसिध्दी दिनांकापासून ३० दिवसांचे आत न्यायालयात आपला आक्षेप स्वतः किंवा वकीलामार्फत हजर राहून नोंदवावा. त्यानंतर सदर कोर्टाकडून कोणत्याही आक्षेपाची अथवा व्यक्तीची दखल घेतल्या जाणार नाही व अर्जदारांना वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.२३.०७.२०२६ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी व फौजदारी न्यायालय ,चांदूर बाजार

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्री.ए.बी.कट्टे, २ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.१६२४/२०२६
**प्रकाश व ईतर -वि- निरंक**
पुढील ता.१५.०९.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार ः**
1. Mr.Prakash Ruprao Jawanjal, Age 73 Yrs. Occu.: Retired R/o Plot No.47, Near Ram Mandir, Behind Saurabh Colony, Vijay Colony, Amravati
2. Mr.Patil Ashok S/o Ruprao Marutirao Jawanjal, Age 68 Yrs. Occu.: Retired R/o 23/5-794-A, Nagulchinta, Near Community Hall, Shah Ali Banda, Charminar Hyderabad

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार ः** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **रुपराव मारोतीराव जवंजाळ आणि सुशिला रुपराव जवंजाळ** हे अनुकमे दिनांक 12.12.2010 व 24.08.2008 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **प्रकाश व ईतर विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **प्रकाश व ईतर विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **०१.०८.२०२६५** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

---

**मा.सह दिवाणी न्यायालय, (कनिष्ठ स्तर) नांदगाव खंडेश्वर,यांचे न्यायालयातील**

किरकोळ (R.M.J.C.)क्र.१७४/२०२६ ने.ता. १६.०९.२०२६

**अर्जदार ः** १. विनोद प्रभाकर बनसोड
रा.वार्ड नं.२, शहापूर, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार ः** निरंक

ज्याअर्थी मयत **सोनाबाई प्रभाकर बनसोड** यांचा मृत्यू दि.**१४.०१.२०२६** रोजी येणस, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती येथे झाला.अर्जदार नं.१ हा मुलगा आहे. मयतांचे अर्जदार हेच कायदेशीर वारस आहेत. करीता कायदेशीर वारसदार म्हणून प्रमाणपत्र मिळण्याकरीता अर्जदाराने विद्यमान न्यायालयात **मुंबई रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ परि.२** अंतर्गत अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदारांविरुध्द काही आक्षेप किंवा हरकती घ्यावयाच्या असेल तर त्यांनी नेमलेल्या तारखेस **सकाळी १०.३०** वाजता दिवाणी न्यायालय, क.स्तर, नांदगाव खंडेश्वर येथील न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर रहावे. तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावणी होवून निकाल दिला जाईल.

आज दिनांक **०८ जुलै २०२६** रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या सही व शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी व फौजदारी न्यायालय
नांदगाव खंडेश्वर

---

## जाहीर नोटीस

प्रो.नं.९५२/२०२६
दिवाणी न्यायालय व.स्तर, दर्यापूर
दि.१०.०८.२०२६

**वि.दिवाणी न्यायालय (व.स्तर) दर्यापूर, जि.अमरावती येथील ए.एम.जोशी, २ रे सह दिवाणी न्यायाधिश (व.स्तर) यांचे न्यायालयात**

**किरकोळ अर्ज क्र.२९९/२०२६** **ने.ता.०३.०९.२०२६**

**अर्जदार -**
१. गोकर्णा हरिचंद्र बोंदरे, वय ८० वर्षे, धंदा - काही नाही
२. अरुणावती शरद खुळे, वय ६० वर्षे, धंदा - घरकाम
रा. गाडगे महाराज संस्थान, गौरक्षण, मुर्तिजापुर, ता.मुर्तिजापुर, जि.अकोला
३. प्रकाश हरिचंद्र बोंदरे, वय ५८ वर्षे, धंदा - शेती
४. प्रमोद हरिचंद्र बोंदरे, वय ६३ वर्षे, धंदा - शेती
५. मिनाक्षी शशीकुमार काळे, वय ५६ वर्षे, धंदा - घरकाम
रा.राठीपुरा, बनोसा, ता.दर्यापूर, जि.अमरावती
६. पुरुषोत्तम हरिचंद्र बोंदरे, वय ५३ वर्षे, धंदा - शेती
अ.क्र. १,३,४ व ६ रा.गायवाडी, ता.दर्यापूर, जि.अमरावती

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार-** निरंक

या नोटीसद्वारे सर्वांना कळविण्यात येते की, **हरीचंद्र उर्फ हरीचंद्र सुखदेवरवा बोंदरे** हे दिनांक ३१.१२.२००८ रोजी मरण पावले आहेत.

अर्जदार यांनी मृतकाचे वारस असल्याबाबत **कलम २ बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट प्रमाणे** वारस प्रमाणपत्र मिळणेबाबत न्यायालयात अर्ज केला आहे. जर कोणास वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांचे आत आपला आक्षेप सादर करावा. अन्यथा अर्जदारांना मृतकाचे वारस ठरविण्यास येउन त्यांना वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

**मालमत्तेचे वर्णन - मयत हरीचंद्र उर्फ हरीचंद्र सुखदेवराव बोंदरे** यांचे नांवे खालील प्रमाणे मिळकत आहे. अ) मौजा गायवाडी, ता.दर्यापूर, जि.अमरावती येथील शेतगट क्र.३४३, क्षेत्र ० हे ७६ आर , आ.रु. ५.०० पैसे, ब) मौजा गायवाडी, ता.दर्यापूर, जि.अमरावती येथील शेतगट क्र.३६३, क्षेत्र ० हे ४७ आर, पो ख ० हे ०४ आर, एकूण क्षेत्र ० हे ५१ आर, आ.रु. २.७० पैसे अशी सामाईकात शेती असून तिची बाजारभाव किंमत रु.५०,०००/- आहे.

आज दि.१०.०८.२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहाय्यक अधीक्षक (प्रशा.)**
दिवाणी न्यायालय, व.स्तर, दर्यापूर

---

प्रो.क्र.७१०/२०२६

**वारसाचे प्रमाणपत्राबद्दल जाहीरनामा/सायटेशन नोटीस**
**विजय जी.परवरे, दिवाणी न्यायाधीश क.स्तर, भातकुली, जि.अमरावती यांच्या न्यायालयात**

आर.एम.जे.सी.क्रमांक २६३/२०२६ ने.ता.१६.०९.२०२६

**अर्जदार ः**१. रावसाहेब निलकंठ गाडे
वय ५७ वर्षे, धंदा - शेती
रा.जळका हिरापूर, ता.भातकुली, जि.अमरावती

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदारः** निरंक

ज्यापेक्षा **रामचंद्र राघोजी गाडे** हे दि.**३१.१०.१९८६४** रोजी मयत झाले. आणि **मनोरमा रामचंद्र गाडे** ही दिनांक **२२.१०.२०२४** रोजी मयत झाली. अर्जदार रावसाहेब निलकंठ गाडे, वय ५७ वर्षे, धंदा - शेती, रा.जळका हिरापूर, ता.भातकुली, जि.अमरावती व इतर यांनी **बॉम्बे रेग्युलेशन कायदा, १८२७ चे कलम २** प्रमाणे कायदेशीर वारस प्रमाणपत्र मिळणेकरीता या न्यायालयामध्ये दि.**२८.०७.२०२६** रोजी अर्ज केला आहे. या अर्जाप्रमाणे वरील अर्जदार हे मयत **रामचंद्र राघोजी गाडे** आणि **मनोरमा रामचंद्र गाडे** यांचे वारस आहेत. ते सदरहू अर्जदार फक्त मयत **रामचंद्र राघोजी गाडे** आणि **मनोरमा रामचंद्र गाडे** यांचे वारस नाहीत असे कोणास सांगावयाचे असेल तर या जाहीरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर होऊन आपली हरकत दाखल करावी.

तसेच या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती दाखल न केल्यास सदरहु न्यायालय अर्जदारांना वारसा प्रमाणपत्र बाबत पुरावा घेऊन त्यांना सदरहू अर्जदारांना मयताचे वारस म्हणून घोषित करण्यात येईल आणि त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दिनांक ०२.०८.२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले असे.

शिक्का

आदेशान्वये,
सहायक अधीक्षक,
दिवाणी न्यायालय, कनिष्ठ स्तर
भातकुली

---

सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अमरावती
२ रा मजला, मालटेकडी समोर, टोपेनगर, गृहनिर्माण भवन अमरावती, अमरावती

**चौकशीची जाहीर नोटीस**

फेरफार अहवाल/अर्ज क्र. 121/19/2026
सार्वजनिक न्यासाचे नांव व नोंदणी क्रमांक **श्री.संत गजानन महाराज सेवा समिती, रेणुका विहार, मंगलधाम परिसर, अमरावती**
बाबत अर्जदार - **श्री.गंगाधर नथ्थुजी तायवाडे**

सर्व संबंधित लोकांस जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सहायक धर्मादाय आयुक्त-०३, अमरावती विभाग, अमरावती हे वर नमुद केलेल्या फेरफार अहवाल/अर्जासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम १९ अन्वये खालील मुद्यांवर चौकशी करणार आहेत--
(१) वर नमुद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय, आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय ?
(२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ?
**(अ) जंगम मिळकत - निरंक**
**(ब) स्थावर मिळकत (वर्णन) - निरंक**

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिध्द झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतचा विचार केला जाणार नाही. तसेच मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहीनिशी व मा.सहायक धर्मादाय आयुक्त-०३, अमरावती यांचे कार्यालयाचे शिक्क्यानिशी आज दिनांक **०३.०८.२०२६** रोजी दिली.

शिक्का

**अधीक्षक,(न्याय शाखा)**
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
अमरावती

---

सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अमरावती
२ रा मजला, मालटेकडी समोर, टोपेनगर, गृहनिर्माण भवन अमरावती, अमरावती

**चौकशीची जाहीर नोटीस**

फेरफार अहवाल/अर्ज क्र. 119/19/2026
सार्वजनिक न्यासाचे नांव व नोंदणी क्रमांक **श्री.दत्त मंदिर उमरी इतबारपूर, ता.दर्यापूर, जि.अमरावती**
बाबत अर्जदार - **श्री.मोहन जगन्नाथ राजुस्कर**

सर्व संबंधित लोकांस जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सहायक धर्मादाय आयुक्त-०३, अमरावती विभाग, अमरावती हे वर नमुद केलेल्या फेरफार अहवाल/अर्जासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम १९ अन्वये खालील मुद्यांवर चौकशी करणार आहेत--
(१) वर नमुद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय, आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय ?
(२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ?
**(अ) जंगम मिळकत - निरंक**
**(ब) स्थावर मिळकत (वर्णन) -** ग्रा.पं.कार्यालय उमरी इतबारपूर येथे स्थित अनु.क.२ मालमत्ता क.२, एकुण क्षेत्रफळ ३४ X १५ = ५१० चौ.फुट पैकी बांधकाम १० X १५ = १५० चौ.फुट व ३६० चौ.फुट खुली जागा (दत्त मंदिर)
२) रामदास गणपत राजुस्कर यांचे मालकीची व दान दिलेली अ.क.६ व मालमत्ता क.४ खुली जागा ३११५ चौ.फुट म्हणजेच ७० X २५ = १७५० चौ.फुट याची चतुःसिमा--
पुर्वेस - रामराव पिंजरकर यांचे घर, पश्चिमेस - शेषराव पिंजरकर व पांडुरंग पानझडे यांचे घर
उत्तरेस - उत्तमराव पिंजरकर यांचे घर, दक्षिणेस - रोड

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिध्द झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतचा विचार केला जाणार नाही. तसेच मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहीनिशी व मा.सहायक धर्मादाय आयुक्त-०३, अमरावती यांचे कार्यालयाचे शिक्क्यानिशी आज दिनांक **०४.०८.२०२६** रोजी दिली.

शिक्का

**अधीक्षक,(न्याय शाखा)**
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अमरावती

---

**जाहीर नोटीस**

**अमरावती येथील विद्यमान जिल्हा व सत्र न्यायाधीश-०१, यांचे न्यायालय**

एम.ए.सी.पी. क्रमांक २४०/२०२५ ने.ता.०९.०९.२०२६

**अर्जदार - रेखा आोक नेताम**

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार - शेख जुनेद शेख हुसामुद्दीन व ईतर**

**गैरअर्जदार -**
१. मुमताज खान अहेमद खान, रा.हबीबपुरा, चांदणी चौक, अमरावती
२ मोहम्मद असरार शेख कलीम, रा.हैदरपुरा. बाबा चौक, अमरावती
३. अस्मिता अशोक नेताम, रा.पुष्पराज कॉलनी, सातुर्णा साईनगर, अमरावती

**Application U/Sec.166 of Motor Vehicle Act 1988 for Grant of Compensation**

ज्याअर्थी वरील पिटीशनर **रेखा अशोक नेताम** यांनी जिल्हा व सत्र न्यायालय-०१, अमरावती यांचे न्यायालयात नुकसान भरपाई मिळण्याकरीता दावा दाखल केला आहे.

त्याअर्थी वरील गैरअर्जदार नं.१ **मुमताज खान अहेमद खान, २. मोहम्मद असरार शेख कलीम, ३. अस्मिता अशोक नेताम** यांना पेपर प्रसिध्दीद्वारे नोटीस देण्यात येते की, त्यांनी दाव्याचे सुनावणीसाठी दिनांक **०९.०९.२०२६** रोजी सकाळी ११.०० वाजता वि.जिल्हा व सत्र न्यायाधीश-०१, अमरावती यांचे न्यायालयात स्वतः किंवा रितसर निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर व्हावे. वर नमुद केलेल तारखेस जर कोणीही हजर न झाल्यास सदरहू दाव्याची एकतर्फी सुनावणी होवून निकाल दिला जाईल.

आज दिनांक ०३.०८२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले असे.

अमरावती
दिनांक ०३.०८.२०२६

शिक्का

आदेशान्वये,
प्र.सहायक अधीक्षक, (न्यायीक विभाग)
जिल्हा व सत्र न्यायालय,
अमरावती

---

सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अमरावती
२ रा मजला, मालटेकडी समोर, टोपेनगर, गृहनिर्माण भवन अमरावती, अमरावती

**चौकशीची जाहीर नोटीस**

फेरफार अहवाल/अर्ज क्र. 120/19/2026
सार्वजनिक न्यासाचे नांव व नोंदणी क्रमांक **चंद्रकला चॅरिटेबल ट्रस्ट अमरावती, ता.जि.अमरावती**
बाबत अर्जदार - **सौ.स्वाती महेश देशमुख**

सर्व संबंधित लोकांस जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सहायक धर्मादाय आयुक्त-०३, अमरावती विभाग, अमरावती हे वर नमुद केलेल्या फेरफार अहवाल/अर्जासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम १९ अन्वये खालील मुद्यांवर चौकशी करणार आहेत--
(१) वर नमुद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय, आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय ?
(२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ?
**(अ) जंगम मिळकत - निरंक**
**(ब) स्थावर मिळकत (वर्णन) - निरंक**

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिध्द झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतचा विचार केला जाणार नाही. तसेच मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहीनिशी व मा.सहायक धर्मादाय आयुक्त-०३, अमरावती यांचे कार्यालयाचे शिक्क्यानिशी आज दिनांक **०४.०८.२०२६** रोजी दिली.

शिक्का


**डी.बी.गायकवाड**
**अधीक्षक,(न्याय शाखा)**
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
अमरावती

# संत गाडगेबाबा समाधी स्थळाकरीता २५ कोटींचा विकास आराखडा मंजूर

## शिखर समितीच्या बैठकीतील निर्णय समाधी स्थळांचा चेहरामोहरा बदलणार - आ. सुलभा खोडके

**अमरावती/का.प्र.**
विदर्भातील प्रमुख धार्मिक व सामाजिक तीर्थक्षेत्र म्हणून प्रचलित असलेल्या अमरावती येथील संत गाडगेबाबा समाधी स्थळ परिसराच्या सुशोभीकरणासाठी एकूण २५ कोटी रुपयांच्या विकास आराखड्यास मंजुरी देण्यात आली आहे. या संदर्भात मागील २० जुलै रोजी मुख्यमंत्री फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली मुंबई स्थित सह्याद्री अतिथीगृह येथे आ.सुलभा खोडके यांच्या उपस्थितीत झालेल्या शिखर समितीच्या बैठकीत निर्णय घेण्यात आला आहे.

अमरावती येथील गाडगे नगर स्थित संत गाडगेबाबा समाधी स्थळ हे बाबांच्या क्रांतिदर्शी विचार व समाज प्रबोधनाची साक्ष देत असून हजारो अनुयायांचे ते प्रेरणास्थान बनले आहे. त्यामुळे संत गाडगेबाबा यांचे साहित्य व स्मृतीचे जतन करून समाधी स्थळाचा तीर्थक्षेत्र व पर्यटन स्थळाच्या धर्तीवर विकास व्हावा, यासाठी अमरावतीच्या आ. सुलभा खोडके यांनी शासनाकडे सातत्याने पाठपुरावा करून विकास आराखडा मंजूर करून निधी देण्याची मागणी केली. याची फलश्रुती म्हणून गेल्या सन २०२३-२०२४ च्या अर्थसंकल्पात संत गाडगेबाबा यांचे गाडगे नगर येथील समाधी स्थळ असलेले तीर्थक्षेत्रासाठी



रुपये २५ कोटींच्या निधीबाबत घोषणा करण्यात आली होती.

दरम्यान गेल्या २० जुलै २०२६ रोजी मुख्यमंत्री फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली मुंबई स्थित सह्याद्री अतिथीगृह येथे आ. सुलभा खोडके यांच्या उपस्थितीत झालेल्या शिखर समितीच्या बैठकीमध्ये अमरावती येथील संत गाडगेबाबा तीर्थस्थळाच्या विकास आराखडा बाबत आढावा घेण्यात आला. या बैठकीत आ. सुलभा खोडके यांनी सद्यस्थितीतील समाधीस्थळ येथील पूर्ण कामे, अर्धवट कामे यासह प्रस्तावित समाविष्ट कामासंदर्भात बैठकीमध्ये चर्चा केली. यावर मुख्यमंत्री यांनी श्री संत गाडगेबाबा समाधीस्थळाच्या विकासासाठी २५ कोटी रुपयांच्या विकास आराखड्यास मंजुरी देऊन या निधी अंतर्गत सर्व उर्वरित व प्रस्तावित कामे गतीने पूर्ण करण्यासंदर्भात जिल्हा प्रशासनासोबत दृकश्राव्य माध्यमातून संवाद साधून निर्देशित केले होते. या अंतर्गत आता संत गाडगे बाबा समाधी स्थळ येथे जागतिक दर्जाच्या पायाभूत



सुविधा निर्माण केल्या जातील. ज्यामध्ये श्री संत गाडगे महाराज स्मृती केंद्रचे उर्वरित बांधकाम पूर्ण केले जाणार आहे तसेच स्मृती भवन परिसरात 'शेतकरी ग्राम सफाई मिशन सेंटर'च्या तळमजल्याचे नवे बांधकाम. भाविकांच्या सोयीसाठी यात्री निवासाच्या दुसऱ्या व तिसऱ्या मजल्याचे बांधकाम. प्रबोधनासाठी अद्ययावत कीर्तन सभागृह व ध्यान केंद्र इमारत., अंतर्गत रस्ते, वाहनतळ आणि आकर्षक उद्यान उभारण्यात येतील. या निधीमुळे हजारो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या समाधी स्थळांचा धार्मिक चेहरामोहरा बदलणार असून पर्यटनाला मोठी चालना मिळणार आहे.

संत गाडगेबाबा समाधी स्थळाच्या विकासा आराखडा करिता शासनाने २५ कोटींचा निधी मंजूर केल्याबद्दल आ.सुलभा खोडके यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेन्द्रजी फडणवीस, उपमुख्यमंत्री ना. एकनाथजी शिंदे, उपमुख्यमंत्री ना. सुनेत्रावाहिनी अजितदादा पवार यांचे आभार मानीत अभिनंदन केले आहे.

## रक्तदान व आरोग्य तपासणी शिबिराचा लाभ घ्यावा-महापौर

**अमरावती/का.प्र.**
१५ ऑगस्ट स्वातंत्र्य दिन तसेच अमरावती महानगरपालिकेच्या ४३ व्या वर्धापन दिनानिमित्त महानगरपालिकेच्या वतीने दि. १४ ऑगस्ट रोजी संत ज्ञानेश्वर सांस्कृतिक भवन येथे रक्तदान व आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

या सामाजिक उपक्रमात नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन रक्तदान करावे. रक्तदान हे श्रेष्ठ सामाजिक कार्य असून, आपल्या एका रक्तदानामुळे गरजू रुग्णाचे प्राण वाचू शकतात. त्यामुळे अमरावतीकरांनी या रक्तदान शिबिरात उत्स्फूर्तपणे सहभागी व्हावे, असे आवाहन अमरावती महानगरपालिकेचे महापौर श्रीचंद तेजवानी यांनी केले आहे.

तसेच महानगरपालिकेतील अधिकारी, कर्मचारी व पदाधिकारी यांच्यासाठी डॉ. पंजाबराव देशमुख स्मृती वैद्यकीय महाविद्यालय आणि डॉ.राजेंद्र गोडे वैद्यकीय महाविद्यालय, अमरावती यांच्या संयुक्त विद्यमाने आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.स्वातंत्र्य दिन आणि महानगरपालिकेच्या वर्धापन दिनाचे औचित्य साधून आयोजित या उपक्रमाला अमरावतीकरांनी भरभरून प्रतिसाद देऊन सामाजिक बांधिलकी जपावी, असे आवाहन महापौर श्रीचंद तेजवानी यांनी केले.

# 'त्या' नवजात अर्भकाच्या मृत्यूचे गूढ उकलले

## घातपात नसल्याचे पोलीस तपासात स्पष्ट, श्वानांनी खड्डा उकरून मृतदेह काढला होता बाहेर

**अचलपूर/वार्ताहर**
स्मशानभूमीकडे जाणाऱ्या रस्त्यालगत झुडपांमध्ये श्वानांनी लचके तोडलेल्या अवस्थेत आढळलेल्या नवजात अर्भकाच्या मृत्यूचे गूढ अखेर उकलले आहे. पोलिस तपासात अर्भकाच्या मातेचा शोध लागला असून, नवजात मुलीचा मृत्यू घातपातामुळे झालेला नसल्याचेही स्पष्ट झाले आहे. त्यामुळे या घटनेबाबत जुळ्या शहरांमध्ये सुरू असलेल्या विविध तर्क-वितर्कांना पूर्णविराम मिळाला आहे.

सोमवार, १० ऑगस्ट रोजी दुपारच्या सुमारास स्मशानभूमीकडे



जाणाऱ्या रस्त्यालगतच्या झुडपांमध्ये नवजात अर्भकाचा मृतदेह आढळून आला होता. या घटनेची माहिती मिळताच परतवाडा पोलिसांनी घटनास्थळी धाव तपासाला सुरुवात केली. तपासादरम्यान अर्भकाच्या हाताला एक टॅग आढळून आला. त्यावर उपजिल्हा रुग्णालय, अचलपूर असा उल्लेख होता. पोलिसांनी तातडीने रुग्णालयातील वैद्यकीय अधिकाऱ्यांशी संपर्क साधून या टॅगच्या आधारे माहिती मिळवली. त्यातून हे नवजात अर्भक एका २१ वर्षीय विवाहितेचे असल्याचे समोर आले. पोलिसांनी संबंधित महिलेची चौकशी केली असता तिचे सासर अकोला जिल्ह्यातील कान्हेरी सरप येथे, तर माहेर अंजनगाव सुर्जी तालुक्यातील चिंचोली रहिमापूर येथे असल्याचे समोर आले. पोलिसांनी घटनास्थळी दोन पंचांच्या उपस्थितीत पंचनामा केला. त्यानंतर ११ ऑगस्ट रोजी दोन पंच तसेच अर्भकाच्या आई-वडिलांच्या उपस्थितीत परतवाडा येथील शासकीय स्मशानभूमीत नवजात मुलीचा अंत्यविधी करण्यात आला. सदर घटना घातपाताची नसून नवजात अर्भकाच्या मृत्यूबाबत कोणताही संशयास्पद प्रकार आढळून आलेला नाही, असे पोलिसांनी स्पष्ट केले आहे.

# पी.आर.पोटे पाटील इंटरनॅशनल स्कूलच्या विद्यार्थ्यांची श्रीधर टेक्सटाईल पार्कला शैक्षणिक भेट

**अमरावती/का.प्र.**
पी. आर. पोटे पाटील इंटरनॅशनल स्कूलच्या इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी नांदगाव पेठ एमआयडीसी येथील श्रीधर टेक्सटाईल पार्क येथे शैक्षणिक भेटीचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तकातील ज्ञानासोबतच प्रत्यक्ष औद्योगिक क्षेत्राची माहिती मिळावी, हा या भेटीमागील प्रमुख उद्देश होता.

या शैक्षणिक भेटीदरम्यान विद्यार्थ्यांनी वस्त्रोद्योगातील विविध प्रक्रिया,कापड निर्मितीचे टप्पे, आधुनिक यंत्रसामग्री तसेच उद्योगाच्या कार्यपद्धतीची प्रत्यक्ष माहिती घेतली. संबंधित अधिकाऱ्यांनी विद्यार्थ्यांना टेक्सटाईल उद्योगातील तंत्रज्ञान, उत्पादन प्रक्रिया आणि गुणवत्तेचे महत्त्व याबाबत मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी विविध प्रक्रिया बारकाईने समजून घेत उत्स्फूर्तपणे प्रश्न विचारले. विद्यार्थ्यांना 'शिकणे म्हणजे केवळ पुस्तकांपुरते मर्यादित नसून प्रत्यक्ष अनुभवातूनही ज्ञान संपादन करता



येते' याचा अनुभव आला. विद्यार्थ्यांनी या भेटीचा मनमुराद आनंद घेतला. शाळेचे प्राचार्य सचिन दुर्गे, उपप्राचार्या सोनल निस्ताने तसेच सर्व शिक्षकवृंद यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा

# आंतरशालेय एकल गीतगायन स्पर्धेचा पारितोषिक वितरण सोहळा

**नागपूर-** विश्वकेसरी फाऊंडेशनतर्फे आयोजित आंतरशालेय एकल गीतगायन स्पर्धेतील विजेत्या विद्यार्थ्यांचे मंचावरील सादरीकरण आणि पारितोषिक वितरण सोहळा काल साई सभागृह, शंकर नगर, नागपूर येथे मोठ्या उत्साहात आणि सुरेल वातावरणात पार पडला.



कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून नागपूरचे सुप्रसिद्ध गुरुतुल्य गायक, तबलावादक, लेखक,कवी स्वरचैतन्य डॉ. मिलिंद इंदूरकर हे उपस्थित होते. तसेच आशिया बुक ऑफ रेकॉर्डमध्ये नाव नोंदविलेल्या नागपूरच्या सुप्रसिद्ध स्वरसाधिका प्रा.दीपश्री पाटील उपस्थित होत्या. प्रमुख अतिथींच्या हस्ते दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात झाली. कार्यक्रमाला प्रमुख अतिथी डॉ. मिलिंद इंदूरकर व स्वरसाधिका प्रा. दिपश्री पाटील यांचा त्यांच्या सांगितिक कार्याबद्दल सविस्तर परिचय देऊन विश्वकेसरी फाउंडेशन तर्फे शाल, श्रीफळ, व विश्वकेसरी फाउंडेशन चिन्हांकित मोमेंटो देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला.

स्पर्धेतील उत्तेजनार्थ पारितोषिक विजेते अवधूत मुठाळ, सौख्या पहुरकर, पद्मजा नाझर, स्वानंदी राऊत, यशिता भेरे, ओम जवादे, सान्वी घरलुटे, मुग्धा सपाटे आणि कृणाली चव्हाण या बालकलाकारांनी सुरेल गायनाने कार्यक्रमाची मंत्रमुग्ध करणारी सुरुवात करून दिली.

सत्कार सोहळ्यानंतर मुकुल पांडे, श्रुती चौधरी, नेहा इंदूरकर आणि मुकुंद कुथे या दिग्गज गायकांनी आपल्या मधुर स्वरांनी रसिकांची मने जिंकली. त्यानंतर स्पर्धेतील विजेत्या विद्यार्थ्यांचे सूर रंगले - गट अ मधून प्रथम क्रमांक विजेती स्वरदा जावळे, द्वितीय क्रमांक विजेती इतीशा पाठे आणि तृतीय क्रमांक विजेती अन्वी गिजरे,तर गट ब मधून प्रथम क्रमांक विजेता भरत मानेगावकर, द्वितीय क्रमांक विजेता अजिंक्य देशमुख आणि तृतीय क्रमांक विभागून विजेते सई पायघन व माधव मुळे यांनी आपल्या सुरेल गायनाने उपस्थितांची दाद मिळवली.

कार्यक्रमाच्या समारोपात प्रमुख अतिथींसह विश्वकेसरी फाऊंडेशनचे अध्यक्ष भूषण पांढरे, सचिव CA श्रेयस इंदूरकर आणि कोशाध्यक्ष अभिमन्यू जोग यांच्या हस्ते विजेत्या विद्यार्थ्यांना व त्यांच्या शाळांना पारितोषिके प्रदान करण्यात आली, आणि प्रथम विजेत्या स्पर्धकांच्या शाळेला संपूर्ण विश्व केसरी फाऊंडेशन टीम कडून सुंदर असे फिरते चषक प्रदान करण्यात आले. उदयोन्मुख गायन प्रतिभांना हक्काचे व्यासपीठ उपलब्ध करून देण्याच्या आणि सांस्कृतिक मूल्यांचे जतन करण्याच्या या उपक्रमाचे नागपूरकरांकडून भरभरून कौतुक होत असून, कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी विश्वकेसरी फाऊंडेशन परिवाराने विशेष परिश्रम घेतले.

## स्वातंत्र्य दिनानिमित्त सामान्य ज्ञान स्पर्धेचे आयोजन

**आसेगाव पूर्णा-** भारतीय स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून फ्रीडम कोचिंग क्लासेस,आसेगाव पूर्णा यांच्या वतीने विद्यार्थ्यांसाठी सामान्य ज्ञान स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेत इयत्ता पाचवी ते दहावीपर्यंतच्या विद्यार्थ्यांना सहभागी होता येणार आहे.भारतीय स्वातंत्र्याचा गौरवशाली इतिहास विद्यार्थ्यांना समजावा,स्वातंत्र्यलढ्याची माहिती व्हावी तसेच विद्यार्थ्यांमध्ये सामान्य ज्ञानाची आवड निर्माण व्हावी, या उद्देशाने या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

स्पर्धेचा विषय 'भारतीय स्वातंत्र्याचा इतिहास (१८५८ ते १९४७)' असा आहे. स्पर्धेची परीक्षा १५ ऑगस्ट रोजी दुपारी १२ वाजता आठवडा बाजार येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृह, आसेगाव पूर्णा येथे होणार आहे. स्पर्धेतील प्रथम क्रमांकाच्या विजेत्यास ३ हजार रुपये,द्वितीय क्रमांकास २ हजार रुपये, तर तृतीय क्रमांकाच्या विजेत्यास १ हजार रुपये रोख पारितोषिक देण्यात येणार आहे.स्पर्धेत सहभागी होण्यासाठी १४ ऑगस्टपर्यंत नोंदणी करणे आवश्यक आहे.

स्पर्धेचे आयोजन सामाजिक कार्यकर्ते अभिषेक वाटाणे, विश्वरत्न युवा बहुउद्देशीय मंडळाचे सचिव भोजराज चक्रे आणि फ्रीडम कोचिंग क्लासेसचे संचालक प्रफुल्ल वानखेडे यांच्या पुढाकारातून करण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी प्रफुल्ल वानखेडे-८८३०७२३९४१ आणि अंकुश रोडगे-९३५९६३६७९१ यांच्याशी संपर्क साधावा असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# एम्प्लाईज बँक असोशिएशनच्या सभेत शिक्षक बँक अमरावतीचा डंका

**अमरावती/वार्ताहर**
दि महाराष्ट्र एम्प्लाईज बँक को. ऑप. असोसिएशन लि. मुंबई बँकींग समुहाचे वार्षिक अधिवेशन व आमसभा दि म्युनिसिपल को-ऑप. बँकेच्या सभागृहात मुंबई येथे विजय आगटे यांचे अध्यक्षतेखाली नुकतीच पार पडली. यावेळी महाराष्ट्रातील अग्रगण्य पगारदार नोकरदारांच्या बँकांचे अध्यक्ष, संचालक, सिइओ, सरव्यवस्थापक यांनी बँकांच्या कार्याचा अहवाल सादर केला. दि अमरावती जि.प.शिक्षक सहकारी बँक अमरावतीच्या वतीने बँकेचे अध्यक्ष गोकुलदास राउत व संचालक संभाजी रेवाळे यांनी प्रतिनिधीत्व केले.

पगारदार नोकर सभासदांना मिळणारे सुलभ कर्ज, सोई सुविधा, बँक विकास मार्गदर्शन, विविध योजना, आरबीआय, केंद्रसरकार, महाराष्ट्र शासन यांचे बँक धोरणाबाबत नियम,कायदे राबविण्याबाबत मार्गदर्शन, बँकांच्या समस्या व कारभार यावर अत्यंत बारकाइने लक्ष ठेवण्याचे व मार्गदर्शन करण्याचे कार्य ही असोसिएशन करते.

वर्तमान पत्रामधून शिक्षक बँकेच्या विरोधात अपप्रचाराच्या बातम्यांची दखल सुद्धा यावेळी अनेक बँकांच्या अध्यक्ष व संचालकांनी घेतली.अमरावती बँकेचा शिक्षकांची बँक म्हणून महाराष्ट्रात नव्हे तर भारतात लौकीक व सन्मान आहे. हजारो



शिक्षक व कर्मचारी मतदान करून लुटारू, दरोडेखोर,बेलगाम, कमिशनखोर, व्याभिचारी, भष्ट्राचारी संचालक निवडून देतात का? हा शिक्षक व सभासदांचा अपमान नाही का?असा संतप्त सवाल करून उपाध्यक्ष पुढे म्हणाले की,कोणतीही बँक आरबीआयचे कठोर कायदयाचे चौकटीत चालवावी लागते. बँकेच्या सतत तक्रारी व केसेस मुळे बँकेची विश्वासार्हता कमी होउन बँकेला कोट्यावधी रुपयांचा आर्थिक तोटा सहन करावा लागतो.

असोशिएशन मधील अनेक बँका शिक्षक बँक अमरावतीने सभासद हिताच्या राबविलेल्या योजना व बँक विस्ताराचा अभ्यास करण्यासाठी अमरावती येथे अभ्यास दौरा करणारअसून असोशिएशनचे पुढीलअधिवेशन व आमसभा अमरावती येथे घेणार असल्याचे ठरविण्यात आले. दि महाराष्ट्र एम्प्लाइज बँक को-आपरेटीव असोशिएशन मुंबईच्याअधिवेशन व आमसभेत दि अमरावती जि.प. शिक्षक सहकारी बँकेच्या उत्कृष्ट कार्याचा डंका वाजला.पुरस्कार मिळाल्या बद्दल शिक्षक सहकारी बँकेचे अध्यक्ष गोकुलदास राऊत, उपाध्यक्ष सुरेन्द्र मेटे, संचालक तुळशिदास धांडे, प्रफुल्ल शेंडे, मो,नाजीम अ.गप्फार,कैलास कडू, उमेश चुनकीकर, अजयानंद पवार, रामदास कडू, राजेन्द्र गावंडे, मनिष काळे, विजय कोठाळे, संभाजी रेवाळे, राजेश गाडे, सरीता काठोळे, संगिता तडस, तंज्ञ संचालक ॲड.राजपाल वानखडे, ॲड.मो.शकील अहमद मो.गयास, सरव्यवस्थापक संजय साळवे यांनी अभिनंदन केले आहे.

## संक्षिप्त



### हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयात वृक्षरोपण कार्यक्रम

**कुऱ्हा-** स्थानिक अशोक शिक्षण संस्था अशोकनगर द्वारा संचालित कुऱ्हा हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय येथे राष्ट्रीय हरीत सेना विभागामार्फत वृक्षलागवड कार्यक्रम झाला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापिका,आर.जी.कुमरे होत्या तर प्रमुख अतिथी संचालक, प्रा.एच.एन. बोके तसेच पर्यावरण समितीचे प्रमुख,प्रा.एस.आर.जीरापुरे,प्रा.एम.एच.वाळके, एस.आर.इसळ,एच.बी.जाधव,के.एन.ढगे उपस्थित होते.सर्वप्रथम मुख्याध्यापिका,आर.जी.कुमरे यांच्या हस्ते शालेय परिसरामध्ये वृक्षारोपण करण्यात आले. त्यानंतर पर्यावरण समिती प्रमुख, प्रा.एस.आर. जीरापुरे यांनी वृक्षारोपणा संबंधित व 'एक पेड मा के नाम' या उपक्रमाबद्दल विद्यार्थ्यांना जागृत केले. यामध्ये चिंच,कडू बदाम, निंब,पिंपळ, शंकरशेर, सिसम, इत्यादी वृक्षांचे वृक्षारोपण करण्यात आले. या कार्यक्रमाचे संचालन प्रा.एम.एच. वाळके यांनी केले तर आभार एस. एस. चव्हाण यांनी मानले. या कार्यक्रमला व्ही.आर. इंगोले, ए.बी.चांबटकर, प्रा.एस. पी ढोले, प्रा.एम. एच. शिरभाते, एस.व्ही.चौधरी, जे. पी. निमकर,एस.ए.पारवे, व्ही जी बैठकर,एस. एस. चव्हाण,एस. एस. इरपाते, एन. डी. राठोड, प्रा.एन.एस. घुणारे, प्रा.एस.पी.रवाळे, पी.एम.राऊत, युनिस खान पठाण व वर्ग पाचवी ते बारावीचे सर्वविद्यार्थी, प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.



### उर्दू शाळेत वृक्षारोपणासह चित्रकला स्पर्धेचे आयोजन

**अमरावती-** अमरावती महानगरपालिकेच्या वर्धापन दिनानिमित्त चपरासीपुरा कॅम्प येथील महानगरपालिका उर्दू माध्यमिक शाळा क्रमांक ६ मध्ये वृक्षारोपण व चित्रकला स्पर्धेचे आयोजन उत्साहात करण्यात आले. महानगरपालिकेच्या शिक्षण सभापती प्रीती रेवणे यांच्या अध्यक्षतेखाली जयश्री वानखडे नगरसेवक यांच्या उपस्थितीत झालेल्या या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेतला.कार्यक्रमास महानगरपालिकेचे शिक्षणाधिकारी डॉ. प्रकाश मेश्राम,वहिद खान,जकीयोद्दीन काझी, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष हाफीज सना उल्लाह,मुक्ती शाकीर तसेच महानगरपालिका शिक्षण विभागाचे सहायक कार्यक्रम अधिकारी सपकाळ यांची प्रमुख उपस्थिती होती.कार्यक्रमाचे संचालन शाळेचे सहायक शिक्षक अजहर खान यांनी केले. शाळेच्या मुख्याध्यापिका नाहीद तबस्सुम यांनी कार्यक्रमाची रूपरेषा उपस्थितांसमोर मांडली.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी बदीउद्दीन, रफीक अहमद, नाजेमा बी, फौजिया, दुरदाना, दरकश यांच्यासह शाळेतील सर्व शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले. सर्वांच्या सहकार्याने कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात यशस्वीरीत्या पार पडला.



### राष्ट्रसंत तुकडोजी महाराज स्पोर्ट अकॅडमीच्या खेळाडूंनी पटकाविले सात सुवर्णपदक

**अमरावती-** येथे १४व्या अमरावती जिल्हास्तरीय सब-ज्युनियर, ज्युनियर व सीनियर वूशू अजिंक्यपद स्पर्धा २०२६-२७ मध्ये श्री. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज स्पोर्ट अकॅडमी, देवरा देवरी शहीद च्या खेळाडूंनी उल्लेखनीय कामगिरी करत एकूण १२ पदके पटकावली आहेत.अकॅडमीच्या खेळाडूंनी ७ सुवर्ण, ३ रौप्य आणि २ कांस्य पदकांसह आपल्या अकॅडमीचे नाव उज्ज्वल केले.सुवर्णपदक विजेते आराध्या तीहीले,देवेश डायलकर,आर्यन खराते,लक्ष वाडेकर,ईश्वरी तायडे,अनन्या काळकर आणि सोहम वानखडे यांनी सुवर्णपदकावर नाव कोरले. रौप्यपदक विजेते हेमा लायबर, रुद्र वाडेकर आणि नमन खंडारे, आरुषी थोटांडे यांनी रौप्यपदक मिळवले.कांस्यपदक विजेत स्वरा ज्योतीराम पीसाळ यांनी कांस्यपदक पटकावले.विद्यार्थ्यांच्या या अनमोल श्रेया मागिल अनिल कुंबरे, नागपूर मुख्य मार्गदर्शक अकॅडमीचे प्रशिक्षक सचिन बरामकुळे,योगेश पालीवाल आणि पदाधिकारी यांनी सर्व विजेत्या खेळाडूंचे अभिनंदन केले असून पुढील राज्यस्तरीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

### गुरुपौर्णिमेनिमित्त तबलावादनातून गुरुचरणी स्वरांजली

**अमरावती-** मुकुंद सराफ शिष्य परिवार, अमरावती यांच्या वतीने गुरुपौर्णिमा उत्सव मोठ्या उत्साहात व भक्तिमय वातावरणात झाला. दस्तूरनगर येथील प्रयास सेवांकुर भवन येथे आयोजित कार्यक्रमात मुकुंद सराफ यांचे शिष्य परिवाराच्या वतीने गुरुपूजन करण्यात आले.ज्येष्ठ शिष्य किशोर वावरकर यांनी गुरुवर्य मुकुंद सराफ यांचे विधिवत गुरुपूजन केले. यानंतर शिष्यांनी आपल्या गुरूंच्या चरणी तबलावादनाची स्वरांजली अर्पण केली. यावेळी राहुल बालखंडे, प्रशांत दुधे, समीर जगताप, स्वप्नील सरदेशमुख, मीनल फुकटे, स्वरांग केतकर, हेतन बोडे, अर्पित सावरकर, सोहम खुरपे, मोहक घाटोळ, रुद्र घोंगटे, निशांत अथिलकर व प्रथमेश गई यांनी तबलावादन सादर केले. कार्यक्रमास ज्येष्ठ गायक नारायणराव दरेकर, ॲड. मिलिंद वैष्णव व प्रा. गजानन केतकर प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. श्रीकांत पुंडलिक यांनी संचालन केले. आयोजनासाठी वेदांत येते, आराध्या गायकवाड, निलेश रूमने, अक्षय ताम्हणकर, प्रसाद पांडे, संदीप दलाल, विनोद अथिलकर, मधुरा सहस्त्रबुद्धे, अजिंक्य इनामदार, रूपक हिवसे, शौर्य गुहे, श्रीकांत तेल्हारकर सर, कुंदन इंगोले, शिवम इंगळे, सोहम जगताप, रत्नाकर मोहदरकर, राधेय इंगळे, धनोरकर, प्रा. सुहास उमाळे, अनामय पवार, प्रिती बलखंडे, मीनल जगताप, संपदा पवार, प्राची पिंपळकर व मंजिरी जगताप यांनी परिश्रम घेतले.

# ४८ कोटींच्या दंडवसुलीला 'ब्रेक'; जप्ती-लिलाव कधी?

## बोजा चढवून महसूल विभागाची कारवाई थांबली

### -आदिवासी जमिनीवरील उद्योगांवर कारवाईचे काय?

**ॲड. समीर ठाकूर**

**अकोला :** गाजीपूर येथील गौण खनिजाच्या अतिरिक्त उत्खननप्रकरणी ठोठावण्यात आलेल्या तब्बल ४८ कोटी रुपयांच्या दंडवसुलीचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर आला आहे. दंडाची रक्कम थकल्यानंतर संबंधित मालमत्तांवर बोजा चढविण्याची कारवाई करण्यात आली; मात्र त्यानंतर महसूल विभागाची गाडी पुढे सरकलेली दिसत नाही. शासनाच्या तिजोरीत कोट्यवधी रुपयांचा महसूल जमा करण्यासाठी जप्ती आणि लिलावाची प्रक्रिया केव्हा सुरू होणार, असा सवाल आता उपस्थित होत आहे.




विशेष म्हणजे, दंडवसुलीसाठी महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ मध्ये प्रशासनाला व्यापक अधिकार देण्यात आले आहेत. थकबाकी वसुलीसाठी जप्ती, चल मालमत्तेची विक्री, स्थावर मालमत्तेची जप्ती व विक्री अशा विविध उपाययोजना कायद्यात उपलब्ध आहेत. मात्र गाजीपूर प्रकरणात मालमत्तांवर बोजा चढविण्यापलीकडे ठोस कारवाई का होत नाही, याचे उत्तर महसूल प्रशासनाकडे आहे काय, असा प्रश्न निर्माण झाला आहे.

मौजे गाजीपूर येथील गट क्रमांक २७ व ३८ मधील गौण खानिजाच्या अतिरिक्त उत्खननप्रकरणी जमीनमालक विलास कालू चिमोटे आणि भाडेपट्टाधारक संतोष चांडक यांना ३० जानेवारी २०२४ रोजी ४८ कोटी रुपयांचा दंड ठोठावण्यात आला होता. या दंडाच्या वसुलीसाठी महसूल विभागाकडून संबंधित मालमत्तांवर बोजा चढविण्यात आला. दरम्यान, दंडग्रस्त चांडक यांनी उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात धाव घेतली होती. न्यायालयाने त्यांना महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ मधील कलम २४७ अन्वये अपिलीय अधिकाऱ्यांकडे अपील करण्याची संधी दिली होती.

मात्र, न्यायालयाने निश्चित केलेल्या मुदतीत अपील दाखल न झाल्याने आणि नंतर विलंबाने अपील दाखल झाल्यानंतरही प्रकरणाची प्रक्रिया पुढे गेली. अखेरीस साडे तीन महिन्यांच्या सुनावणीनंतर अपील फेटाळण्यात येऊन तहसीलदारांनी ठोठावलेला दंड कायम राहिला. विशेष म्हणजे, दंडवसुलीला कोणतीही कायमस्वरूपी स्थगिती नसतानाही महसूल प्रशासनाकडून वसुलीची प्रक्रिया अत्यंत संथ गतीने सुरू राहिल्याचा आरोप होत आहे.

### ■ बोजा म्हणजे वसुली नव्हे!

मालमत्तेवर बोजा चढविणे ही वसुलीची अंतिम पायरी नाही. महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ मध्ये थकीत रक्कम वसूल करण्यासाठी पुढील प्रक्रिया स्पष्ट करण्यात आली आहे. कलम १७६ अन्वये थकबाकीची वसुली कायदेशीर मार्गाने करता येते. त्यानंतरच्या तरतुदींमध्ये मालमत्ता जप्त करणे, चल मालमत्ता विक्री करणे, स्थावर मालमत्ता जप्त करून तिचा लिलाव करण्याची प्रक्रिया नमूद आहे. मग ४८ कोटींच्या दंडाच्या प्रकरणात बोजा चढविल्यानंतर जप्तीची कारवाई का झाली नाही? लिलावाची प्रक्रिया का सुरू झाली नाही? शासनाच्या तिजोरीत आतापर्यंत किती रक्कम जमा झाली? या प्रश्नांची उत्तरे आता महसूल विभागाने द्यावीत, अशी मागणी होत आहे. कारवाईसाठी कायद्यात अधिकार असताना प्रशासनाकडून केवळ नोटिसा, पत्रव्यवहार आणि बोजा यापुरतीच कारवाई मर्यादित राहणार असेल, तर एवढ्या मोठ्या दंडवसुलीचा शासनाला प्रत्यक्ष फायदा कधी होणार, असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

### ■ शासकीय देयकांकडेही अर्थपूर्ण दुर्लक्ष?

संबंधित दंडग्रस्त व्यक्ती शासकीय कंत्राटदार असल्याने विविध शासकीय विभागांकडे त्यांची देयके किंवा सुरक्षा ठेवी प्रलंबित आहेत का, याची चौकशी महसूल विभागाने केली आहे काय? शासनाचा मोठा महसूल थकीत असताना संबंधित शासकीय विभागांकडील आर्थिक व्यवहारांची माहिती घेऊन कायद्यानुसार उपलब्ध उपाययोजना करण्यात आल्या आहेत काय, हा मुद्दाही महत्त्वाचा ठरत आहे. प्रधानमंत्री ग्राम सडक योजना, सार्वजनिक बांधकाम विभाग, नाबार्ड अथवा अन्य शासकीय प्रकल्पांशी संबंधित देयकांची माहिती महसूल प्रशासनाने मागविली आहे काय? संबंधित विभागांना दंडाची माहिती देण्यात आली आहे काय? दंडवसुलीच्या दृष्टीने उपलब्ध कायदेशीर पर्यायांचा वापर करण्यात आला आहे काय? या प्रश्नांची उत्तरेही अपेक्षित आहेत.

#### आदिवासी जमिनीवरील उद्योगांचे काय?

दरम्यान, गाजीपूर परिसरातील आदिवासी जमिनीवर उभारण्यात आलेल्या कथित उद्योगांचा मुद्दाही तितकाच गंभीर आहे. संबंधित ठिकाणी दोन स्टोन क्रशर आणि डांबर हॉटमिक्स प्लांट सुरू असल्याचा दावा करण्यात आला आहे. या उद्योगांसाठी आदिवासी जमिनीचा वापर करताना महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ मधील कलम ३६-अ नुसार आवश्यक परवानगी घेण्यात आली होती काय, याची तपासणी प्रशासनाने केली आहे का?

आदिवासी जमिनीचे बिगर आदिवासीकडे हस्तांतरण, भाडेपट्टा किंवा अन्य स्वरूपातील व्यवहारांवर कायद्यात कठोर निर्बंध आहेत. त्यामुळे ९९ वर्षांचा भाडेपट्टा, बाँड किंवा करारनामा झाला म्हणून तो व्यवहार आपोआप कायदेशीर ठरतो काय, याची चौकशी होणे आवश्यक आहे.

जर आवश्यक वैधानिक परवानगी न घेता आदिवासी जमिनीचा वापर करून उद्योग उभारले असतील, तर संबंधित प्रकरणात सक्षम प्राधिकाऱ्यांकडून कारवाई का झाली नाही? महसूल विभागाच्या अधिकाऱ्यांना या व्यवहाराची माहिती नव्हती काय? माहिती असूनही कारवाई प्रलंबित ठेवण्यात आली काय? या प्रश्नांची उत्तरे आता अकोट तहसीलदार आणि उपविभागीय अधिकाऱ्यांनी देणे गरजेचे आहे.

### बँक खात्यांबाबत प्रशासनाची भूमिका काय?

दंडवसुलीच्या प्रक्रियेत संबंधित व्यक्तीच्या आर्थिक मालमत्तेची माहिती घेऊन कायद्यानुसार आवश्यक कारवाई करण्याची जबाबदारी प्रशासनावर आहे. मात्र ४८ कोटी रुपयांचा दंड थकीत असताना बँक व्यवहारांबाबत महसूल विभागाने कोणती पावले उचलली, याची माहिती अद्याप समोर आलेली नाही. शासनाचा एवढा मोठा महसूल थकीत असताना वसुली यंत्रणा नेमकी कोणत्या दिशेने काम करीत आहे? संबंधितांची आर्थिक मालमत्ता शोधण्याची प्रक्रिया पूर्ण झाली आहे काय? की बोजा चढवून प्रशासनानेच सुटकेचा निःश्वास सोडला आहे? असे सवाल उपस्थित होत आहेत.

### ■ 'आरआरसी'नंतरही कारवाईचा वेग मंदच

दंडवसुलीसाठी अकोट उपविभागीय अधिकाऱ्यांकडून तहसीलदारांना आरआरसी प्रक्रियेबाबत पत्रव्यवहार करण्यात आल्याची माहिती आहे. त्यानंतर नोटीस बजाविण्यात आली. मालमत्तांचा शोध, बोजा आणि इतर प्रक्रियेत बराच कालावधी गेला. मात्र आता जप्ती आणि लिलावाच्या दिशेने पाऊल का पडत नाही, हे कोडे कायम आहे. विशेष म्हणजे, संबंधित व्यक्तीच्या मालमत्तांची माहिती उपलब्ध नसल्याचे सुरुवातीला सांगितले जात असताना त्याच मालमत्तांची माहिती प्रसिद्ध होताच प्रशासनाकडून बोजा चढविण्याची कारवाई झाल्याचा आरोप करण्यात आला आहे. त्यामुळे महसूल विभागाच्या तपास यंत्रणेच्या कार्यक्षमतेवरही प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

#### महसूल विभागाची 'मूक संमती' तर नाही ना?

४८ कोटींचा दंड कायम; मालमत्तांवर बोजा; तरीही जप्ती नाही. आदिवासी जमिनीवरील कथित उद्योग; तरीही ठोस कारवाई नाही. शासकीय कंत्राटी व्यवहार; तरीही त्याचा वसुलीच्या दृष्टीने उपयोग झाल्याचे दिसत नाही. अशी परिस्थिती असेल तर महसूल विभागाची कार्यप्रणाली संशयाच्या भोवऱ्यात येणे स्वाभाविक आहे.

कायद्याने अधिकार दिले असताना त्या अधिकारांचा वापर करण्यास प्रशासनाला अडचण कोणती? कोणत्या आदेशामुळे कारवाई थांबली आहे? कोणत्या न्यायालयीन स्थगितीमुळे जप्ती-लिलाव रोखला आहे? अशी स्थगिती नसल्यास कारवाई रखडण्याचे कारण काय? या प्रश्नांची उत्तरे जनतेला मिळाली पाहिजेत.

४८ कोटींच्या दंडाची वसुली ही कोणत्याही व्यक्तीविरुद्धची वैयक्तिक कारवाई नसून शासनाच्या महसुलाचा प्रश्न आहे. त्यामुळे संबंधित व्यक्तीचे राजकीय, सामाजिक किंवा आर्थिक वजन काहीही असो; शासनाचा महसूल वसूल करण्यासाठी कायदा सर्वांसाठी समान असला पाहिजे. आता प्रशासनासमोर दोनच पर्याय आहेत— कायद्यातील अधिकारांचा वापर करून ४८ कोटींची प्रत्यक्ष वसुली करणे किंवा कारवाईच्या विलंबाचे ठोस कारण जनतेसमोर मांडणे. बोजा चढवून फाईल बंद करण्याचा प्रकार यापुढे चालणार आहे काय? जप्तीची कारवाई कधी? लिलाव कधी? शासनाच्या तिजोरीत ४८ कोटी कधी? आणि आदिवासी जमिनीवरील कथित बेकायदेशीर उद्योगांवर कारवाई कधी? या प्रश्नांवर आता केवळ अकोट तहसीलदार नव्हे, तर जिल्हाधिकारी आणि महसूल प्रशासनाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनीही भूमिका स्पष्ट करण्याची वेळ आली आहे.

# पाणीपुरवठ्याचा खड्डा ठरला काळाचा सापळा

### -चिमुकलीच्या मृत्यूप्रकरणी गुन्हा, -मुलीचा पावसाच्या पाण्यात बुडून मृत्यू -कंत्राटदार, देखरेख अधिकाऱ्यांवर निष्काळजीपणाचा ठपका

**अमरावती/प्रतिनिधीः-**

पाणीपुरवठा पाइपलाइनच्या कामासाठी खोदलेला खड्डा एका चिमुकलीच्या जीवावर बेतला. ग्राम कोरडा हनुमान ढाणा परिसरात पावसाने खड्ड्यात साचलेल्या पाण्यात पडून १ वर्ष ८ महिन्यांच्या संजु कज्जुलाल भुसुम या चिमुकलीचा मृत्यू झाला. या घटनेच्या तपासात कामाच्या ठिकाणी आवश्यक खबरदारी न घेतल्याचे समोर आल्यानंतर चिखलदरा पोलिसांनी संबंधित कंत्राटदार आणि देखरेख अधिकाऱ्यांविरुद्ध निष्काळजीपणाचा गुन्हा दाखल केला आहे. ही दुर्दैवी घटना २९ जुलै रोजी घडली होती. चिमुकलीचा बुडून मृत्यू झाल्यानंतर पोलिसांनी सुरुवातीला अकस्मात मृत्यूची नोंद केली होती. मात्र, घटनेच्या पार्श्वभूमीवर पोलिसांनी सखोल तपास सुरू केला. तपासादरम्यान नातेवाईक आणि ग्रामस्थांचे जबाब नोंदविण्यात आले. तसेच ग्रामीण पाणीपुरवठा विभागाकडून प्राप्त अहवालाचीही पडताळणी करण्यात आली. पाइपलाइन टाकण्यासाठी खोदण्यात आलेला खड्डा उघडा ठेवण्यात आला होता. त्यात पावसाचे पाणी साचले असतानाही परिसरात आवश्यक ती सुरक्षा किंवा प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यात ☞(पान २ वर)

# अंजनगाव नगरपरिषदेच्या आढावा बैठकीत समस्यांचा पाढा



### -आमदार लवटे अधिकाऱ्यांवर संतापले

**अंजनगाव सुर्जी/प्रतिनिधीः-**


अंजनगाव सुर्जी नगरपरिषदेच्या सुरेशचंद्र भावे सभागृहात आज (दि.१२) दर्यापूर-अंजनगाव सुर्जी विधानसभा मतदारसंघाचे आमदार गजानन लवटे यांच्या उपस्थितीत नगरपरिषदेच्या कामकाजाचा आढावा घेण्यासाठी बैठक आयोजित करण्यात आली. शहरातील विविध प्रलंबित प्रश्नांवर नागरिकांनी तसेच उपस्थित पदाधिकारी व लोकप्रतिनिधींनी प्रशासनाला जाब विचारत समस्यांचा पाढाच वाचला.

शहरातील रस्त्यांवर पडलेले खड्डे, पाणीपुरवठ्याचा प्रश्न, घरकुल योजना, नालेसफाई, स्वच्छता तसेच विविध विकासकामांबाबत बैठकीत चर्चा झाली. नागरिकांच्या प्रश्नांवर संबंधित अधिकाऱ्यांकडून माहिती घेत आमदार गजानन लवटे यांनी अधिकाऱ्यांना धारेवर धरत प्रलंबित ☞(पान २ वर)

# चांदूर बाजारात दुचाकीच्या डिक्कीतून १.५० लाख लंपास

**चांदूर बाजार/प्रतिनिधीः-**

बँकेतून काढलेली दीड लाख रुपयांची रोकड दुचाकीच्या डिक्कीत ठेवून दुकानाकडे निघालेल्या व्यक्तीला काही अंतरावर गेल्यानंतर मोठा धक्का बसला. दुकानात पोहोचल्यानंतर डिक्की उघडली असता रोकड असलेली पिशवीच गायब असल्याचे समोर आले. चांदूर



बाजार शहरात ११ ऑगस्ट रोजी हा प्रकार घडला.

संजय रंगरावजी जामोदकर (५७, रा. वडाळा हैदतपूर, ता. चांदूर बाजार) हे अडत धान्य दुकानात दिवाणजी म्हणून कार्यरत आहेत. ११ ऑगस्ट रोजी कृषी उत्पन्न बाजार समितीतील काम आटोपल्यानंतर ते बँकेत गेले होते. स्टेट बँक ऑफ इंडियाचा १ लाख ५० हजार रुपयांचा चेक वटविल्यानंतर त्यांनी मिळालेली रोकड पिशवीत ठेवली.☞(पान २ वर)

# हेड कॉन्स्टेबल अमित खंडारेंची आत्महत्या

### -घरातच घेतला गळफास -नुकतीच शहर कोतवालीत बदली

**अमरावती/प्रतिनिधीः-**

शहर पोलिस दलातील हेड कॉन्स्टेबल अमित उदयभान खंडारे (वय ४०) यांच्या आत्महत्येने पोलिस दलासह वडाळी परिसर हादरला आहे. गुरुकृपा कॉलनीतील राहत्या घरात बुधवारी सकाळी त्यांनी गळफास घेतल्याचे उघडकीस आले. काही दिवसांपूर्वीच वाहतूक शाखेतून शहर कोतवालीत बदली झालेल्या खंडारे यांच्या मृत्यूमागील कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही.



अमित खंडारे हे गुरुकृपा कॉलनीतील घराच्या पहिल्या

#### आत्महत्येचे कारण गुलदस्त्यात

मजल्यावर पत्नी आणि दोन मुलांसह राहत होते. त्यांची पत्नी शुभांगी या शिक्षिका असून, मुलगी अनुष्का (वय १४) आणि मुलगा अद्विक (वय १०) असा परिवार आहे. आई सत्यभामा या घराच्या खालच्या भागात राहत होत्या. बुधवारी सकाळी साडेसातच्या सुमारास पत्नी दोन्ही मुलांना घेऊन ☞(पान २ वर)

#### आयुक्तांनी घेतली कुटुंबीयांची भेट

■ - घटनेची माहिती मिळताच फ्रेजरपुरा पोलिस घटनास्थळी दाखल झाले. पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठविण्यात आला. दरम्यान, पोलिस आयुक्त राकेश ओला यांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांसह घटनास्थळ आणि शवविच्छेदन कक्षाला भेट दिली. त्यांनी खंडारे यांच्या कुटुंबीयांची भेट घेऊन सांत्वन केले. तसेच फ्रेजरपुरा पोलिस अधिकाऱ्यांकडून घटनेची माहिती घेत तपासाबाबत आवश्यक सूचना दिल्या. अमित खंडारे यांनी ☞(पान २ वर)

# इर्विन चौकात पोलीस आयुक्त राकेश ओलांची 'ऑन द स्पॉट' कारवाई

### स्वतः उतरले रस्त्यावर, वाहतूक कोंडी पाहून संतापले

#### -अधिकाऱ्यांची कानउघाडणी, कर्मचाऱ्यांना सतर्क राहण्याचे निर्देश

अमरावती/प्रतिनिधीः-

चौकात वाहतूक कोंडी, वाहनांच्या रांगा आणि कर्तव्यावर असलेल्या कर्मचाऱ्यांची अपुरी दक्षता पाहून पोलिस आयुक्त राकेश ओला यांनी बुधवारी थेट रस्त्यावर उतरून वाहतूक व्यवस्थेची झाडाझडती घेतली. इर्विन चौकातील परिस्थिती पाहताच त्यांनी काही काळ स्वतः



वाहतूक नियंत्रणाची धुरा हाती घेतली. पोलिस आयुक्तांच्या या अनपेक्षित 'ऑन द स्पॉट' कारवाईमुळे वाहतूक विभागातील अधिकारी-कर्मचाऱ्यांची चांगलीच धावपळ उडाली. इर्विन चौकाची पाहणी करताना वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी आवश्यक ती तत्परता कर्तव्यावरील कर्मचाऱ्यांकडून दाखविली जात नसल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. त्यानंतर☞(पान २ वर)

# मशिदीत मध्यरात्री तरुणाचा धिंगाणा

### -काचा फोडून नमाजस्थळी झोपला -आरोपीला पोलिसांनी घेतले ताब्यात

**अमरावती/प्रतिनिधीः-**

कॅम्प परिसरातील एका मशिदीत मध्यरात्री घुसून तोडफोड करणाऱ्या तरुणाला फ्रेजरपुरा पोलिसांनी ताब्यात घेतले. पॉक्सो प्रकरणात नुकताच कारागृहातून बाहेर आलेल्या या तरुणाने मशिदीच्या खिडक्या व दरवाज्यांच्या काचा फोडल्यानंतर नमाज अदा करण्याच्या ठिकाणी जाऊन झोपल्याचे समोर आले आहे. बुधवारी पहाटे घडलेल्या या प्रकारामुळे परिसरात काही काळ खळबळ उडाली.

रवि सुधाकर इंगोले (२४, रा. धामक, ता. तळेगाव) असे ताब्यात घेतलेल्या तरुणाचे नाव आहे. रवि याच्याविरुद्ध यापूर्वी पॉक्सो कायद्यान्वये गुन्हा दाखल झाला होता. या प्रकरणात अटक झाल्यानंतर तो कारागृहात होता. ६ ऑगस्ट रोजीच तो जामिनावर बाहेर आल्याची माहिती पोलिसांकडून मिळाली.

मंगळवारी रात्री दोन ते अडीचच्या सुमारास रवि कॅम्प परिसरातील मशिदीत शिरला. काही काळ☞(पान २ वर)

### अचलपूर मतदारसंघातील विकासकामांसाठी

# आ. प्रविण तायडे यांची ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांच्याशी चर्चा

**अचलपूर/प्रतिनिधीः-** अचलपूर मतदारसंघातील ग्रामीण भागाच्या विकासाला गती देण्यासाठी मुंबई मंत्रालय येथे राज्याचे ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांची आमदार प्रवीण तायडे यांनी भेट घेऊन विविध विकासकामांबाबत सविस्तर चर्चा केली.यावेळी अचलपूर मतदारसंघातील ग्रामीण रस्ते, पूल, ग्रामविकासाच्या पायाभूत सुविधा तसेच नागरिकांच्या मूलभूत गरजांशी संबंधित विविध प्रस्ताव आमदार प्रवीण तायडे यांनी राज्याचे ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांच्याकडे सादर केले. संबंधित



विकासकामांसाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देण्यासोबतच प्रशासकीय मान्यता देण्याची☞(पान २ वर)

# ट्रक अपघातात दोन महिलांचा बळी गेल्याने कठोर कारवाई करा

### मृतकांच्या कुटुंबियांची जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक



**अमरावती/प्रतिनिधीः-** राजापेठ उड्डाणपुलावर २८ जुलै रोजी नो-एंट्रीत धावणाऱ्या ट्रकने दोन निष्पाप महिलांचा बळी घेतल्यानंतर शहरातील वाहतूक व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. या भीषण अपघातात बोरगाव धर्माळे येथील २५ वर्षीय गायत्री प्रमोदराव धर्माळे आणि भटवाडी येथील ३९ वर्षीय हर्षा आदित्यराव गावडे या दोघींचा मृत्यू झाला. या घटनेची सखोल चौकशी करण्याचे आदेश देण्यात☞(पान २ वर)

# मुथूट फिनकॉर्पच्या कार्यालयाची झडती

### कोट्यवधींचा घोटाळा, एका सुवर्णकारास चौकशीसाठी बोलावले

**अमरावती/प्रतिनिधीः-**

स्थानिक बस स्थानक मार्गावरील विमको टॉवर मध्ये असलेल्या मुथूट फिनकॉर्प लिमिटेड मध्ये उघड झालेल्या कोट्यावधीच्या घोटाळ्यानंतर पोलिसांनी कंपनीच्या कार्यालयाची झडती घेऊन तपासाला सुरुवात केली आहे. ग्राहकांच्या तक्रारी आणि घरून जप्त करण्यात आलेल्या काही कागदपत्र यात सत्य आहे का या संदर्भात कंपनीच्या संगणकामध्ये असलेला डेटा पोलिसांकडून तपासणीचे काम आता सुरू करण्यात आले आहे. तसेच ज्या एका स्वर्णकाराकडे सोने तारण ठेवले गेले होते त्याला पण चौकशीसाठी कोतवाली ठाण्यात बोलवण्यात आले असल्याची माहिती डीसीपी




शाम घुगे यांनी दिली. त्यांनी सांगितले की, मुख्य सूत्रधार शुभम रवींद्र वासेवाय, सुरज अनिल खैरकार, धीरज ☞(पान २ वर)